म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ८९५
REFBK-0029382

# अहा, देश कसा छान

वसंत बापट

REFBK-0029382

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुद्रक
कुमुद करकरे
साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

© वसंत वापट

प्रथमावृत्ती
११ जून १९९७

अक्षररचना
साधना प्रेस

मुखपृष्ठ आणि चित्रसज्जा
पद्मा सहस्रबुद्धे

मूल्य : रु. १००/-

एकलेपणात भेटणाऱ्या गर्दीला

आणि

गर्दीत भेटणाऱ्या एकलेपणाला

– मन आणि लेख दोन्ही अर्पण

## अनुक्रम


१. कोकणातली भ्रमंती - वरची आळी ..........१

२. कोकणातली भ्रमंती - मधली आळी ..........९

३. कोकणातली भ्रमंती - खालची आळी ....... २०

४. रंगीला राजस्थान .................. ३०

५. नेपाळदर्शन : १ .................. ५३

६. नेपाळदर्शन : २ .................. ६१

७. नेपाळदर्शन : ३ .................. ६८

८. लामाचा वाडा चिरेबंदी ................ ८०

९. भव्य दिव्य भुलभुलैया ................ ९०



१.

# कोकणातली भ्रमंती- वरची आळी

फारा दिवसांनी कोकणात भ्रमंती करण्याचा योग आला. भोरवरून वरंध घाटातून महाडला जायचं आणि मग उत्तर कोकणात मन चाहेल तिथे, वाट फुटेल तिथे पडाव टाकायचा असा माझा बेत होता.

पूर्वी वरंध घाटातून कोकणात उतरलो होतो त्याला ५५ वर्षे झाली होती. तेव्हा वय शाळकरी होतं आणि डोळे सगळं टिपून घ्यायला आसुसलेले होते. पण आता आयुष्याच्या उत्तरायणात आणि सगळं जग न्याहाळल्यानंतरही ही नागमोडी वाट पूर्वीसारखीच नजर खेचून घेत होती.

वरंघ घाट म्हणजे विकट वाट. या घाटाचं पूर्वीचं नाव? रडतोंडीचा घाट की मानमोडीचा? मावळ्यांनी दगडांनी ठेचून करतलबखानाचा त्याच्या फौजेसह नायनाट केला तो याच घाटात. पूर्वीच्या सर्व्हिस गाडीला वळणावळणावर मागे पुढे जाण्याचा म्हणजेच रिव्हर्सिंग स्टेशने घेण्याचा व्यायाम करावा लागे. छोट्या मोटरगाडीला त्या प्रयासाची गरज नाही. तरी मार्ग बिकटच आहे. त्याचं कारण मात्र एकच— रस्त्याला पडलेले नाना आकारांचे खाचखळगे! इथे कॉर्पोरेशन नसूनही एवढे खड्डे कोणी बरं पाडले असतील?

घाटमाथ्यावर शिरगाव आहे. शिरगावच्या डाव्या अंगाला नीरा नदीचा उगम आहे. रस्त्यात भेटलेल्या म्हातारबुवांना या गोष्टीचा किती अभिमान होता! 'ही नदी कंची?' असं विचारल्यावर त्यांनी अभिमानानं सांगितलं— 'हे नीराबाईचं माहेर आहे!' घाटाच्या माथ्यावर एक खपरेल हाटेल आहे. हवेत प्रसन्न गारवा होता. प्रवासाच्या पहिल्या सोनसकाळी असावं तसं मनही प्रसन्न होतं. अशा वेळी मायनस-फाइव्ह-स्टार हॉटेलातलं खाणंपिणं किती मस्त वाटतं! इथूनच एक गाडीवाट गेली आहे, खूप खूप खोल, 'शिवथर घळी'कडे. घाट उतरतानाही मधेच पाटी दिसे—

भू-प्रवास

'शिवथर घळीकडे.' वरंध ओलांडून वारसगावला आलो तर पुन्हा पाटी— 'शिवथर घळीकडे!' तीन वेळा आमंत्रण मिळाल्यावर आपण तिचं मन कसं मोडावं? तिठ्यावरून महाडकडे न जाता सरळ शिवथर घळीकडे गेलो. साधारण १५ मैलांचा रस्ता— आधी मऊसूत, मग दगडाधोंड्याचा. त्याचा शेवट होतो शिवथर घळीच्या पायथ्याशी. या घळीबद्दल पूर्वी ऐकलं होतं. छत्रपतींचं आणि समर्थांचं आख्यान लावणाऱ्या आधुनिक कीर्तनकारांनी काही खरं, काही मनचं घालून या घळीविषयी मराठी माणसांच्या मनात एक चमत्कारिक आकर्षण निर्माण करून ठेवलेलं आहे. घळ खरोखरच रम्य आहे. डोंगर खडकांच्या पोटात ठेंगण्या कमानी असाव्यात तशा गुहा आहेत. शिवकाळानंतर आता सभामंडपासकट मंदिरही कोणी रचलेलं आहे, पण खरं मंदिर म्हणजे या गुंफाच. त्यांच्या तोंडाशी सतत आदळणारा धवधवा आहे. त्याची 'गाज' फार गोड वाटते. खडकावर फुटून वर उसळणारे तुषार अंगावर घ्यायची मजाही खुशाल लुटावी. 'दरे-दरकुटे आणि धवाबा आदळे पाणी' यांचं मनसोक्त कौतुक केलं आहे ते समर्थांनीच. इथे त्यांनी वसती केली असेल ती जनसंमर्दाकडे पाठ फिरवून एकान्ताचे सुख अनुभवण्यासाठी, पण मुख्य म्हणजे 'दासबोध' हा त्यांचा महाग्रंथ या गुंफेत रचला गेला. १९३० साली धुळ्याचे समर्थभक्त शंकरराव देव यांनी महत्प्रयासाने शिवथर घळीचा शोध लावला. मातीचे थर एखाद्या लिंपणासारखे गुहेच्या तोंडावर होते, ते दूर केले. कीट चढले होते ते झटकून भिंताडे साफ केली, आणि आपल्यासाठी हे क्षेत्र खुले केले. अजिंठ्याला साहेब लोकांनी हेच केले नव्हते का? पण आत त्यांना गवसले ते अवीट सौंदर्याचे खजिने. इथे न कसले मूर्तिकाम, न रंगाकृती. रांगड्या महाराष्ट्राच्या दऱ्यादरकुटांतून हिंडणाऱ्या त्या फटिंग जोग्याला इथे रेखाटावेसे वाटते ते त्याच्या मनाचेच उन्मेष. इथेच त्यांनी शब्दांनी कोरून ठेवला प्रापंचिकांविषयी वाटणारा कळवळा आणि आपल्याला भावलेले अध्यात्म. निर्वाणसमय जवळ आल्यावरही त्यांनी आपल्या शिष्यांना सांगितले— 'मी जाणार नाही रे, मी तुमच्यांतच असेन. फक्त ओळखायला शिका— आत्मारामु दासबोधु.' प्रापंचिक तुकोबांची निवृत्ती विलक्षण आणि प्रपंचत्याग करणाऱ्या या संन्याशाची प्रवृत्तीही तितकीच विलक्षण. प्रापंचिकांना मूर्खलक्षणे सांगून

आणि शहाणपणाच्या दिशा दाखवून स्वतः मात्र अलौकिक अलिप्तपणाने जगलेला हा समर्थ संत. कसा अलिप्त, तर 'दास डोंगरी राहतो, जत्रा देवाची पाहतो' या वृत्तीने दुनियेकडे पाहणारा.

स्थान रम्य आहे. स्थळ स्वच्छ आहे. पाणी उदंड आहे. रानची हवा तरारी आणणारी आहे. आजूबाजूचे पर्वत साहसी मनांना आमंत्रण देणारे आहेत. पण त्या मानाने पायरव कमीच. क्वचित कोणी उदास वृत्तीने येऊन राहतात. कधी योगाचे वर्ग चालतात. साधेपणाने राहणाऱ्याला एका दिवसापुरता निवारा मिळतो. एरवी सारे चिडीचूप. उपेक्षेच्या पाचोळ्यात अशा जागा कायम झाकलेल्या राहतात, हेच खरे.

सगळीच रोजनिशी मला थोडीच इथे उघडायची आहे? शिवथरचे रूप मनात साठवीत महाडकडे येताना सारखे स्मरण होत होते ते माझे मित्र वसंत दाते आणि वसंत नगरकर या ४२ च्या आंदोलनातल्या वीरांचे. त्यांचे नेते नाना पुरोहित यांचे. वसंत दाते, वसंत नगरकर आणि वसंत बापट हे तिघेही तेव्हा विशीच्या उंबरठ्यावर उभे होते. त्यांच्यावर साने गुरुजींनी 'तीन वसंत' असा लेखही लिहिला होता. त्यांतला दाते महाडच्या मोर्चात हुतात्मा झाला, नगरकरनेही तेथे खूप पराक्रम केला, अलोट धैर्य दाखवले आणि तिसऱ्या वसंताने त्यांचे फक्त पोवाडे गायले. नाही तरी 'पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल' एवढीच समाजाची कवीकडून माफक अपेक्षा असते.

दापोलीचा पडाव डॉ. मंडलिकांच्या परड्यात होता. थोरले मंडलिक साधना, सेवादल, आंतरभारती– सर्वांचे विश्वस्त. त्यांचे धाकटे बंधू आप्पाशेट आणि वहिनी शैलाताई यांचे दापोली हेच कार्यक्षेत्र. मंडलिक घराण्याचे आणि दापोलीचे अतूट नाते आहे. ४० वर्षांपूर्वी 'श्यामची आई' चित्रपटासाठी आचार्य अत्र्यांचा एक सहकारी म्हणून मी या घरात राहिलो होतो. आल्फ्रेड गॅडनी हायस्कूल– याच्या रजिस्टरमध्ये पांडुरंग सदाशिव साने या विद्यार्थ्याचे नाव आजही पाहायला मिळेल– अगदी जवळच आहे. 'श्यामची आई'मधील कितीएक नावे म्हणजे काल्पनिक पात्रांची नावे नसून खऱ्याखुऱ्या व्यक्तींची नावे आहेत, हे येथे आल्यावर

समजते. पोचताक्षणी लाडघरला जाऊन तामसतीर्थाचे दुरून दर्शन घेतले. इथेच नांदते ब्रिगेडिअर वाळ प्रभृतींचे सुप्रसिद्ध वाळ घराणे त्यांच्या परसातले रहाटगाडगे आणि विहिरीच्या पाटांवर पोसलेल्या माडपोफळीच्या पवनचक्क्या चाळीस वर्षे झाली तरी माझ्या डोळ्यांसमोरून कधी हलल्या नाहीत. खुद्द दापोली आणि दापोलीच्या परिसरात पूर्वी भेटलेली माणसे आता अक्षरशः स्मृतिशेष झालेली आहेत. वोटीची तिकिटे देणारे दामले मास्तर आता नाहीत, कातळावर वागा फुलवायचे वेड डोक्यात घेतलेले वावा फाटकही काळाच्या पडद्याआड गेले. अशीच किती तरी माणसे. हर्णे वंदराचा छोटा धक्का, तो दीपस्तंभ, तो किल्ला आणि मुख्य म्हणजे आपले वाहू उचलून किनाऱ्यापाशी येणारा समुद्र– हे सगळे चित्र तसेच आहे. आता वोटीच नाहीत. शामच्या मावशीला आणणारे पडाव विमनस्कपणे झोके घेत असतात. माणूस आठवणीवर जगतो म्हणतात, त्याचे मात्र सुख पुष्कळ अनुभवले. या सुखाच्या ओढीनेच मोटार पालगडकडे वळवली.

साने गुरुजींच्या नावाची तिथे एक शाळा आहे. त्या शाळेतल्या एका खोलीतच साने गुरुजींचा जन्म झाला म्हणतात. पण त्या सत्त्वशील माणसाचे ठसे तिथे कोणाच्याच मनावर मला दिसेनात. पालगड हे गुरुजींचे गाव. तिथे त्यांचे घर आहे, त्यांचे भाऊबंद आहेत. आता एक नाममात्र स्मारकही झाले आहे. पण तरीही साने गुरुजींविषयी न कुणाला प्रेम, न आस्था, न अभिमान... असाच अनुभव मोठ्या प्रमाणावर येतो. मन अगदीच हिंपुटी व्हायचे नव्हते म्हणून की काय, तात्या केळकर ऊर्फ रावजी हे गुरुजींचे जिवलग मित्र भेटले. ते अजूनही गुरुजींचे उत्तम स्मारक उभे करण्याची आशा मनात बाळगून आहेत. कधी कधी वाटते, आपला समाज अगदी कृतघ्न आहे. काँग्रेसमध्ये उच्च पदांवर विराजमान झालेले आणि काँग्रेसच्या इतिहासात ज्यांच्या नावांचे गौरवाने उल्लेख केलेले आहेत, ते सगळे एका पारड्यात घालावे आणि दुसऱ्या पारड्यात साने गुरुजी. गुरुजींचे पारडेच जड होईल. आयुष्यात त्यांनी कसलेही पद घेतले नाही, मानाची अपेक्षा केली नाही, सत्तेच्या खुर्च्या त्याज्य मानल्या आणि तरीही काँग्रेसची अपूर्व सेवा केली. त्या स्वातंत्र्यभक्ताच्या आणि समतेसाठी तळमळणाऱ्या साधुचरिताच्या गावी 'त्याचे स्मारक उभारता का

हो?' अशा विनवण्या तात्या केळकरांसारखा एक फाटका माणूस आजच्या काँग्रेसमधील सत्ताधीशांकडे करीत राहतो आणि त्यांच्या थंड प्रतिसादाचा अनुभव घेतो, या कर्माला काय म्हणावे? बालकांवर आणि कुमार-किशोरांवर या शतकात आपल्या साहित्यातून संस्कार करणारा केवढा हा थोर लेखक. पण भावनाशून्य आणि मख्ख नेत्यांना त्याचे काय होय? महाराष्ट्राविषयी माझ्या मनातही ओतप्रोत अभिमान आहे. पण तरीही वाटते असे साने गुरुजी लाभते तर बंगालने, गुजरातने, कर्नाटकाने त्यांचा केवढा गौरव केला असता! पण आम्ही पडलो आहोत मुलखाचे करंटे. वास्तविक गुरुजींच्या घराचे राष्ट्रीय स्मारक व्हायला हवे. खेडचे नाव आता 'राजगुरुनगर' आहे तसे पालगडचे नाव सानेगुरुजीनगर किंवा श्यामनगर ठेवले गेले पाहिजे. तिथे मुलांच्या प्रबोधनासाठी आणि मनोरंजनासाठी एक सुंदर केंद्र निर्माण झाले पाहिजे आणि महाराष्ट्रातल्या बालगोपालांची पालगड ही भावपंढरी झाली पाहिजे. रावजींचे तर एवढेही मागणे नाही. आमच्याजवळ जागा आहे. तुम्ही शाळा बांधण्यापुरता निधी उपलब्ध करून द्या, एवढी साधी त्यांची मागणी आहे. पण तीही पुरी होत नाही. मी त्यांच्या घरी गेलो. ते आजारी आहेत तरी अतिशय उल्हासाने मला भेटले. आपल्या परसातल्या माडाचा नारळ त्यांनी मला प्रेमाने दिला. निरोप घेताना उराउरी भेट झाली तेव्हा दोघांचेही डोळे भरले होते आणि कंठ दाटला होता. त्या गहिवरानेच 'माझिये जातीचे मज भेटो कोणी' हा आनंद दोघांनीही व्यक्त केला असावा.

बाकी हा परिसर म्हणजे पवित्र तीर्थांचे एक जाळेच आहे. आम्ही पालगडला गेलो तसे मुरूडलाही. हे महर्षी कर्व्यांचं गाव. लाजेकाजेने त्यांचा एक छोटुकला पुतळा तेथे देवीच्या देवळासमोरच्या चौकात उभा केला आहे. देऊळ सुंदर आहे, त्याचे लाकडी खांब अतिशय शोभिवंत आहेत. पण अण्णासाहेबांचा पुतळा आपला आपल्या छोटेपणानेच शोभतो आहे. नाही तरी आपल्याकडच्या पुतळ्यांना पुतळा न म्हणता 'पुतळू' म्हणावे असे आचार्य अत्र्यांचे मत होते. आता स्त्रिया धैर्याने स्त्री-मुक्तीचा पुरस्कार करीत आहेत. स्त्रियांना शिक्षण नाकारणे आता रामराज्य परिषदेच्या राज्यकर्त्यांनाही शक्य होणार नाही. पण कर्वे, आगरकरांची

समाजक्रांतीच्या आरंभयुगातली कामगिरी कोणी आवर्जून उल्लेखतही नाही, असा काळ आला आहे. खरे तर आपल्या समाजाचा अर्धा भाग म्हणजे स्त्रिया. त्या युगानुयुगिच्या दलित आणि पीडित  या दलितांना समान संधी मिळावी म्हणून तळमळणारे, मार्गदर्शन करणारे आगरकर आणि या दलितांच्या शिक्षणासाठी जिवाचे रान करणारे धोंडो केशव कर्वे यांची महनीयता फुले आणि आंबेडकर यांच्याहून कमी नाही. पण याची जाण व्हावी तशी प्रकट होताना आढळत नाही. ही सल महर्षी कर्व्यांच्या गावी गेल्यावर विशेष बोचू लागली.

मुरूड. एका पांदीतून जाणारी वाट. दुतर्फा रसरशीत पिवळ्या फुलांची रानवट झुडपे. दोनही पाख्यांना हिरवी आगरे. पायांखाली दमट पानपाचोळा. वाटेचा शेवट होतो तिथे सुंदर पुळण आणि अथांग सागर. त्याच्याकडे पाहिल्यावर मात्र वाटते, कसली आपली सुखे आणि कसली दुःखे? कसल्या घटका, कसले प्रहर, कसली संवत्सरे? युगानुयुग न ओसरणारी ही निळावंतीची अथांग माया, ही खरी. हाच माझा घननीळ म्हणून आत्मार्पण करू पाहणारं मन अर्थातच आपलं नव्हे. ते फक्त चैतन्य महाप्रभूंसारख्या देवपिशांनाच लाभतं.

याच भागात पेंडश्यांचं कोकण नांदत आहे. हद्दपार, गारंबीचा बापू आणि तुंबाडचे खोत अशा त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांतून आपल्याला परिचित झालेली ठिकाणं आणि मकाणं इथेच साक्षात भेटत राहतात. महापुरुषांप्रमाणे महान लेखकही आपल्याला केवढा तरी वारसा देऊन जात असतात. मुरूडहून परतताना पेंडश्यांची आणि विशेषतः गारंबीच्या बापूची आठवण पुन्हा पुन्हा होत राहिली. पुढे बुरोंडीहून दाभोळला जातानाही तीच कथा. आता ही पावती शिरुभाऊ पेंडश्यांना द्यायची कशी, या फिकिरीत असतानाच आसूद-पुलावर समाधान विश्रांतिगृह दिसलं. मग गारंबीच्या अफाट बापूनं राधेच्या संगतीनं अमर करून ठेवलेल्या त्या हॉटेलात झणझणीत मिसळ खाऊन पेंडश्यांना मनोमन नमस्कार केला.

हे स्थान पहा, ते स्थान पहा असे करीत लोकमान्य टिळकांच्या चिखलगावावरून स्वाऱ्या दापोलीला परतल्या. एका रात्रीचा विसावा घेऊन पुढच्या यात्रेचे प्रस्थान ठेवले. यात्राच नव्हे तर काय? साने गुरुजी,

महर्षी कर्वे, लोकमान्य टिळक– सगळे तीर्थरूपच. त्या पूज्य आणि पुण्यदायी महात्म्यांना जन्म देणारी ही छोटीशी रत्नखनी धन्यच आहे.

दापोलीला पूर्वी काप दापोली म्हणत. काप म्हणजे कॅम्प. कोकणात इतरत्र कुठेही नसेल असे मैदान दापोलीला असल्यामुळेच साहेब लोकांनी इथे कॅम्प केला असावा. काळ बदलला तसा इथला परिसरही बदलला. त्यात आनंदाची गोष्ट म्हणजे कृषि विद्यापीठ नावाचं एक नवं तीर्थक्षेत्र इथे निर्माण झालं. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात ज्या महत्त्वाच्या घटना घडल्या त्यांत कृषि क्षेत्रातल्या अनेकांगी प्रगतीला मोठं स्थान आहे. दापोलीच्या विद्यापीठात तर फळशेतीच्या संशोधनाला फार चांगली फळे आली आहेत, येत आहेत फलसंपत्ती आणि मत्स्य संपत्ती ही कोकणची आणि म्हणूनच या विद्यापीठाचीही वैशिष्ट्ये ठरणार आहेत. नव्या उमेदीचे मराठी लेखक श्री. रोकडे इथे ग्रंथपाल आहेत. विचारांची धिटाई आणि समतेविषयी तळमळ हे रोकड्यांचे विशेष तर मला जाणवलेच पण विद्यापीठात होणाऱ्या कामाची ओळख त्यांनी करून दिली तेव्हा त्यांच्या शालीन वागण्याचाही ठसा माझ्या मनावर उमटला. त्यांचे मन आत पेटलेले असले तरी त्यांचे बोलणे मृदू आणि आदबशीर आहे.

दापोलीला आणखी एक विशेष आनंद झाला. तेथे क्रियाशील तडफदार तरुणांचा एक गट आहे. त्या गटाने अंधश्रद्धा निर्मूलन आणि एकूणच समाजपरिवर्तन यांसाठी खूप काम हाती घेतले आहे. डॉ. मंडलिकांचा नातू अनीश पटवर्धन आणि त्यांचे साथी-सहकारी वायफळ घोषणाबाज नाहीत, निरलस कार्यकर्ते आहेत. अनीश म्हणजे तर उत्साह आणि कार्यकुशलता यांची एकवट मूर्तीच. फार दिवसांनी युवाशक्तीचे सतेज उन्मेष मला पाहायला मिळाले आणि मनाची मरगळ बऱ्याच अंशी कमी झाली.

चिपळूणच्या अलीकडे परशुरामाचे मंदिर आहे. कोकण निर्माण करणारा परशुराम खरा असो की काल्पनिक, त्याची कथा आकर्षक आहे. क्षत्रिय-ब्राह्मणांतल्या पहिल्या संघर्षाचं संसूचन परशुरामाच्या कहाणीत आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यानं समुद्र हटवला आणि

कोकण वसवलं ही समजूत. तरीही मला तो कधी देवतुल्य वाटला नाही. त्याचा स्वभाव तसा आक्रस्ताळाच. पितृभक्तीच्या कैफात आईचं मस्तक धडावेगळं करणारा हा देव मला तसा फारसा पसंत नाही. देशात त्याची देवळंही खूपच कमी असावी. तरीही परशुराम क्षेत्री मी थांबलो. थांबण्याचं कारण माझं मलाच ठाऊक. विल्सन कॉलेजात संस्कृतचे अध्यापन करणारे जोशीशास्त्री म्हातारपणात सपत्नीक तेथे राहत असत. मागे मी त्यांना भेटलोही होतो. तेव्हाच त्या दोघांच्या देहाच्या धनुकल्या झालेल्या होत्या. तरीही आशेने चौकशी केली. कर्मधर्मसंयोगाने का काय म्हणतात ते, शास्त्रीबुवांचे बंधू भेटले आणि पंधरा वर्षांपूर्वीच हे दांपत्य निवर्तल्याचे त्यांनी मला सांगितले. आम्ही वाटेल तितक्या कालावधीनंतर जायचे आणि जुन्या माणसांची चौकशी करायची म्हटल्यावर हे असे काही होणारच.

आपण रिप व्हॅन विंकल आहोत याचा अचानक साक्षात्कार घडणारच! निदान मला,तरी तो घडला!

०००

२.

# कोकणातली भ्रमंती - मधली आळी

दापोलीची एकेक व्यक्ती आणि त्यांनी पुनीत केलेली एकेक जागा आठवत आठवत चिपळूणवरून संगमेश्वरला आलो आणि एकाएकी आठवण झाली कर्णेश्वराची. औरंगजेबाने छत्रपती संभाजीला कैद केले ते या मंदिरात. कर्णेश्वर मंदिराच्या भागाला कसवा म्हणतात. कसब्यात मुसलमानांची वस्ती पुष्कळ आहे. त्यांना पाहून वाटले, औरंगजेबाच्या शिपायांचीच तर ही वंशवृद्धी नसेल ना! खुद्द कर्णेश्वराचे मंदिर स्थापत्य म्हणून फारच सुंदर आहे. संभाजीला कबजी कलुशाच्या कपटामुळे आणि मदिरापानाच्या कैफात असताना कैद होण्याची वेळ आली असा पूर्वीपासून प्रवाद चालत आला आहे. मंदिर पाहिल्यावर वाटते की, शिवपुत्र संभाजीची निरुपायाने या शिवमंदिरात कोंडी झाली असेल. संभाजी उतावळा असेल, आततायी असेल, अविचारीही असेल, पण तो लढवय्या होता हे निःसंशय. त्याचे चरित्र म्हणजे एक शोकात्म कथा आहे. त्या कथेतले अखेरचे पर्व कर्णेश्वराला सुरू झाले.

इतिहासाच्या पाऊलखुणा धुंडाळत बसायला तसा वेळ नव्हता म्हणून जिथे एका वेगळ्या वर्तमानाचा अनुभव येत असतो आणि जिथे भविष्यकालीन प्रगतीचे धूसर दर्शन होऊ लागते त्या देवरूखकडे अगदी सहजपणे वळलो. तिथे मावशी हळबे या थोर समाजसेविकेने उभवलेले मातृमंदिर आहे. तपश्चर्येने शिणलेला देह आणि परिश्रमांमुळे कोळपलेली मुद्रा घेऊन मावशी वावरत आहेत. सगळा आसमंत त्यांच्या सेवासुगंधाने भरलेला आहे. शिस्तबद्ध उपक्रमशीलता, व्यापक सहानुभूती, आणि निरलस कष्ट यांच्या बळावर मातृमंदिराची वाटचाल यशस्वीपणे चालली आहे. गोकुळात राहणाऱ्या तिथल्या अनिकेत

बालकांचे संगोपन आणि संवर्धन तिथे कसोशीने चालले आहे. तिथे राहणाऱ्या बालक-बालिकांनी एकमेकांच्या आवाजात आवाज व्यवस्थित मिसळून समूहगीते गायली तेव्हा ती गीते रचणाऱ्या कवीचे मन हेलावणे नैसर्गिकच नव्हे काय?

देवरूखमध्येच प्रसिद्ध लेखक माधव कोंडविलकर राहतात. त्यांची ओझरती भेट घेतली आणि मोहरा मित्रवर्य रमाकांत आर्ते यांच्या घराकडे वळवला. आर्ते पतिपत्नी आणि त्यांची दोन मुले म्हणजे विधायक सेवा आणि युयुत्सू वृत्ती यांची अधिष्ठानेच आहेत. रमाकांत म्हणजे अप्पासाहेब पटवर्धनांचा पट्टशिष्यच. विशेष म्हणजे श्रीमती आर्तेही गुरे फाडण्यापासून सारी चर्मकर्मे आनंदाने करतात. आर्ते कुटुंबात घटका-दोन घटका घालवणे म्हणजे नम्रपणे काही शिकणेच असते.

मुरूडला समुद्र दिसला होता पण भेटला नव्हता. तो मला भेटायचा होता गणपतिपुळ्याला. कोकणच्या वनस्पतींशी सोयरसुतक नसल्यासारखा एक उघडाबोडका माळ आधी लागतो. त्यावरून जाते फारशी आकर्षक नसणारी एक लांबलचक वाट आणि अकस्मात दिसू लागतो निळाभोर समुद्र. उन्हात एखाद्या काचेच्या विशाल निळसर फरसबंदीसारखा चमचमत राहणारा. आभाळ भरून आले की त्याचा रंग गहिरा होतो. सकाळ-संध्याकाळी त्याच्यावर अनेक निळ्यासावळ्या छटा झळकू लागतात. पुळ्याला लोक गणपतीच्या दर्शनाला जातात आणि त्यांना वाटते, गणपतिबाप्पा देवळात बसलेले आहेत. पण पुळ्याच्या डोंगरालाच गणपती मानायचा प्रघात आहे. तो गणपती आद्य! देवळातला नंतरचा! देऊळ तसे जुने आहे आणि पुजाऱ्यांना सनदा संभाजी महाराजांकडून मिळाल्या आहेत. पण डोंगरदेव अगोदरचा, मग मंदिरातला. डोंगराला प्रदक्षिणा म्हणजेच गणेशाला प्रदक्षिणा. ही कल्पना मला फारच आवडली. 'माझा गणेश नाही मखरात मावणारा' असे मी दुसऱ्याच संदर्भात पूर्वी लिहिले होते त्याची प्रचिती इथे आली. आता मंदिराशेजारी सरकारी विहार बांधलेले आहेत. त्यांना जोडून मोठे उपाहारगृह आहे. पण ज्याला

चवीने खायचे असेल त्याला पुळ्याच्या एखाद्या गुरुजींकडे साजुक तुपासह उकडीचे मोदक खायला गेले पाहिजे धनवटकर गुरुजींनी माझे मोठ्या प्रेमाने स्वागत केले आणि त्या घरगुती आतिथ्याने माझे मन सुखावले. मात्र पुळ्याच्या मुक्कामात सुखाची परमावधी होते ती समुद्रात डुंबताना.

दीर्घ दीर्घ, स्वच्छ स्वच्छ पुळण. थुईथुई नाचणाऱ्या लाटा. उग्र नव्हेत पण सौम्यही नव्हेत. मध्यममार्गी. लाटांच्या माथ्यावर फुलांचे प्रचंड गजरे बांधावे तसा निवळशंख शुभ्र फेस. अशा खेळकर लाटांच्या स्वाधीन होण्याचे सुख त्यातल्या जाणकाराशिवाय कोणाला समजणार?

आणि निदान या बाबतीत तरी मी ज्ञातास्वाद खरा!

पुळ्याच्या गणपतीला जो भेट देतो त्याला जर मराठी मायबोलीचा अभिमान असेल तर जेमतेम एका कोसावर असलेल्या मालगुंडला जायला तो कधीच चुकणार नाही. आधुनिक मराठी कवितेच्या जनकाचे, म्हणजे केशवसुतांचे हे गाव. नवसमाजाच्या आगमनाची तुतारी त्यांनीच फुंकली आणि नव्या मनूचे स्वागत करणाऱ्या शूर शिपायाला केवढी प्रखर व्रतनिष्ठा आत्मसात करावी लागेल हेदेखील त्यांच्याच कवितांनी शिकवले.

*'ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा*
*तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा'*

अशी विशाल मानवतावादाची दीक्षा घेऊन या कडव्या लढवय्या कवीने कठीण शब्दांच्या धोंड्यांनी हाणाहाण करून अवघ्या रूढिपूजकांची दाणादाण केली आणि कवींना आपले स्वत्व जपण्याची ईर्ष्या दिली. आणि 'विशाल मानवतावाद, नवसमाजनिर्मिती, ज्ञान-विज्ञाननिष्ठा' वगैरे वगैरे व्यासपीठी शब्दांचा उच्चारही न करता ही सगळी मूल्ये मात्र आपल्याला दिली. मालगुंडला पूर्वी गेलो होतो. पण म्हणून काय झाले? मालगुंडसारखी गावे असतात त्यांना 'पूर्वी पाहिलंय की एकदा!' असा उद्गार काढून दृष्टीआड करता येत नाही. आपल्या निष्ठा बळकट करण्यासाठी तिथे जायचे असते

गंजत पडलेल्या शस्त्रांना तिथल्या पाषाणांवर घासून धारदार करायचे असते आणि ऐन तारुण्यात निघून गेलेल्या थोर कवीच्या प्रतिभेचा एक तेजःकण तरी आपल्याला मिळो अशी प्रार्थना करायची असते. केशवसुतांच्या जन्मशताब्दीच्या वेळी सरस्वतीच्या अनेक उपासकांनी मालगुंडला आवर्जून भेट दिली होती. आमच्यासारख्या वेड्या पीरांना तर त्यांचे नाव नित्य स्मरणीय वाटते.

मनामध्ये अवोध हुरहूर दाटलेली असतानाच मालगुंडमध्ये पाय ठेवला. गाव कसे टुमदार आहे! हिरवी आणि सोनसळा राने, नारळी-पोफळीची आगरे आणि वाऱ्याच्या गाण्यामागे तंवोरा वाजावा तसा लाटांचा आवाज, यांमुळे मालगुंड फार रम्य वाटते. तटस्थपणे विचार केला तर अशी अनेक गावे कोकणात असतील. पण इथे तटस्थपणे विचार करता येत नाही, हीच तर ग्यानबाची मेख आहे. गावाच्या सौंदर्याला अगदी इंद्रधनुष्यासारखे रंग असले तरी भावनेचा गुलजार कुसुंब्याचा हात त्यावरून फिरल्याशिवाय त्या सौंदर्याला पूर्णता येत नाही. सौंदर्य असते तिथे असतेच, पण त्याचे खरे रंग दिसतात ते भावनांच्या बहुरंगी लोलकातून त्याच्याकडे पाहिल्यावर.

मला आठवते, मी एकदा मुंवईच्या प्राध्यापकांना घेऊन मालगुंडला गेलो होतो. गावच्या सौंदर्याने सगळेच भारावले होते. पण एका व्यवसायबंधूंनी भाषण करून गावकऱ्यांना विचारले– 'बावांनो, इथला निसर्ग इतका सुंदर आहे की त्याची सोवत सोडून कशाला मुंबईकडे धाव घेता?' त्यावर एका मिष्किल मालगुंडकराने आभाराच्या भाषणात म्हटले होते– 'समुद्रात राहणाऱ्या माशाला समुद्राच्या पाण्याची भव्यता कशी दिसणार? तुम्हांला मालगुंड सुंदर दिसलं असेल, पण त्याचं काय आहे प्रोफेसर साहेब, गाव कितीही सुंदर असलं तरी अन्नोदकाची सोय व्हावी लागते ना? ती मुंबईस होते, म्हणून तिथे जावे लागते!'

मालगुंडकराचे हे म्हणणे बरोबरच आहे. पण तरीही मनात येते– उत्तम सारवलेल्या अंगणात निळ्या समुद्राभोवती शेलाट्या गोपींसारख्या उभ्या असलेल्या पोफळी आणि निसर्गाच्या बागशाहीत निगराणीशिवाय वाढलेली नाना तऱ्हांची सोयरीधायरी. आपल्या

आयुष्याभोवती असणारी अशी सुंदर चौकट सहसा कोणी मोडू नये. भौतिक सृष्टीचा आस्वाद घेणाऱ्या पंचेंद्रियांबरोबरच सुंदराचा वेध माणसाच्या मनाला लावणारी एक सहावी शक्ती असतेच, तिचीही थोडी कदर व्हावी.

मी कोण आहे? या प्रश्नाला अनेक उत्तरं संभवत असली तरी अंतिमदृष्टया मी एक कवी आहे, अशी माझी मनोमन निष्ठा आहे. त्यामुळे केशवसुतांचे नाव असलेली शाळा पाहून पुन्हा गणपतिपुळ्याला परतण्यापूर्वी मी परंपरेने रक्तात भिनवलेली एकच कृती करू शकत होतो, ती मी केली. मालगुंडच्या चिखलाचा टिळा मी माझ्या कपाळी लावला आणि त्याच्या कस्तुरीगंधाच्या कैफात परतीची वाट धरली.

आता मला रत्नागिरीचा वेध लागला. रत्नागिरीपासून अगदी जवळच आहे दोन गावांचे मिळून झालेले एकच जोडगाव– गोळप– पावस. स्वरूपानंदांचे पावस अलीकडे पुष्कळांना माहीत झाले आहे. पण तीर्थस्वरूप अण्णा म्हणजे एसेम जोशी यांचे गाव गोळप. तिथे १२ नोव्हेंबरला, म्हणजे एसेमच्या जन्मदिनी एसेमप्रेमी अनुयायांचा मोठा मेळावा आयोजित केला होता. ११ तारखेच्या रात्रीपर्यंत रत्नागिरीस पोचून १२ तारखेला सकाळी गोळपेस जायचे होते. कसा योगायोग पाहा– १२ नोव्हेंबर म्हणजे माझ्या वडिलांचा जन्मदिवस. पितृतुल्य तात्यांचा म्हणजे सेनापती बापटांचा आणि आपल्या अण्णांचा म्हणजे एसेमचाही जन्मदिवस. कसा तिहेरी योग! पुन्हा एसेमांचे गोळप हे आम्हां बापटांचेही गाव. इतकी वर्षे वयाला झाली, तरी एकदाही गोळपला, म्हणजे माझ्या गावाला गेलो नव्हतो. या पापाचे क्षालन करण्याचा दिवस तोंडावर येऊन ठेपलेला. आमच्या गोळप गावचे एसेम म्हणजे इनामदार. अनेक माणसे आजही त्यांना भाऊ इनामदारच म्हणतात. या गावात मला मात्र, हा आपल्या गावचा म्हणून कोणी ओळखत नाही. १८२८ साली माझ्या पणजोबांनी गोळप सोडले. त्यानंतर गोळपशी नाते तुटलेच. आता मात्र मी जाणार होतो, हरवलेले मूल आपल्या पायांनी घरी चालत येते तसा. ती एक विलक्षण हकीकत झाली.

तिचा हा नुसता आरंभ. गोळपला जाण्याच्या आदल्या रात्री किती वेळा कूस बदलली, किती अर्धवट स्वप्ने पाहिली, किती भास आणि आभास झाले ते सांगताही येणार नाही.

रक्ताची असते तशी मातीचीही ओढ असते का? का ज्याच्या त्याच्या रक्तालाच ज्याच्या त्याच्या मातीची ओढ असते?....

'गावी जाणे' हा शब्द मुंबईला वारंवार कानावर पडतो. मुंबईला मुंबईकर कमी, उपरेच जास्त. मालक मूठभर, बाकी सगळे पोट भरण्यासाठी आलेले. त्यांना मुंबईचा लळा लागतो पण ते मुंबईचे नसतात. मुंबई त्यांचं मायपोट खरं, पण माय नसते. त्यांची झोपडी किंवा राजवाडा मुंबईला असेलही. पण त्यांचं घर मात्र 'गावी' असतं. त्यांतलाच मी एक असायला हवा होतो. शिक्षणासाठी पुण्याला, भक्षणासाठी मुंबईला. 'घर' खरं म्हणजे 'गावी' हवं होतं. दर वर्षी नाही तरी निदान दोन वर्षांनी 'आपल्या गावी' जायचं असतं. पण तसा मी कधीच गेलो नाही. मीच काय पण माझे वडीलही 'गावाशी' कायमची ताटातूट झाल्यासारखे. आमचे पणजोबा म्हणे सन १८२८ मध्ये कोकण सोडून पुण्याला आले. एकदा निघाले ते निघाले. मागे वळूनसुद्धा पाहिले नसावे. पुढल्या तीन पिढ्यांनीही गोळप गावच्या घरअंगणाचा चुकूनही कधी आसरा घेतला नाही. माझ्या वडिलांच्या तोंडून कधीमधी गावाचं नाव निघे. आमच्याच गावचे कुणी काळे म्हणून पुण्याला शिंप्याचं दुकान चालवत. त्यांच्याकडून हापूसचे आंबे विकत घेण्याची माझ्या लहानपणी रीत होती. त्या निमित्ताने आम्हीं 'मूळचे' कुठले याचा क्वचित् उल्लेख होई. एरवी आम्ही गावकुसाबाहेरचेच झालो होतो. तरी म्हणे गोळप हे माझे गाव. काय अधिकार आहे मला असं म्हणायचा? एसेम वेगळे. ते अधूनमधून गावी जात आणि सदान्‌कदा गावाविषयी बोलतही. गावचे झाड न् झाड, खोपट न् खोपट, जोतं न् जोतं अक्षरशः खडान्‌खडा त्यांना माहीत. गाव गरीब असले तरी ते त्याला कधी कुग्राम म्हणाले नाहीत. ते गोळपचेच सुपुत्र आणि माझ्यासारखे कुपुत्र. पण म्हणतात ना, पुत्र सुपुत्र असो की कुपुत्र— माता कधीच

कुमाता नसते. 'क्वचिदपि कुमाता न भवति.' म्हणून तर ती मला बोलवत होती. अंतर कमी होत होतं. दिवसभर भटकून आलेलं मूल जसं आई रागवेल की काय, या भयानं, पण तरीही तिच्यापाशीच आपल्याला दयाछाया मिळेल या खात्रीनं घरात शिरतं, तसा मी पायावर भिंगरी असल्यासारखी भ्रमंती आयुष्यभर केलेला, निमित्त सापडल्यावर आता चक्क 'माझ्या गावी' निघालो होतो.

रत्नागिरीची शीव ओलांडून गोळपपर्यंत प्रवास करायला अर्धा तासही लागला नसेल. पण मनातलं विचारांचं चक्र वाटभर चालू असायची गरज नसते. ते क्षणार्धातच फिरतं आणि इकडची दुनिया तिकडे करून टाकतं. त्यामुळे तर वाडी वाडी मागे टाकून, खाडी भाटी ओलांडून आणि उजव्या क्षितिजावर पसरलेलं समुद्राचं पाणी पाहात गाडी गोळपच्या वेशीपाशी थांबली तेव्हा मी भानावर आलो. तिथे सुस्वागतम्‌ची कमान होती आणि एक गोळपकर स्वागतासाठी उभे होते. त्यांच्या अंगुलिनिर्देशाबरोबर मी किंवा खरं म्हणजे गोळपच्या मेळाव्यासाठी आलेल्या पाच-पंचवीस माणसांनी गावात प्रवेश केला आणि एसेमअण्णांचं घर गाठलं. वाटेला जेमतेम पायवाट म्हणता येईल; ती सतत वहिवाटल्यामुळे दगडगोट्यांच्या पायऱ्या झाल्या होत्या. एरवी ही वाट आहे असं म्हणणंही अवघडच होतं.

तशी मी अनेक गावे पाहिली आहेत. छोटी आणि मोठी. तरीही मला वाटलं, गोळप म्हणजे गोळपच आहे. घनगर्द झाडी, झावळांनी लपवलेली छपरं आणि आंब्या-फणसांपासून काटेरी झुडपांपर्यंत अनेकानेक झाडांनी माणसाच्या वस्तीवर मात केलेली. घर आणि घर गुडूप. मग त्या सगळ्यांचं मिळून होणारं गाव डोळ्यांना दिसावं कसं? पण आपलं गाव पाहायचं असतं ते डोळ्यांनी नव्हे तर मनानं, हा एक नवाच अनुभव आला.

जोशी म्हणजे इथले इनामदार. त्यांचं इनाम केवढं ते कोणी विचारू नये! पण तरीही ते इनामदारच. एसेमना कुणी एसेम म्हणोत किंवा अण्णा म्हणोत, गोळप गावाला ते भाऊ इनामदार. लंगोटीयारांचा भावड्या. त्यांच्या पिढीची किती माणसं आता राहिली असतील? जवळजवळ कोणीच नाहीत. भावड्या

इनामदाराच्या व्रात्य खोड्यांचं वर्णन करणारा आता कोणी हयात नाही म्हटले तरी चालेल. जे एकदोघे त्या दिवशी आमच्या भेटीला आले होते त्यांना आपण शाळेत कसे जात होतो, एका ठिकाणी कसे खात-जेवत होतो, एसेम पोफळीच्या झाडावरही कसे वानरासारखे सहज चढत, अशा चारदोन आठवणी होत्या. पण आपला शाळूसोबती मोठेपणी कोणी चरित्रनायक होणार आहे याची त्यांना विचाऱ्यांना काय कल्पना? त्यामुळे हकीगती ऐकण्यापेक्षा कल्पना करणंच जास्त सोपं होतं.

एसेमच्या घरात काय आणि गावात काय, त्यांच्या मताची माणसं दिसणं जवळजवळ अशक्यच. ती अपेक्षा करणंच चुकीचं आहे. माणुसकीच्या संबंधाने मात्र त्यांनी तिथेही अनेकांना बांधून घेतलं होतं हे कळत होतं, आणि ते पुरेसं नाही का? एसेम इनामदारांच्या अंगणातच गावकऱ्यांनी मांडव घातला होता. गावच्या मानाने घर फार मोठं नसलं तरी तसं प्रशस्त होतं. एसेमच्या स्वामित्वाची खूण एवढीच की तिथे त्यांच्या घरच्या देवांना विसावण्यापुरती जागा दिलेली होती. आपल्या घरात गरीब विद्यार्थ्यांना राहायला जागा मिळावी एवढ्याच इच्छेचा वारसा मागे ठेवून भाऊ इनामदार निवर्तले आहेत. १२ नोव्हेंबरच्या सकाळी त्या अंगणात सुंदर मेळा जमला होता. कोणी अरत्रीचे, कोणी परत्रीचे. त्यांत एसेम सर्वत्रीचे. कोणी गाणी म्हटली, कोणी भाषणे केली- ते सगळे तपशील रंजक आणि उद्बोधक असले तरी ते लवकरच विरून जातील आणि दरवळत राहील एसेमांच्या स्मृतींचा प्राजक्तासारखा दरवळ.

गोळपेहून पावसला समता दिंडी निघाली. पावसच्या शाळेतली मुलंमुली आणि पक्षपंथ विसरून, कामधाम बाजूला ठेवून निघालेली वाप्येमाणसं- मोर्चा तसा रोड वाटत नव्हता. सजवलेल्या बैलगाडीत अण्णांची प्रतिमा ठेवलेली होती, मुलं त्यांचा जयजयकार करत होती, झिंदाबाद म्हणत होती, 'एसेम जोशी अमर रहे' असा तद्दन आधुनिक घोषही करत होती. त्या जल्लोषात आणि उत्तट होत

चाललेल्या उत्साहात दिंडी पावसला आली. ज्या शाळेत मेळावा भरला होता तिचे प्रमुख भाई सामंत मात्र साथी एसेम जोशी यांचे चक्क अनुयायी होते. त्यांच्या नेतृत्वाखाली परिश्रम करणाऱ्या लहानथोर ग्रामस्थांनी उत्तम पाहुणचार केला. रुचकर जेवण आणि वर शिरा नावाचा गोड धक्का.

दुपारी मेळावा भरला. डोक्यावर छताचं आच्छादन असलं तरी ते ऊन रोखण्याइतकं बळकट कसं असणार? भर मध्यान्हीच्या चांदण्यात मेळावा संपन्न झाला. एवढ्या उन्हात आम्ही केलेली भाषणं ऐकून घेणाऱ्या सकल गोळप-पावसवासीयांनी सोशीक मनानं आम्हांला क्षमा केली असेल अशी आशा आहे. आपणा सर्वांचीच ही गंमत आहे... देवभक्ती असो, देशभक्ती असो की ध्येयभक्ती असो– यांपैकी कसलाही अंमल मनावर चढला की देहसुखाची आपण कुरवंडी करून टाकतो.

स्वामी स्वरूपानंद आता समाधिस्थ आहेत. ते एक साधक होते. कदाचित सिद्धही असतील, पण गंडेदोरे देणारे, आधिव्याधींवर क्षणार्धात उतारा देणारे बुवा नव्हते. ज्ञानदेव नामक सूर्याभोवती निर्माण झालेल्या संतमंडळींशी आंतरिक जवळीक शोधणारे एक प्रज्ञावंत पुरुष ही पदवी त्यांना शोभेल. त्यांची कीर्ती महाराष्ट्रात सर्वदूर पसरत गेली आणि आज गोळप एसेमचं तसं पावस स्वरूपानंदांचं असं म्हणावं लागेल.

आश्रम स्वच्छ आहे. समाधिस्थानही निर्मळ आणि नीट आहे. क्वचित् धूपदीपनैवेद्याचा भाविक गंध वातावरणात असला तरी कसलंही अवडंबर नाही. मला स्वामींच्या प्रभावळीतील देसायांनी फार आदरानं वागवलं आणि त्यांच्या श्रद्धेप्रमाणे प्रसादही दिला. मी मात्र माझ्याशी प्रामाणिक राहून स्वरूपानंदांच्या हस्ताक्षरातली ज्ञानेश्वरी प्रसाद म्हणून घेऊन परतलो.

भरल्या मनाने आणि शिणल्या देहाने पुन्हा एकदा रत्नागिरी गाठली. दिवेलागणीनंतर मात्र रत्नागिरीच्या वाचनालयात चर्चा आणि गप्पागोष्टी करण्यासाठी हजर झालो. डॉ. शिंद्यांच्यासारखी जुन्या

ओळखीची माणसं आणि बरीचशी अनोळखी माणसं यांच्या गराड्यात जाऊन थोडा काव्यशास्त्रविनोद केला. साहित्यसंमेलन भरवावं की भरवू नये? त्याचं स्वरूप बदलता येईल का? अध्यक्ष निवडावा की निवडू नये? अशा ग्रंथोपजीवींच्या जगातल्या शिळोप्याच्या गप्पा झाल्या. १९७८ साली रत्नागिरीच्या वाचनालयाला दीडशे वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्त बापट-पाडगावकर-करंदीकर या कवित्रयाचा कार्यक्रम झाला. तो कवींच्याच नव्हे तर ऐकणाऱ्यांच्याही स्मरणात राहिला आहे त्या अर्थी चांगला झाला असावा. त्या वेळी वाचनालयाच्या शेरेबुकात गंमत म्हणून मी लिहिले होते– 'ज्या वर्षी या ग्रंथालयाची स्थापना झाली त्याच वर्षी माझ्या पूर्वजांनी पुण्यास स्थलांतर केले; यावरून आमच्या घराण्यात विद्येचे प्रेम किती आहे ते कळते.' ही आपली उगीचच केलेली स्वतःची थट्टा. ज्या अर्थी माझी पावले पुन्हा या ग्रंथालयाकडे वळली त्या अर्थी माझ्या त्या लिहिण्यात काहीच तथ्य नसावे.

रत्नागिरी. ब्रह्मदेशचा राजा थीबा याला हद्दपार करून रत्नागिरीला आणून ठेवले होते आणि भारतवासीयांच्या हृदयसम्राटाला– रत्नागिरीत जन्मलेल्या लोकमान्य टिळकांना–इंग्रजांनी ब्रह्मदेशात नेऊन ठेवले होते. भारतीय माणूस रत्नागिरीत शिरतो तेव्हा थीबाच्या पायरीला हात लावून पुढे जातो आणि मग त्याला त्याची मंदिरे दिसतात. लोकमान्य टिळकांचे रत्नागिरी हेच जन्मस्थान. ते इथले प्रमुख मंदिर. दुसरे मंदिर कोणते? वीर सावरकरांना जेथे चौदा वर्षे डांबून ठेवण्यात आले होते, ते त्यांचे घर. आणि तिसरे त्यांच्या प्रेरणेने भागोजी कीर या दानशूराने निर्माण केलेले पतितपावन मंदिर. आपल्या नातवाची अभिनव मुंज करणाऱ्या एसेमांनी त्याला प्रथम आपल्या गावाचे दर्शन घडवले आणि मग या तिन्ही मंदिरांत त्याला नेऊन आणले. बस्स! उपनयनविधी हा एवढाच! ही छोटीशी यात्रा करायचे भाग्य मलाही लाभले. नशीब एवढेच की, पालगडला साने गुरुजींविषयी किंवा मुरूडला कर्व्यांविषयी जशी अनास्था अनुभवावी लागते तशी अनास्था रत्नागिरीत तिथल्या महापुरुषांविषयी जाणवत नाही. स्मारके मात्र यथातथा. काही भव्य आणि सुंदर


स्मारक उभारण्याची भारतीयांची शक्तीच एकूण कमी. त्यात महाराष्ट्रात अधिकच कमी. आणि महाराष्ट्रातही कोकणामध्ये हे प्रमाण खूपच कमी होणे स्वाभाविकच आहे. त्यातल्या त्यात लोकमान्यांचे स्मारक साधे आणि स्वच्छ आहे हे काही कमी नाही.

रत्नागिरीचा मुक्काम हलवून मालवणकडे प्रस्थान ठेवले तेव्हा मुशाफिराची पडशी उत्तरोत्तर हलकी होत गेली नाही; उलट कोकणात मिळालेल्या प्रेमोपहाराने ती जड झाली आहे, हे आतल्या आत कळत होते. काही हरपलेले श्रेय गवसलेले होते, अनेक सद्‌भावनांचे धन जोडलेले होते आणि स्नेहाचे नारळही भरपूर मिळालेले होते.

पण अजून कोकण संपलेले नव्हते. आता दिशा होती दक्षिण कोकणाची, तळकोकणाची. माडपोफळींनी उभवलेल्या हिरव्यागार नंदनवनाची. मनाच्या वारूवर हलकेच थोपटून गुणगुणलो-

'चलो मन सिंधुदुर्गके तीर'


000



३.

# कोकणातली भ्रमंती : खालची आळी

माझ्या लेखी बऱ्याचशा गावांची समीकरणे तिथल्या विशिष्ट व्यक्तीवरोबर किंवा वल्लीवरोबर मांडलेली असतात. मला वाटतं आपल्यापैकी पुष्कळांचं असंच असेल. अमुक अमुक गाव म्हणजे तमुक



तमुक माणूस. जसं काही तिथे दुसरं कोणी वस्तीला नसतंच. मालवण हे यांपैकी एक गाव आहे. तिथे ज्यांच्याशी माझा संबंध आला अशी माणसं काही कमी नाहीत. त्यांची यादी मी मनातून पुसलेली असते असं बिलकुल नाही. तरीही मालवणला जायचं म्हणजे मधू वालावलकरकडे जायचं असं माझं समीकरण असतं.

एसेमांच्या जयंतीला मधू गोळपेस हजर होता. पण त्याचं मन समता मेळाव्यापेक्षा माझ्यातच जास्त गुंतलेलं असावं. मागे एकदोन वेळा मी येतो

असे कळवून जाऊ शकलो नव्हतो. त्यामुळे या खेपेस माझी वेसण रत्नागिरीला येऊनच घट्ट धरावी असं त्यानं मनोमन ठरवलं असावं. मनोमन म्हणण्याची कारण असं की, मधू कधी कोणतीही गोष्ट सरळपणे सांगत नाही. स्वभाव सरळ आणि बोलणं शपथेवर तिरकस, अशी मोठी अजब वल्ली आहे ही.

'रत्नागिरीहून मालवण किती लांब आहे?' या सवालाला मधूची उत्तरं संभवतात ती अशी– 'आम्ही एस.टी.त बसतो आणि जातो. या चौकशा करतो कोण?' किंवा 'मी नुसता तुमच्या मोटरमध्ये बसणार आणि येणार. अंतर किती ते तुमचं तुम्ही पाहून घ्या.' किंवा 'चार पाच तास लागतील. अर्थात मधे तुमची मोटर बिघडली नाही तर!'

मालवणचा कार्यक्रम काय आहे, या प्रश्नावर मधू म्हणाला, 'तुम्ही पत्र वाचत नाही का? मी पत्रात सगळं लिहिलंय, एक तास मला हवा आहे. तेवढा देणार की नाही, एवढं मला सांगा.' अशा वेळी आपण निमूट बसलेलं बरं असतं. मधू जिथे नेईल तिथे जात राहावे आणि जे जे सांगेल ते ते करीत जावे, तात्पर्य– तुका म्हणे माझा मधूवरी भार, वेगळा विचार करो नये, हे सर्वांत शहाणपणाचे.

रत्नागिरी सोडल्यावर मालवणकडे जाताना आसमंत पालटू लागतो. उत्तर कोकणातून दक्षिण कोकण नावाच्या अंमळ वेगळ्या प्रदेशात जाता जाता सृष्टीचे रूप अलगद अलगद वेगळी छवी दाखवू लागते. वाटभर बडबड करण्याचा माझा शिरस्ता मधूमुळे मोडलेला होता. प्रवासात प्रमुख वक्ता तो आणि आपण सोशिक श्रोते ही स्वाभाविक विभागणी मी स्वीकारली होती. माझ्या बरोबर सहधर्मचारिणी होती आणि सहचर डॉ. देशपांडेही होते. पण त्यामुळे मधूच्या धाटणीत फरक पडायचे काही कारण नव्हते, त्यांचा आणि त्याचा हा पहिलाच परिचय असला तरीही. डॉक्टरने मालवणची लोकसंख्या किती असे विचारले की, 'मामलेदाराला विचारा– मला काय माहीत?' किंवा 'पुण्याची लोकसंख्या तुम्ही मोजलीत?' हे उत्तर मधूकडून तडफेने येणारच. टेनिसच्या खेळात चेंडू जमिनीवर पडला न पडला तोच उलट फटकारण्याचं एक तंत्र असतं, त्याला हाफ व्हॉली म्हणतात. मधूची उत्तरं त्या तंत्रानंच दिलेली असतात. हा खेळ सहप्रवाशांवर सोपवून आणि स्वतःकडे तिय्यम दर्जाची भूमिका

घेऊन आपण पेंगावे किंवा बाहेरच्या झाडामाडांचे मनसोक्त दर्शन घेत राहावे. मुख्य रस्ता सोडून गाडी योग्य वळणावर उजवीकडे वळली नाही म्हणून जरा लांबचा वळसा पडला. 'तू का सांगितलं नाहीस?' या प्रश्नावर मधू म्हणाला, 'मी केव्हाच सांगितलं होतं, पण गाडी चालवणारानं ते लक्षात ठेवलं नाही त्याला मी काय करणार?'

रत्नागिरी भराभर मागे पडत गेली. वाटेवरच्या गावांतनं बाजार भरलेले दिसले. हे आठवडी बाजार रेंगाळत रेंगाळत पाहावे असा मला षौक आहे. पूर्वी पुण्यालाही आठवडी बाजार भरत असला पाहिजे. आताही भरतो, पण त्याला जुना बाजार असं नाव मिळालेलं आहे. त्यालाच कोणी कोणी चोर बाजार असेही म्हणतात. इमानदार आठवडी बाजार यांपैकी नव्हेत. इथे सगळं नवं आणि ताजं असतं. फळं आणि रानचे मेवे, सटरफटर भाजीपाले, दवादारू आणि जडीबुट्टया, खिळे-मोळे, कोयते-कुदळी, सुतळ्या आणि दोरखंडे, गुराढोरांचे साज-सरंजाम किंवा प्रत्यक्ष गुरेच. सारांश गावगाड्याच्या प्रपंचाला लागणारी सगळी सामग्री या बाजारात मांडलेली असते. आमचं लक्ष बोरांवर आणि पेरूंवर! मला वाटतं कविकुलगुरू कालिदासालादेखील मला असतं तसं कुतूहल असावं. रघुवंशाचा पहिला नायक, राजा दिलीप जेव्हा राणी सुदक्षिणेसह राजधानीतून आश्रमाकडे जातो तेव्हा त्याचा प्रवास कसा झाला याचं फार हृदयंगम चित्र कालिदासानं काढलं आहे. अर्थातच कवीनं आपल्या आवडीनिवडी आणि आपला चौकसखोरपणा आपल्या राजाला बहाल केला असला पाहिजे. वाटेत दिसलेले वृक्ष आणि वेली, पशू आणि पक्षी यांची नावं पुसावी किंवा सांगावी, आपल्याला माहीत नसली तरी वाटेत भेटणाऱ्या गवळ्या-गौळणींजवळ चौकशी करावी, तर कधी स्तब्ध राहून मोरांच्या दुस्तरी केका ऐकत राहावे ही राजा दिलीपाची रीत, म्हणजेच कालिदासाची रीत, म्हणजेच आपलीही रीत नसावी का?

या वेळी मालवणमधलं माझं मुख्य आकर्षण होतं ते नाथ पै सेवांगणाचा परिसर जवळून पाहाण्याचं. 'तुझं नवं नाथ पै सेवांगण कुठपर्यंत आलं आहे?' हा प्रश्न पुरा होतो न होतो तो मधू म्हणाला, 'ते माझं नाही, तुमचं आहे. तुम्ही त्याच्या संस्थापक सदस्यांतले एक आहात. कधी आलात? काम कसं चाललंय ते पाहिलंत? ती चूक आता निस्तरा!'–

मी निस्तरली! सेवांगण पाहायलाच गेलो असं नाही, पथाऱ्याच तिथं टाकल्या. मालवणला आरसेमहाल नावाचं सरकारी विश्रामगृह आहे तेही किनाऱ्यापाशी आहे, सुंदर आहे आणि आरामात राहावं असं आहे, असं मी ऐकलेलं होतं. पण नाथ पैंच्या नावाची वास्तू आता उभी राहिलेली असताना दुसऱ्या महालांचा विचार करायचं मला कारणच नव्हतं.

*"उंच उंच माड्या नाहित कामाच्या*
*साधुची झोपडी बरी*
*उद्धवा चल जाउ विदुराघरी।"*

या कृष्णवचनाचा माझ्या मनावर फार मोठा ठसा उमटलेला आहे. मला आराम आवडतो, मी विश्रामप्रिय आहे. प्रमाणात का होईना पण सुखोपभोग मला प्रिय असतात. या माझ्या स्वभावाला आपोआप मुरड पडते ती आयुष्यात स्वीकारलेल्या काही मूल्यांमुळे. पण त्यापेक्षाही अधिक म्हणजे मनापासून जोडलेल्या स्नेहबंधांमुळे. मालवणला नाथ पैंचे स्मारक म्हणून सेवांगणाची संकल्पना आकार घेत आहे. सुमारे एक एकर जागेवर साध्या पण सुरेख इमारती उभ्या राहत आहेत. सभागृह आणि कार्यालय तयार आहे. अतिथिगृहाचं बांधकाम बऱ्याच अंशी पूर्ण झालं असलं तरी रंग, दिवाबत्ती वगैरे कामं अवशिष्ट आहेत. पण म्हणून काय झालं? मुक्कामाला अडचण कसली? अंग टाकण्यापुरती जागा आणि सतरंजी, आणि उशाला घेण्यासाठी चादरींच्या घड्या, हा सरंजाम काय कमी झाला?

जिकडे जातो तिकडे माझी भावंडे असल्यामुळे आणि मुख्य म्हणजे ज्ञानेश देऊलकरांचं घर शेजारीच असल्यामुळे जेवणखाण, चहापाणी यांची दरोबस्त सोय होती. अन्न रुचकर होतंच, पण त्याची रुची प्रेमानं अधिकच वाढलेली होती. ज्ञानेश म्हणजे निरलस श्रम घेणारा मालवणचा बिनीचा कार्यकर्ता. आम्ही पोचलो त्या दिवशी ज्ञानेशची आणि आमची गाठभेट झाली नाही. तो गोळपलाही आला नव्हता. तो गुंतला होता मच्छीमारांच्या सत्याग्रहात. यांत्रिक मच्छीमारांच्या होड्या-पडावांची हालचाल अशक्यप्राय करून ठेवल्यामुळे त्यांना आंदोलनाशिवाय पर्यायच उरलेला नव्हता. ज्ञानेश म्हणजे साने गुरुजींचा धडपडणारा मुलगा, एसेम अण्णांचा सच्चा अनुयायी आणि सौम्य वागणारा, बोलणारा, मात्र प्रखर

वाण्याचा माणूस. मच्छीमारांच्या मोर्चात तो अग्रभागी नसता तरच नवल. अशी माणसे म्हणजे ध्येयधुंद सैनिक. माझ्यासारखी माणसे मांडवशोभेची.

मालवणला ज्ञानेश असो की नसो, मधू तर होता ना? त्याची ओळख सर्वांशी. ए जन्या, ए वब्या अशा सलगीची. मधूचा वेष म्हणजे गुडघ्याखाली दोन बोटे लांब पाटलोण आणि तुटलेल्या किंवा हरवलेल्या गुंड्यांचा अर्ध्या बाह्यांचा सदरा. डोई टोपी नाही, पायीं पायताण नाही. लहर लागली तर केली दाढी, नाही तर लागेना का वाढी! संसाराचा पाश अजाबात नाही. पुन्हा हे सारे अंगचेच. आटापिटा करून घेतलेला संन्यास नाही. गाजावाजासह केलेला त्याग नाही. मनाचा दिलदार. शंभर नंबरी सच्चा. आपल्या मूल्यांविषयी एकदम कडवा. सर्वांच्या सेवेसाठी सदा सिद्ध. त्याच्याबरोबर मालवणमध्ये फिरणे हा एक निराळाच अनुभव असतो.

एका प्रसन्न सायंकाळी पन्नास-शंभर माणसांची छोटीशी सभा झाली. विषय नव्हता. फक्त एक अघळपघळ नाव– साहित्यिक गप्पागोष्टी. गोष्टी फार मनमोकळेपणाने झाल्या. हास्यविनोदाची कारंजी उडाली, आणि थोडाफार काव्याचा जल्लोषही झाला. खरी गोष्ट अशी होती की माझ्याशी अमोरसमोर पुनर्भेट व्हावी एवढाच सभेचा हेतू होता, तो निश्चितच फळाला आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सिंधुदुर्गाच्या भेटीचा कार्यक्रम होता. हा सिंधुदुर्ग माझा जुना मित्रच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अलौकिक दूरदृष्टीचा सज्जड पुरावा म्हणजे हा सिंधुदुर्ग. मुळात कोणा चौहाणांनी तो उभवला म्हणतात. पण त्यात प्राण भरला आहे शिवाजीराजांनी. दर्यावरून येणाऱ्या हबशी, फिरंगी, वलंदेज, डिंगमार, फराशिस आणि टोपीकर इंग्रेज या सर्वांचा बंदोबस्त करायचा तर दर्याला पालाण घातले पाहिजे, हे ओळखणारा आणि या कामासाठी लढाऊ आरमार उभारणारा पहिला आणि शेवटचा शककर्ता राजा फक्त शिवाजीच. सह्याद्रीपाठी सत्तावीस किल्ले बांधले तसे अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर पक्क्या तटबंदीचे कोट निर्माण केले ते शिवाजीने. सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि असेच आणखी कितीएक. या दुर्गांच्या बळकटीचा आधार घेऊनच पावसाळ्यात मराठा दर्यावर्दी मोहिमा निघत. हबशी, इंग्रज आणि पुर्तुगीज, सर्व

भ्रू-प्रवास
१९५

आरमारांचा पराभव करून आपले झेंडे समुद्रावर दिमाखात फडकत ठेवणाऱ्या कान्होजी आंग्रे यांच्यासारख्यांच्या वहादुरीची अदृश्य निशाणे आजही या जलदुर्गावर मला दिसतात. मराठ्यांच्या या अद्वितीय मर्दुमकीचा मला अभिमान वाटतो आणि मग ही शहाणपणाची दौलत आपल्या हाताने समुद्रात बुडवून टाकणाऱ्या करंट्या मराठा सरदार मंडळाची शरम वाटते, अतोनात शरम वाटते.

सिंधुदुर्गाच्या समीपदर्शनाला जायचे नाही तर मालवणला यायचे कशाला? मधूने पहाटे साडेपाच वाजताच बोलावून ठेवलेल्या होड्यांचे वल्हकरी आम्ही साडेसातला किनाऱ्यावर आल्यामुळे थोडे कातावले होते. पण जास्त शहाणपणा न करण्याचा करडा सल्ला त्यांना मधूने दिला आणि त्यांनीही अधिक कुरकूर न करता तो स्वीकारला.

दुर्गाचा तट बराच शाबूत आहे. अर्थात काही ठिकाणी तो ढासळलेलाही आहे. काही डागडुजी पुराणवस्तू संशोधन खात्याच्या कारभाऱ्यांनी करवून घेतली तर काही यशवंतराव चव्हाण यांच्या साहाय्यामुळे होऊ शकली. पण अजूनही पुरेसे लक्ष दिलेले नाही असे म्हणणे भाग आहे. सिंधुदुर्गावर भवानीचे मंदिर आहे, तसे शिवाजीचेही आहे! वहुधा मुळात ते मंदिर 'शिवजी'चे. 'व'चा 'वा' होण्यासाठी मंदिरातल्या मूर्तीच्या मुखावर जिरेटोपासह मुखवटा चढवण्यात येतो आणि खांद्यापासून पावलांपर्यंत मूर्तीच्या अंगावर वस्त्र लपेटले जाते. पश्चिमेकडे टेहळणीचे बुरूज आहेत आणि ध्वजस्तंभाचा चौथरा आहे. त्याच्यावर उभे राहिले तर अथांग समुद्राचा केवढा तरी विस्तार नजरेत भरतो. तो विस्तार जेव्हा शिवरायाने पाहिला असेल तेव्हा त्याचे बाहू आणि त्याचे मन, दोहोंना केवढे स्फुरण चढले असेल? आम्ही त्याचे नाकर्ते आणि निकम्मे वंशज. आम्हांला अशी स्थाने सुरक्षित आणि सुंदर ठेवण्याची निकड अजिबात वाटत नाही. राणीवशाच्या स्नानासाठी खास आडोसा केलेल्या पुळणी ओस पडल्या आहेत. तटांना भगदाडे पडली असली तरी मूळ बांधकाम भले मजबूत केलेले होते याचा प्रत्यय आजही येतो. पाण्याखालच्या खडकावर तटबंदीचा पाया घातला तेव्हा त्याच्या भक्कमपणासाठी शिसे वापरले होते असे म्हणतात. तटांचे दगड ज्या चुन्याने वसवले गेले तो इतका दर्जेदार होता की उरलेल्या चुन्याचे पडलेले ढीग

आता काळ्या कातळासारखे वज्रदेही झालेले आहेत. ते पहारींनीही फोडणे शक्य होत नाही. प्रवेशद्वार दक्षिणेच्या तटाच्या कुशीत आहे आणि वर नगारखानाही आहे. आता नगारे आणि चौघडे अर्थातच मूक झालेले आहेत. पायवाटांवर रान माजलेले आहे. किल्ल्यात नारळाची झाडे आहेत पण त्यांना खत नाही आणि पावसाशिवाय पाण्याचे शिंपण नाही. त्यामुळे यावे तसे नारळाचे पीक कुठून येणार? आहेत त्या माडांची शहाळी मात्र गोड, थंडगार पाण्याची आणि सायीसारख्या अलवार खोबऱ्याची आहेत. एके ठिकाणी एका दगडावरच्या चुन्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पंजा उमटलेला आहे अशी बोलवा आहे. कदाचित तो भावनेला, श्रद्धेला झालेला भ्रम असेल. एक मात्र प्रत्यक्ष प्रचितीची गोष्ट आहे. भूमीपासून मैलभर आत असलेल्या सिंधुदुर्गाच्या आत चक्क गोड्या पाण्याची विहीर आहे. तशीच दुसरी विहीर खोदावी म्हणून प्रयत्न केला तर तिचे पाणी मचूळ निघाले. काय असेल ते असो. पायाळू माणसाला गुप्त धन दिसते अशी एक लोकसमजूत आहे. छत्रपती शिवाजीच्या नजरेला भूगर्भात गोड पाणी कुठे आहे हे नक्की कळत असावे, याची साक्ष अलिबाग आणि मालवणला मिळते. किल्ला– मग तो भुईकोट असो, गिरिदुर्ग असो की जलदुर्ग– जिथे मुबलक गोड पाणी नाही तिथे तो उभाच राहू शकणार नाही ही छत्रपतींनी पक्की खूणगाठ बांधली होती.

उपयोग काय या गौरवगाथेचा? आज सिंधुदुर्ग भग्न आहे, विषण्ण आहे. त्याचा आम्हांला काहीही उपयोग नाही. न त्याच्या तटापाशी मोती वेचता येतात, न तिथल्या शंखशिंपल्यांचा बाजार मांडता येतो! तिथे जत्रा भरू शकत नाही की भेळपकोड्यांची दुकाने घालता येत नाहीत. मालवणच्या किनाऱ्यापासून तसा तो फटकून उभा असल्याने गावाचा विशाल संडास होण्याचे भाग्यही त्याला लाभलेले नाही. गडावर पाचशे माणसं राहायची. आता जेमतेम ४०/५० म्हातारेकोतारे उरले आहेत. बाकी सगळे मुंबईला चाकरमाने झाले आहेत. त्यांच्याकडून येणाऱ्या मनिऑर्डरीवर किल्ल्यातली माणसे आपला जीव जगवत आहेत. किल्ल्यात सुमारे बावीस जणांना पगार दिला जातो. तो फारच भारी, म्हणजे प्रत्येकी महिना सात रुपये आहे. भवानीच्या मुख्य पुजाऱ्याला दरमहा चक्क वीस रुपये मिळतात. यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी सिंधुदुर्ग वर्षासन

हजारावरून पंधराशेवर नेले, आणि बॅ. अंतुल्यांनी ते पाच हजार केले. आजच्या हिशेवाने एखाद्या अकुशल कामगाराला सुद्धा यापेक्षा जास्त पगार मिळत असेल. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी गडावर दिवाबत्ती केली. पण वस्तीसाठी तिथे राहिलेल्या किंवा ठेवलेल्या, माणसांच्या पोटात उसळणाऱ्या आगडोंबाचा विचार कोणीच केला नाही. किल्ल्याचे सकपाळ म्हणून सरपंच आहेत. हा एक इमानमदार, ताठ कण्याचा माणूस आहे. गंमत म्हणजे एके काळी सरपंच सकपाळ यांनी सेवादलाची शाखा चालवली होती. ते मधू वालावलकराचे अर्थातच मित्र आहेत. सेवादल परिवारानेही त्यांची आठवण असो द्यावी.

माणसांचे राहू दे. ती बापडी खपता खपता एक दिवस मरून जातील. पण खुद्द सिंधुदुर्गाचे काय? मालती तांबे–वैद्य यांच्यापासून पर्यटन खात्याच्या अनेकांनी या जागेची पाहणी केली आहे. घनचक्कर गर्दीपासून लांब आणि घनश्याम समुद्राच्या मात्र अगदी समीप असे एक सुंदर पर्यटन केंद्र इथे उभे राहू शकेल, पण नको! तसे झाले तर इथे आधुनिक आणि आडव्या-उभ्या इमारती उभ्या राहतील. त्यांत अठरापगड जातीचे उनाड राहायला येतील. ते बेंडबाजे वाजवतील, अचकट विचकट गाणी म्हणतील. इथे बीअरबार आणि दारूचे गुत्ते येतील आणि दारुगोळ्यांनी केला नसेल एवढा विध्वंस या दारूगोळ्याने करतील! या असल्या विहारा( !)पेक्षा लढाऊ नाविक शिक्षणकेंद्र सिंधुदुर्गावर उभे राहू शकेल. कोळ्यांची पोरं दर्याला भीत नाहीत म्हणतात. मग द्या ना त्यांना इथे शिक्षण, नौकादलात सामील होण्यासाठी! उभारा की सिंधुदुर्गाच्या आश्रयाने पाणबुडी प्रशिक्षणाचा तळ! चारपाचशे मैलांचा किनारा लाभलेला असूनही महाराष्ट्राचे क्षात्रतेज दर्यावर्दीपणाकडे पाठ फिरवून पहुडलेले आहे. त्याला जाग येण्यासाठी असे काही उपक्रम हाती घेता येणार नाहीत का? समुद्राच्या तळाशी असलेली अद्भुत सृष्टी, जीवांची, वनस्पतींची, खनिजांची आणि अवशेषांची– सिंधुदुर्गावर एखाद्या उद्यानात आणि अजबखान्यात तिची निश्चित मांडणी करता येईल आणि शक्य तर तिच्या अभ्यासासाठी एखादी संस्थाही उभी करता येईल. पण कसचे काय आणि कसचे काय? आपण एक कृतघ्न राष्ट्र आहोत. आपला समाज अभिक्रमशीलता हरवून बसलेला आहे. सत्ता, संपत्तीचे मक्तेदार फक्त स्वार्थ

ओळखतात आणि खुर्च्यांचा खेळ खेळतात. तिथे मीच काय, पण अवघ्या प्रज्ञावंतांनी आणि भविष्याच्या शिल्पकारांनी कितीही हाकाटी केली तरी ते केवळ अरण्यरुदन ठरेल असाच वर्तमानकाळ आपण अनुभवतो आहोत. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' निश्चित लाभेल, असा विनायक कवीचा विश्वास होता. पण दिव्य भूतकाळ आणि उज्ज्वल भविष्यकाळ यांना सांधणारा पूलच जिथे भिकार आणि बिनभरवशाचा आहे तिथे कोणी कशाचा हवाला, कशासाठी द्यायचा?

भारावलेल्या पण काहीशा उदास मनाने पुन्हा मालवणकडे परत फिरलो.

खारा वारा पिऊन भूक लागली होती. आधी विठोबा आणि मग पोटोबा असा उलटा क्रम करणे भागच होते. मधूने पाहुणचाराचा शेवटचा हप्ता चुकता केला.

आमच्या स्वाऱ्या सावंतवाडीवरून आंबोली घाटाकडे आणि पुढे घाटावरच्या आवडत्या शहराकडे म्हणजे बेळगावकडे निघाल्या. जे शब्दांनी सांगता येत नाही ते डोळ्यांनी सांगता येते, स्पर्शाने सांगता येते. हातात हात घेऊन भरल्या डोळ्यांनी, भरल्या कंठाने आणि भरल्या मनाने मालवणच्या आमच्या खास प्रतिनिधींचा निरोप घेतला. खरं म्हणजे आंबोलीचा सुंदर घाट, बेळगावपर्यंतची मऊसूत वाट आणि बेळगावला इंदिरा संतांची- भेटगाठ होणार असलेली माझ्या अक्कांची, जागेपणी दिसणारी ही एक दुसरी स्वप्नमालिका की! पण शहाण्या माणसानं एका पोताच्या सणंगाला दुसऱ्या पोताचं सणंग ठिगळासारखं जोडू नये.

ooo



४.

# रंगीला राजस्थान

राजस्थान, रंगीला राजस्थान.

उदयपूर शुभ्र शहर, जयपूर गुलाबी तर जेसलमेर सोनेरी. उदी रंगाच्या प्रचंड रेताडावरून ये-जा करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या – त्यांतही स्त्रियांच्या वस्त्रांचे रंग तरी किती उजळ आणि एकदम प्राथमिक! पिवळ्या, तांवड्या, निळ्या रंगांची वटबटीत पण डोळ्यांत भरणारी उधळण.

भरघोस गल्लमिशा मिरवणारे, डोईजड फेटे बांधलेले अक्कडबाज पुरुष. घोळाचे घागरे, नवरंग चोळ्या आणि नाममात्र अंग झाकणाऱ्या भडक ऐनेबाज ओढण्या – हा स्त्रियांचा लिबास.

राजवाडे पाहावेत तर एकाहून एक श्रीविशाल. दिवाण-साहुकारांच्या हवेल्या, उत्तुंग बांध्याच्या नक्षीकामाने नखरेल केलेल्या आणि पाहणाऱ्याच्या मनाच्या अचंब्याचा पचंबा करून टाकणाऱ्या. जयपूर-जोधपूर-बिकानेर-उदेपूर-कोटा-बुंदी अशी धनंतर संस्थाने तर राजस्थानात होतीच; पण या मोहोरांच्या जोडीला चिल्लर चवल्या-पावल्यांचा खचही होता.

राजस्थान, नावाप्रमाणेच राजांची भूमी!

राजे म्हटल्यावर लवाजमे आलेच. प्रत्येकाच्या वाड्यातले औडक चौडक चौक. महाप्रमाण महाल. गजबजलेल्या अंतःपुरासाठी ठायीठायी झरोके – सगळे एकजात वन्-वे!... आतून बाहेरचे सर्व पाहता येईल, पण बाहेर असतील त्यांना दर्शनमात्राचेही काम नाही!

भिंतींवर, छतांवर, तुळयांवर, खांबांवर, दाराखिडक्यांच्या कवाडांवर... कुसरदार वेलपत्त्या. ठायीठायी पुष्करिणी. फागात रंग खेळण्यासाठी बागा. सबकुछ शाही थाट. आजही जुन्या काळच्या

लवाजम्यांचे वंशज पालथी मूठ उलथ्या मिशांवर फिरवीत आपापल्या अन्नदात्यांची स्तुतिस्तोत्रे अभिमानाने गात असतात.

एक काळ असा असेल – हत्तीवर अंबारीत वसून श्रीमंत फिरत असतील. मर्दान्याच्या मागोमाग दासांच्या खांद्यांवरल्या नालख्या-पालख्यांतून जनाना जात असेल. उंटांच्या पाठीवर जरीमोत्यांनी मढवलेली जीने असतील. स्वारीशिकारीला जाणारे ताफे ताशेमर्फे वाजवीत दिमाखात नगरातून प्रयाण करीत असतील. सुगंधाची पखरण असेल. मालपुव्याच्या मेजवान्या झडत असतील आणि मुघल मालकांनी बहाल केलेल्या इराणी सुरयांतून अक्कडबाज रजपूत राजेरजवाडे सुरा झोकत असतील. हे आणि असेच खूप काही असेल.

तो काळच असा होता. श्रीमंतांच्या वाट्याला सारा रोब आणि रोशनी, तर गरीब रयतेच्या वाट्याला दैन्य आणि दारिद्र्य यांची अवकळा. दिवसाला दोन पैसे मजुरी देऊन वेठबिगारांहाती पाषाणांवर फुले कोरण्याचे काम करवून घेण्यात येई. जगात इतरही अनेक ठिकाणी गुलामांच्या आणि वेठबिगारांच्या घामावर आणि रक्तावर आलिशान वास्तू उभ्या राहिल्या आहेतच – मग ते पिरॅमिड असोत, ताजमहाल असोत की सूर्यमंदिरे! राजस्थान तरी वेगळा कसा असेल?

पण माणसाचे मन किती विचित्र आहे पहा! सुख-चैनीसाठी फिरायला जावे, वाडे-इमले पाहावे, स्वाभाविकपणे थक्क व्हावे. *'ओ हो... किती भव्य!' 'अहाहा- किती सुंदर'* – असं म्हणत भावड्या समाधानात घरी यावे. पण कसचं काय आणि कसचं काय. एकीकडे सौंदर्याचा साक्षात्कार स्वीकारीत असताना दुसरीकडे सौंदर्य कोणी निर्माण केले, कसे निर्माण केले अशा शंकांची कुसळे मनाला बोचत राहतात आणि सापडत मात्र नाहीत! आपल्या डोळ्यांत आता लोकशाही विचारांचे अंजन पडल्यामुळे असेल बहुधा, सारे काही नजरेत साठवत असताना मन मात्र ठसठसत राहते. म्हणते : *बरं झालं, त्या मूठभर कुबेरांच्या ऐदी गाद्या नामशेष झाल्या. राजेशाहीचा अस्त झाला आणि सामान्य माणसाला स्वाभिमानाने जगता यावं यासाठी आपल्या देशात एक विराट प्रजासत्ताक जन्माला आलं.*

गतार्थ जमान्याच्या नावाने आपण आसू ढाळण्याइतकी सुद्धा लायकी त्याच्यात राहिली नव्हती. एक काळ असा असलाच पाहिजे, जेव्हा राजस्थानी माती मर्दांच्या रक्ताने लाल झाली असेल. राणा संग, राणा प्रताप असे प्रतापी रजपूत आणि बाप्पा रावळांसारखा बुलंद व्यक्तिमत्त्वाचा स्वराज्यसंस्थापक यांनी रोमहर्षक इतिहास घडवला असेल. पण नंतर काय झाले? हाडा आणि मेवाडी तेवढे कडवेपणाने लढत राहिले. बाकीचे शिसोदिये आणि कछवा, मोगल आक्रमकांना शरण गेले. त्यांनी लाजिरवाणी लाचारी पत्करली आणि अपार धनसंपत्ती तिच्या वदल्यात मिळवली. पुढे पिढ्यांमागून पिढ्या निसर्गक्रमाप्रमाणे आल्या आणि गेल्या. वतनदारीच्या मतलबी अधिकाराच्या बळावर उपभोग घेण्याशिवाय कोणाला काही इतिकर्तव्यच उरले नाही. त्यांच्या इस्टेटी फुगल्या आणि पुढे, राज्ये खालसा झाली तरी, खाजगी मालमत्ता या सोज्वळ नावाखाली त्यांना त्या लाटता आल्या...! तनखेही मिळत राहिले. संचित संपत्तीवर बसलेले नागोबा आजही राजस्थानात पाहायला मिळतील. पण हे सारे गैर आहे, हे बदलले पाहिजे, अशी भावना राजस्थानी जनसामान्यांच्या मनात जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल. चीड असते ती आमच्यासारख्या उपऱ्यांच्या मनात, या जमिनीत मुळे नसलेल्या उठवळांच्या मनात! पण ज्यांची पाळेमुळे येथे आहेत, ते सगळे आजही कमरेत वाकून मुजरा करायला उत्सुकच आहेत.

ही 'संस्थानिकनिष्ठा' मी महाराष्ट्रातही पाहतो. संस्थान गुंजेएवढे असो की देशाच्या नकाशावर धब्बा उठवण्याएवढे मोठे असो, माझ्या पिढीपर्यंतची माणसे आपल्या कालवश झालेल्या राजवंशांचा वारेमाप अभिमान बाळगीत असतात. आपापल्या संस्थानात आपण कसे सुखी होतो याच्या हकीगती मिटक्या मारीत सांगतात. खुद्द तथाकथित राजघराण्यांतली माणसेही अजून आपल्या नावामागे श्रीमंत ही उपाधी लावतात किंवा तुम्हाआम्हा सामान्यांप्रमाणे आपले नाव *गोमाजी गणेश कापसे* असे न सांगता *बाळासाहेब*, *तात्यासाहेब*, *दाजीसाहेब*, *अमुकसिंग महाराज*, *तमुकसिंग महाराज* असे दिमाखात सुनावतात! खैर! हे आता आपल्याकडे बरेचसे मावळत चालले आहे. राजस्थान मात्र वर्तमान-मुक्त आहे!

या सर्व परिस्थितीचे पडसाद रोजच्या वागण्यातही वारीकसारीक गोष्टींतून उमटत असतात. हांजी आणि जी हुजूर करण्याची वृत्ती दर तिसऱ्या वाक्यात उमटते. पोकळ मिजास आणि वडेजाव यांचा सोस या मंडळींना टाळता येत नाही. एखाद्या सुंदर मंदिराचे किंवा महालाचे कौतुक सांगताना बाकी काही सांगण्यापेक्षा, *'या वास्तूला त्या काळात तेरा कोटी रुपये खर्च आला'* हे अभिमानाने सांगितले जाते. चित्रे कशी कलात्मक आहेत, त्यांत रेषा किंवा रंग यांचे सौंदर्य कसे खुलले आहे हे सांगण्याऐवजी त्यांतला सोनेरी रंग खऱ्या सोन्याचा आहे, हे फुशारकीने सांगण्यावरच सारा भर. पंधरा हजार मजूर इथे काम करीत होते, याला दीड अब्ज रुपये खर्च आला, या वास्तूत राजस्थानी संगमरवरावरोबरच इटलीतला संगमरवर वापरला आहे, जाळ्या चंदनाच्या किंवा हस्तिदंताच्या आहेत, सिलेहखान्यातील (शस्त्रागारातील) तलवार अलाण्या देशातली असून ती फलाणी किंमत देऊन आणलेली आहे आणि तिचे वजन पाच किलो आहे... असली द्रव्यमूल भाटगिरी राजस्थानात सारखी कानावर पडते. नववधू घरी आल्यावर तिचा नवरा तिचा घुंघट दूर करून आणि तिची हनुवटी उचलून तिचे सौंदर्य डोळ्यांत भरून घेण्याऐवजी तिच्या अंगावरचे सोने चाळीस तोळे आहे की तीस, याची चिंता करू लागला, तर त्याला कोणत्या कोटीतला गणावे!

खुमानलाल नावाचा एक जाणकार वाटाड्या जोधपूरचा किल्ला-कम-राजवाडा दाखवीत आमच्याबरोबर फिरत होता. गतकाळातले पराक्रम आणि पराक्रमी वीर यांच्या कहाण्या सांगता सांगता त्याच स्वरात तो जेव्हा राणी व्हिक्टोरिया आणि बादशहा पंचमजॉर्ज यांच्या छब्या दाखवू लागला, तेव्हा मी म्हटले, *'येथे यांचे काय काम?'* तो चपापला आणि म्हणाला, *'या इंगरेज थोरांच्या भेटीच्या वेळी हा प्रचंड महाल बांधला आहे.'* पुढे शस्त्रागारात असलेली चित्रविचित्र नवी-जुनी शस्त्रे त्याने दाखवली. गदा-तोमरांपासून बंदुका-तोफांपर्यंत शस्त्रे तेथे होती. मी खुमानलालला म्हटले, *'पण ही शस्त्रे घेऊन राजे-रजवाडे लढले कोणाशी?'* याचे उत्तर त्याने हलक्या आवाजात कुजवुजत दिले. म्हणाला, *'साहेब, हे मोगलांशी लढले नाहीत की इंग्रजांशी लढले नाहीत. ही नुसती शोभा आहे.'* असो असो.

राजाधिराज समशेरबहाद्दर गेंडासिंग-झेंडासिंग महाराज यांचा जयजयकार असो!

राजस्थानच्या जनतेने मध्ययुगात कोणते दृश्य पाहिले? त्यांनी आपल्या राजामहाराजांना अकबर, शहाजहान, औरंगजेब यांच्यापुढे कमरेत वाकून सलाम करताना पाहिले. त्यांच्याच वंशजांनी अव्वल इंग्रजीत काय पाहिले? राजवंश, प्रधानवंश, सावकारवंश, प्रतिष्ठितवंश, सर्वांना गोऱ्या इंग्रजांच्या टिनपाट अधिकाऱ्यांसमोर हांजीहांजी करताना पाहिले. त्याचा परिणाम असा झाला आहे की दरबारी शालीनतेने गोऱ्या गोऱ्या माणसांसमोर झुकण्याची सवय त्यांच्या हाडीमाशी खिळलेली आहे. त्यामुळे राजस्थानात जेथे जावे तेथे सर्व व्यवहार दोन पातळ्यांवर चालतात. स्टेशन असो की विमानतळ, हॉटेल असो की डाकबंगला, अग्रप्राधान्य मिळते ते गोऱ्या प्रवाशांना. काळ्या आदमींना आदब दाखवण्याची गरज नाही. आदब दाखवायची ती गौरवर्णीयांना. छोटीमोठी दुकाने, पुराणवस्तूंचे बाजार, खादीभांडारे आणि सरकारी एम्पोरियम सर्वत्र गोऱ्या प्रवाशांना झुकते माप! इतकेच नव्हे तर भीकमाग्यांचे तांडेदेखील प्राधान्य देतात ते अमेरिकन, जर्मन, फ्रेंच टूरिस्टांना. आम्हा भिकार काळ्या यात्रेकरूंना विचारतो कोण? आता ही गोष्ट खरी की परदेशी प्रवाशांमुळे परकीय चलन मिळते, टिपाबक्षिसे मुठींनी मिळतात. कदाचित असा अर्थलाभाचा विचार या वागणुकीमागे असेलही. तरीपण नतीजा एकच – *असुनि खास मालक घरचा म्हणति चोर त्याला!* याचा आपल्याला प्रत्यय येतो. ही वृत्ती अन्य देशांत कधीही पाहायला मिळत नाही. आपल्या देशात ही वृत्ती ठायी ठायी प्रकट होते, पण तिचे प्रमाण असे जीवघेणे नसते. राजशाही राजस्थानात मात्र पदोपदी देशी मुशाफिरांना परदेशी व्हावे लागते! काय असेल ते असो, गोऱ्या कातडीचा भारतीय मानसिकतेने धसका तर घेतलेला नाही ना? गौरवर्णीयांपुढे पूर्वी जाणवणारा हीन मनोगंड खरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर चार दशकांत कमी कमी होत गेलेला आहे. पण मग राजस्थानात त्याचा साक काय म्हणून पूर्ववत जिवंत असावा? परंपरेने अंगात भिनवलेल्या दासवृत्तीमुळे की शुद्ध धनलोभामुळे?

*सीकर जिल्ह्यातील फतेहपूरची गोष्ट आहे. दुपारी जेवण झाल्यावर बिकानेरकडे रवाना होण्यासाठी आम्ही सामानसुमान बांधून सज्ज होतो. गाडीचा चक्रधर कुठल्या तरी ढाब्यावर जेवायला गेला होता. थोड्या वेळाने तो गाडी घेऊन आला. पण पाहातो तो काय! आमच्या मिनी बसमध्ये १४ युरोपियन स्त्री-पुरुष बसलेले. त्यांचे बाड-बिस्तरे त्यांनी टपावर मजबूत बांधून ठेवले होते. 'हा काय प्रकार आहे?' असे चक्रधराला विचारल्यावर तो ततपप करीत म्हणाला – 'हे लोक मी जेवत असताना गाडीत जाऊन बसले. त्यांनाही बिकानेरलाच जायचे आहे.'*

चक्रधर खोटे बोलत होता हे उघड होते. अशी घुसून बसलेली माणसे टपावर सामान कसे ठेवतील! त्यांनी चक्रधराला लालूच दाखवली होती आणि तो हजार रुपये कमाईच्या आशेने त्यांना फितूर झाला होता. आत घुसलेले गोरे इटॅलियन्स होते. आम्ही उतरायला सांगितल्यावर त्यांनी चेहरे मख्ख केले. इंग्लिश भाषा समजत नसल्याच्या खाणाखुणा केल्या. सगळेच नाटक. शेवटी आपल्याला इंग्लिश समजते हे मान्य करणारा त्यांचा म्होरक्या विनवणी करू लागला. 'आमचं वाहन नादुरुस्त झालं आहे, ड्रायव्हर सुटा पार्ट आणायला सीकरला गेला आहे. तुम्ही आम्हांला सहकार्य द्या आणि तुमच्या वाहनातून आम्हांला बिकानेरला न्या...' असा धोशा त्याने सुरू केला. 'आमचे वाहन कंत्राटी आहे. त्याचा परवाना फक्त आमच्यापुरता आहे. आम्ही कायदा मोडू इच्छित नाही. तुम्हांला आम्ही लिफ्ट देऊ शकत नाही.' इत्यादी मुद्दे आम्ही पुन्हा पुन्हा सांगू लागलो. इटॅलियन ऐकेनात, खाली उतरेनात. पण तेवढ्यात आमच्यापैकी एक वीरांगना टपावर चढली आणि त्या घुसखोरांचे सामान उपसू लागली! हा पवित्रा त्यांच्या अपेक्षेबाहेरचा होता. शिवाय 'आम्हांला गाडी पोलीस स्टेशनवर न्यावी लागेल', या माझ्या वाक्यातले 'पोलीस स्टेशन' हे शब्द सर्व आगन्तुकांना नीट समजले असावे. ते गयावया करू लागले. पण मुळात कायदा हातात घेऊन आणि सौजन्य व सभ्यता खुंटीला टांगून केवळ दादागिरीने हे गोरे आमच्या गाडीत घुसले असल्याने त्यांना क्षमा करणे अशक्य होते. 'आम्हांला बसस्टेशनवर सोडा' ही एकच विनंती मान्य करून आम्ही त्यांना बसस्टेशनवर सोडले आणि त्या माफियांनी हायजॅक केलेली मिनी

वस सोडवली. गोऱ्या लोकांच्या मुजोरीपुढे स्थानिक मंडळी कदाचित नमली असती, पण आम्ही त्यांना जराही नमलो नाही. राहून राहून मनात येत राहिले ते हेच की काळ्या आदमींना कसेही लुंगवले तरी ते प्रतिकार करीत नाहीत असा उर्मट विश्वास गोऱ्या आदमींना सदैव वाटत असतो. आमच्या गाडीतून जायचे होते तर मग आधी विनंती तरी करायला हवी होती. पण बोटचेप्या इंडियन्सना कोण सभ्यता दाखवणार, ही या धटिंगण गोऱ्यांची वृत्ती असते.

राजस्थानात फेरफटका केल्यावर एका राजस्थानात अनेक राजस्थाने सामावलेली आहेत ही गोष्ट मनावर पक्की बिंबते! दक्षिण राजस्थानात उदेपूरच्या परिसरात प्रचंड सरोवरे आहेत, तर उत्तरेला आणि पश्चिमेला थरचे ओकेबोके वाळवंट आहे. तिथे भांडी घासायला देखील रेतीच वापरावी लागते. त्या मानाने पूर्व राजस्थानात अधूनमधून वनराया आहेत आणि उत्तर प्रदेशला लगटून असलेल्या प्रदेशात पक्ष्यांना आकर्षित करणाऱ्या पाणथळी आणि श्वापदांना आसरा देणारी रानेही आहेत. राजस्थानचे हृदय नेमके कोठे आहे? ते आहे साधारणपणे त्याच्या मध्यभागी, म्हणजे मारवाडात. हृदयच मारवाडात असल्यामुळे राजस्थानी संस्कृतीवर मारवाडी छाया पडलेली नसती तरच नवल. 'मारवाडी' ही संज्ञा जातिवाचक म्हणण्यापेक्षा प्रादेशिकतेची निदर्शक म्हटली पाहिजे! ही 'मारवाडी' छाया वेषभूषेत आहे, हातभर भरलेल्या कांकणांत आहे, 'देसी घी'मध्ये बनवलेल्या रसोईत आणि मिठाईत आहे; घरांच्या नक्षीदार मुखवट्यांआड लपवलेल्या कोंदट-गुदमरवून टाकणाऱ्या हवाबंद निवासस्थानांत आहे. डोक्यावरून नाकापर्यंत घुंगट घेणाऱ्या मारवाडी बाईप्रमाणे राजस्थानी तरुण-तरुणींची वृत्ती-प्रवृत्तीही पडद्यामधून बाहेर पडायला तयार नाही – त्यांच्याशी केलेल्या सहज संवादातूनदेखील याचा प्रत्यय येतो!

इथली युवा पिढी केवळ वयच मोजले तर तरुण आहे. पण त्यांची अस्मिता (?) पार बुढ्ढी आहे. वडीलधाऱ्यांच्या धाकात राहणे हा एकूणच भारतीय तरुणाईला शाप आहे, पण राजस्थानात त्या शापाचा जेवढा दारुण परिणाम दिसतो तेवढा आपल्याकडे दिसत नाही खास.

अर्थात राजस्थानसारखीच परिस्थिती अन्य उत्तर भारतीय प्रदेशांत कमीजास्त फरकाने आहेच. वानगीदाखल हा एक संवाद पहा :

स्थळ - जेसलमेर. आमच्या मार्गदर्शनार्थ आला होता सी.एस. म्हणजे चंद्रसिंग चौहान, हा कॉलेजमध्ये शिकलेला तरुण. २०-२२ वर्षांचा. हे स्थळ पहा, ते स्थळ पहा, असे करीत आमची दिंडी 'सम' *नावाच्या* वालुकासमुद्राच्या किनाऱ्यावरील स्थळी पोहोचली, उंटावरून फिरली, रेतीत लोळली आणि परत शहराकडे परतली. त्या कातरवेळी घडलेले हे संभाषण!

● : काय चंद्रसिंग, काही लग्नाचा वगैरे विचार?

: माझं लग्न झालेलं आहे!

● : केव्हा झालं आहे तुमचं लग्न?

: बायको तीन वर्षांची असताना आणि मी दहावाराचा असताना सोयरीक पक्की झाली आहे. आता माझी पत्नी दहा वर्षांची झाली आहे! ती वयात आल्यावर आमच्या घरी येईल.

● : तुम्ही पाहिली आहे का तिला?

: नाही पाहिली!

● : न पाहताच वायको पसंत केली?

: बुजुर्गांनी पाहिली आहे ना! ते माझं थोडंच नुकसान करणार आहेत?

● : तुम्ही कधी तिच्या घरी जाता की नाही?

: तोबा, तोबा! मी कसा जाईन! ती मोठी होऊन आमच्या घरी येईस्तोवर मला तिच्या घरी तर सोडाच, पण तिच्या गावातसुद्धा जाता येणार नाही. रिवाजच आहे असा आमच्याकडे!

● : तिचं शिक्षण चाललंय का?

: आमच्याकडे तर असं मानतात की, 'इस्त्रियोंका अस्थान सिर्फ किचिनमें होता है!'

● : पण तुम्ही तिला शिकवणार की नाही?

: थोडंफार शिकवीन देखील - पण ते सगळं परिस्थितीवर अवलंबून आहे.

● : तुम्हांला बहीण आहे का?

: हां, आहे तर!

● : तिच्या शिक्षणाचं काय?

: ते तिच्या ससुरालवाल्यांच्यावर अवलंबून राहील!

● : पण तुम्ही तुमच्या वडिलांना 'बहिणीला शिकवा' म्हणून का नाही सांगत?

: मी काय म्हणून सांगू? माझ्या वडिलांनी तिला शिकवण्यासाठी का म्हणून खर्च करावा? शिवाय ते तिच्या नवऱ्याच्या आणि सासू-सासऱ्यांच्या मर्जीवर आहे.

● : तिची सोयरीक झाली आहे का?

: हो, झाली आहे. आमच्याकडे काय पद्धत आहे की, दहेज मुलींच्या वडिलांना द्यावा लागत नाही. मुलांच्या वडिलांना द्यावा लागतो. तो ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे आठदहा हजारांपासून पुढे असतो. शिवाय किमान एक तोळा सोनं द्यावंच लागतं. त्यामुळे साटंलोटं सर्रास होतं. म्हणजे समजा माझी सोयरीक ठरली की मला हुंडा द्यावा लागणार; पण आम्ही जर आमच्या घरात जन्माला येणारी मुलगी तुमच्या मुलाला देऊ असा शब्द दिला, तर उभयपक्षी हुंडा देण्या-घेण्याचं कारण राहत नाही.

● : आणि मुलगी झालीच नाही तर?

: ये असंभव है!

● : म्हणजे तुमच्याकडे मुलगी होणं हे फायद्याचं असल्यामुळे चांगलं मानलं जात असेल!

: असंच काही नाही! जास्त मुली झाल्या तर त्या एखादेवेळी हीन जातीच्या मुलाशी लग्न करतील. आमच्याकडे अशी प्रथा आहे की आपली बेटी हीन जातीत गेली तर बट्टा लागेल म्हणून मुलीला अर्भकावस्थेतच मारून टाकतात.

● : तुमची जात कुठली?

: (अभिमानाने) आम्ही भाटी रजपूत आहोत. म्हणजे फार उच्च जातीचे आहोत.

● : उच्च जात आणि नीच जात हा भेद चांगला नाही! तुमचं काय मत?

: ते तर कुदरतीवर अवलंबून असतं.

● : पण 'इन्सानियत'चं काय?

: आमच्या बुजुर्गांचा असल्या वकवासावर विश्वास नाही.

● : बुजुर्गांचं राहू द्या; तुम्हांला पटतं आहे का हे?

: पटत नाही, पण आमचा काही इलाज नसतो.

● : तुम्ही तरुण लोक संघटित झालात, तर परिवर्तन घडवू शकाल.

: तुमचं म्हणणं ठीक आहे, पण आम्ही मजबूर आहोत. आम्ही समाजाविरुद्ध जाऊच शकत नाही.

● : इतर राज्यांत, म्हणजे उदाहरणार्थ आमच्या महाराष्ट्रात, तुमच्या अगदी जवळच्या गुजरातेत किंवा एकंदर उर्वरित भारतात तरुण वंडखोरी करतात; आधुनिक जीवनाचा स्वीकार करतात, प्रसंगी वडीलधाऱ्यांच्या विरुद्ध उभे राहतात. पण इथेच ते का शक्य होत नाही?

: ते मला ठाऊक नाही! पण होणार नाही, एवढं खरं!

● : तुम्ही शाळा-कॉलेजांत शिकता, मुलंमुली एकमेकांच्या सहवासात येतात. पण मग कोणी कुणाच्या प्रेमात पडत नाही का?

: ती सिस्टीम आमच्याकडे नाही!

● : तुम्ही चित्रपट पाहता ना? टी.व्ही. देखील आता सगळीकडे आला असेल! जे चित्रपट किंवा 'सीरियल्स' तुम्ही पाहता – त्यांचा तुमच्या मनावर काही परिणाम होत नाही का?

: ते 'प्यार' वगैरे सगळं पिक्चरमध्ये चांगलं वाटतं – आमच्या रिवाजात ते वसत नाही!

● : राजस्थानात अनेक रंगतदार लोककथा आहेत. त्या सगळ्या प्रेमकहाण्या आहेत. सिंध, पंजाब, राजस्थान या सगळ्याच भागांत हीर-रांझा, उमर-मार्वी, ससी-पुन्नू, ढोला-मारू, मुमल-महेंद्र अशा प्रेमकहाण्यांतून 'दिव्य', 'अमर' प्रेमाची भलावण असते! बिकानेरला ढोला-मारू, तर तुमच्या जेसलमेरला मुमल-महेंद्र यांची प्रेमगाथा सर्वांच्या आवडीची आहे. पण मग आपल्याला आयुष्यात असा आनंद मिळावा असं इकडे कोणालाच कसं वाटत नाही? शिवाय सुशिक्षित राजस्थानी तरुण वाहेरचं जग पाहात असणार, युरोपियन लेखकांचं साहित्य वाचत असणार – तरीदेखील जिंदगीकडे बघण्याची दृष्टी कशी बदलत नाही?

: नाही सर, राजस्थानात रीतिरिवाज फार पक्के आहेत. जातीबाहेर

जाण्याची तर कुणाची हिंमत नाही, पण जातीतदेखील कुणाचं भलतं वागणं खपवून घेतलं जाणार नाही. आता एक गोष्ट खरी की मुमल-महेंद्रच्या गोष्टीत अगदी आपल्या पिक्चरमध्ये असतं ना, तसं प्रेम वगैरे आहे.

● : (मी मधेच म्हटलं)– पिक्चरसारखं प्रेम त्यांच्यात नाही – त्यांच्यासारखं प्रेम पिक्चरमध्ये असतं! म्हणजे राजस्थानातली प्रेमकहाणी ओरिजिनल आहे. अगदी रोमियो-ज्यूलिएटप्रमाणे, या रोमान्सेसमधून दारुण शोकान्त असतो. पिक्चर्स तुमची नक्कल करतात, मग तुम्ही करा की पिक्चरची नक्कल!'

– आता इथे हे संभाषण जवळजवळ तुटलंच. बहुधा माझ्या उलटतपासणीला कंटाळून चंद्रसिंग चौहान यांनी मुमल-महेंद्राची कहाणी सर्व तपशिलानिशी सांगायला सुरुवात केली. आधी सर्व बरोबरीच्या मंडळींनी आणि मग मीही पेंगत पेंगत डोळे मिटून चौहानांना दाद दिली!

डोळे मिटल्यावर डोळ्यांसमोर विचित्र चित्रं येऊ लागली... राजस्थानी समाजालाच का दोष द्यावा? गुजरातच्या ग्रामीण भागात जवळजवळ अशीच परिस्थिती नाही का? बिहारमध्ये आजही वडाच्या झाडाखाली घाऊक प्रमाणावर हजारो अर्भकांची लग्ने पक्की केली जातातच ना? उत्तर प्रदेशच्या खेड्यांतही काही वेगळी स्थिती नसणारच. मध्य प्रदेशातही हे सामाजिक मागासलेपण आयुष्याचे डाव कुजवून टाकत असणार. खरोखर आर्यावर्तात आचार-विचारांतलं अनार्यपण सर्वांत अधिक प्रमाणात आहे!

यांचे फुले, आगरकर, आंबेडकर केव्हा जन्माला येतील?

आमच्या शहरांत जातिनिर्मूलन संस्था उजळमाथ्याने काम करू शकतात. पण हे लोण खेड्यापाड्यांत पोचेल का? पुन्हा ते आर्यावर्तातल्या खेड्यापाड्यांत (आणि शहरांतही) पोचायला अजून किती शतके अवकाश आहे? नोकरीचाकरीसाठी का होईना, उपलब्ध असणारे शिक्षण घेऊन उत्तर भारतातही लक्षावधी बाबू तयार होतातच की. पण शिक्षणाने जीवनदृष्टी उदार होण्याची किमया इकडे का घडत नाही? शिक्षण घेतल्यावर तरुण-तरुणींनी प्रौढ वयात लग्ने केली किंवा प्रेमविवाह केले, म्हणजे होईल का तुमचं समाधान, असे मला कोणी विचारले तर

माझे उत्तर असे आहे की प्रश्न केवळ प्रेमविवाह किंवा प्रौढपणी विवाह करण्याचा नाही, उदारमतवादाचे वारे या सर्व आर्यावर्तात कधीच वाहणार नाहीत का, हा खरा सवाल आहे. या वाऱ्यावरूनच वाहात येते जातिधर्मनिरपेक्ष आधुनिक समाजाचे स्वप्न! सारीच माणसे सुखासाठी धडपडतात, पण या सुखातही उंचनिंच स्तर आहेतच की! अर्भकावस्थेत लागणारी लग्ने म्हणजे प्रजोत्पादनासाठी निर्माण केलेली निर्जीव विटाळी. अशा जगात विचारांचे कोंडेपण सरत नाही. पंचक्रोशीच्या संस्कृतीतच आनंद वाटू लागतो. जाती-पोटजातींचे संरक्षक कवच घालून आपल्या सीमित किमान लालसा पुऱ्या झाल्याशी कारण. मानवाचे अंती एक गोत्र – हे शाब्दिक पातळीवर सुद्धा येथे कोणी म्हणणार नाही! उत्तरेच्या मानाने दक्षिणेकडचे वसंतवारे किती तरी सुखदायी वाटतात. नर्मदेच्या उत्तरेकडे जावे तसे, हवा विरळ होते त्याप्रमाणे सामाजिक सहिष्णुता, आचारविचारातील उदारता या गोष्टीही विरळ होत जातात.

– आणि ही सगळी रामकहाणी, सौंदर्याने नटलेले महाल आणि हवेल्या जेथे दिमाखात उभ्या आहेत, रंगांची जिथे मुक्त उधळण आहे, जिथल्या वाळवंटातही मध्येच थुईथुई नाचणारे मोर उसळतात, रंगार्त क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर जिथे उंटांच्या सावल्यांचे चलत् शिल्प उमटते, अशा रंगील्या राजस्थानात अनुभवाला यावी, हे केवढे दुर्दैव आहे! बरे, दारिद्र्यामुळे सारे समाजजीवन कळंजून जाते म्हणावे तर तीही सबब येथे पटणारी नाही. मुंबई, दिल्ली, कलकत्ता येथील उद्योगांत आणि व्यापारांत प्रतिकुबेर झालेले धनाढ्य मारवाडी ज्या भूमीला आपली मायभूमी मानतात, तिथे धनसंपत्ती अमाप आहे, हे उघड आहे. एकट्या शेखावटीचा कानोसा घेतला तर सिंघानिया, पोद्दार, गोएंका अशा धनंतर परिवारांचे मूळपीठ इथे असल्याचा निर्वाळा मिळतो. त्यांतल्या अनेकांनी नक्षीदार आणि चित्रांकित वाडे-महाल इकडे उभे केले आहेत. त्याऐवजी त्यांनी जर मोठमोठ्या शिक्षणसंस्था काढल्या, आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या मुक्त देवाणघेवाणीची सोय केली, तर कदाचित चित्र पालटेल. पण एकट्यादुकट्या बिर्लांनी, बजाजांनी धर्मादाय करण्याच्या बुद्धीने विद्यापीठे उभारण्याऐवजी सर्वांच्या संघटित अर्थशक्तीने कितीतरी मोठी कामे इकडे उभी राहू शकतील.

हे होत नाही तोपर्यंत उंचउंच हवेल्यांत खुजी-खुजी माणसे खुरडत-खुरडत 'रेस भराभर फळवू द्या!' – या एकाच उद्देशाने कशीवशी जगत राहतील!

खरे म्हणजे आम्हां मुशाफिरांच्या मनात असली वादळे उगीच थैमान घालतात. विचारांचे आवर्त मनात उठू द्यायचे नाहीत, केवळ निर्लेप बुद्धीने निसर्गाची आणि मनुष्यनिर्मित वास्तूंची थक्क करणारी रूपे पाहायची असे ठरवले आणि त्याप्रमाणे (म्हणजे निमूटपणे) सौंदर्यदर्शन या एकाच हेतूने मुशाफिर राजस्थानकडे पाहतील, तर या प्रदेशाला 'यासम हा' – असे म्हणता येईल. 'सौंदर्याला असल्या असण्याचा हक्क असे' – या सूत्रावरून निखळ सौंदर्याचे दर्शन अवश्य घेता येईल. राजस्थानातील वास्तूंच्या रेषा, त्यांतील रंगोल्लास, त्यांचा ऐसपैस आसमंत, त्या वास्तूंचे अम्लान वैभव, हे सर्व नेत्रसुख देणारे आहे, रोज आपले स्थान बदलणारी रेतीची टेकाडे (म्हणजे भरतीला आलेल्या धरतीच्या लाटा!)' – हाही एक चित्तथरारक अनुभव. हे सारे सौंदर्य नाकारण्यासारखे नाही. किंबहुना त्याला दाद दिलीच पाहिजे.

राजस्थानातील नगरसौंदर्य पाहायचे असले तर त्या कामाची सुरुवात उदेपूरला करावी. उदेपूर मेवाडात आहे आणि त्यामुळे अरवली पर्वताच्या रांगांचे सान्निध्य त्याला लाभलेले आहे. पाषाण मुरमाडाचे असले तरी भूप्रदेशाचा तोंडवळा डोंगरी आहे. कोकणात जसा जांभ्या दगड आवडीचा, तसा राजस्थानच्या आवडीचा एक खास उदी पिवळा दगड आहे. त्याच्या छटा सर्वत्र एकाच प्रकारच्या नाहीत. रंगाचा गर्दपणा ठिकठिकाणी कमी जास्त झालेला दिसतो. उदेपूरला 'व्हाइट सिटी' म्हणजे शुभ्र नगर म्हणण्याचा प्रघात आहे. पण ही शुभ्रता वस्तीच्या वस्तीला चुना फासल्यामुळे आलेली आहे. त्याच चुन्याच्या मदतीने जुन्या राउळांची धवळारे करण्याची कुबुद्धी कोणी न वापरल्यामुळे किल्ले आणि राजवाडे आपले राजस्थानी रंग राखून आहेत.

राजस्थानी वास्तुशिल्पाची काही खास वैशिष्ट्ये आहेत. इस्लामी आणि हिंदू स्थापत्यांचा तिथे संगम झालेला दिसतो. पण त्यांतले इस्लामी विशेष तसे माफक आहेत. घुमट असले तर छोटे असतात

आणि त्यांना छत्रीचे शिरोभूषण घातलेले असते. इथल्या वास्तूंचे आकार महाप्रमाण असतात आणि सर्वत्र धनसंपत्ती सढळ हाताने वेचल्याचा प्रत्यय येतो. राजस्थानात जैनधर्मीयांचे सांस्कृतिक वर्चस्व आजही जाणवते. बारीक बारीक नक्षीकाम, वेलपत्तीने मढवलेल्या भिंती, कुसरदार गवाक्षे आणि सज्जे यांची नुसती रेलचेल असते. प्रवेशद्वारे विशाल असतात, आणि त्यांच्या कमानी उंचीपेक्षा रुंदीला जास्त असतात. मजल्यावर मजले चढवीत न्यायचे, जसजसे वर जावे तसतसे क्षेत्रफळ कमी कमी करत शेवटी एक गगनस्पर्शी मेघडंबरी ठेवून द्यायची हा बहुतेक राजवाड्यांचा आणि महालांचा शिरस्ता. प्राण देतील पण स्वातंत्र्य गमावणार नाहीत, अशी मेवाडी आणि हाडा रजपुतांची यथार्थ ख्याती होती. अशा तऱ्हेची सामाजिकता जेथे असते तेथे महालमाड्या बांधत बसायला कोणाला वेळ नसतो आणि मानसिक सवडही नसते. त्या मानाने उदेपूरला खूपच काही बांधले गेलेले आहे. राजवाडा अंतर्बाह्य प्रेक्षणीय आहे. आतल्या भागात असलेले जिने आणि छन्न मार्ग शत्रूचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने बांधलेले असले तरी चौक मात्र मोठे आणि चौडे-चौरस आहेत आणि महालही शाही रुबाबाचे आहेत. मोगलांशी कडवेपणाने लढणारी माणसे मोगलांच्या आलिशान जीवनपद्धतीकडे मात्र आकृष्ट होत होती हे येथे जाणवते.

रंगीबेरंगी काचकामाची एकूणच राजस्थानला हौस आहे. त्यात उदेपूरच्या राजवाड्यातील काचकामाने बनवलेले मोर अतिशय प्रेक्षणीय आहेत. एक शीशमहालही अर्थात आहेच. महालाच्या भिंतींना किंवा छताला छोटे छोटे आरसे बसवायचे म्हणजे मेणबत्ती पेटवताच नक्षत्रखचित आकाशाखाली असल्यासारखे वाटावे, अशी त्यांची योजना असते. वस्त्राचा पिळा केल्यासारख्या घडणीच्या ताशीव भुजांच्या कमानी प्रवेशद्वारी उभारणे ही उदेपूरच्या राजवाड्यातली खासियत फार आकर्षक आहे. इथे प्रवेशद्वारापाशी अशा आठ कमानी आपले स्वागत करतात. नगर प्रासाद (सिटी पॅलेस) भव्य आहे आणि त्यातील अनेकमजली इमारती चढता उतरताना माणसाची दमछाक होते. येथे जनाना आणि मर्दाना विभाग स्वतंत्र आहेत. ही देणगी मूळची रजपुतांची की मुसलमानांकडून उचललेली, माहीत नाही!

उदेपूरचे मूळ नाव उदयपूर, असे म्हणतात. पण कदाचित मूळ नाव उदकपूरसुद्धा असेल, असे वाटायला लावणारी प्रचंड सरोवरे उदेपूरच्या परिसरात आहेत. त्यात फतेहसागर आणि पिचोला हे तलाव तर नगराचाच अविभाज्य भाग आहेत. मरुभूमीत केवळ मृगजळाची सरोवरे असतात अशी कोणाची समजूत असली तर त्याने ती समजूत उदेपूरच्या तलावांत बुडवून टाकावी हे बरे. काही अंतरावर तर जयसमंद आणि राजसमंद असे समंद (समुंदर?) म्हणजे समुद्रप्राय जलाशय आहेत. उदेपूरच्या मोती टेकडीच्या माथ्यावर महाराणा प्रतापाचा भव्य अश्वारूढ पुतळा आहे. आपल्या देशातल्या चांगल्या पुतळ्यांत त्याची निश्चित गणना होईल. तो सर्व परिसरच मोठा प्रसन्न आहे. असाच प्रसन्न परिसर म्हणजे सहेलियोंकी वाडी. राजगृहातल्या रमणींना मनसोक्त विहार करता यावा हा तिच्या रचनेमागचा हेतू आहे. कुसरकाम केलेल्या संगमरवरी कमानी आणि भिंती सभोवतीच्या हिरव्यागार बागशाहीमुळे अधिकच शोभिवंत झाल्या आहेत. थुईथुई उडणारी कारंजी आणि भारतीय शिल्पसृष्टीतल्या हत्तींच्या आणि कमळांच्या सर्वप्रिय आकृती, यांच्यामुळे एकूणच हे स्थान फार रम्य वाटते.

आपले निवलेले डोळे काहीशा रूक्ष रस्त्यामुळे तळावतात पण या डोळ्यांना एक वेगळेच सुखनिधान लाभते ते चितोडगडला.

आश्चर्य म्हणजे चितोडची ख्याती वीरतेमुळे असली तरी हे स्थान मुख्यतः शांतिप्रिय जैनांचे आहे. जयस्तंभ आणि कीर्तिस्तंभ असे दोन कलापूर्ण मनोरे चितोडगडावर उभे आहेत. त्यांतला कीर्तिस्तंभ धनिक जैन व्यापाऱ्यांनी उभारलेला आहे, तर जयस्तंभ राणा कुंभ याने माळवा आणि गुजरातच्या सुलतानावर मिळवलेल्या विजयाचे स्मारक म्हणून उभारलेला आहे. सहाशे फूट उंचीवर असलेल्या सातशे एकर जमिनीवर पसरलेल्या या गडाला सात दरवाजे आहेत. गडावर अनेक मंदिरे आणि महाल आहेत; पण मुख्य मंदिर म्हणजे जेथे मीराबाई गिरिधर गोपालाची पूजा करायची ते. मंदिर छोटे असले तरी संवेदनाशील मुशाफिराच्या मनात ते असंख्य तरंग निर्माण करते. महालांत मुख्य पद्मिनीचा महाल. अल्लाउद्दीन खिलजी आणि पद्मिनी यांची कहाणी सर्व देशात प्रसिद्धच आहे. पद्मिनीच्या महालासमोर पाणी भरलेला खंदक आहे आणि

खंदकापलीकडे आणखी एक महाल. त्यात वसवलेल्या आरशात पद्मिनीचे प्रतिबिंब पाहून सुलतानाला समाधान मानावे लागले. अशा ठिकाणी वाटाड्यांच्या वक्तृत्वाला जरा जास्तच बहर येतो. आश्चर्य वाटते ते याचे की जोहार करणाऱ्या रजपूत रमणींच्या कथा सर्व राजस्थानभर चवीने सांगितल्या जातात. तीच गोष्ट सती गेलेल्या राण्यांची. सतीची दुष्ट प्रथा भले संपली असेल पण राजस्थानच्या वर्तमानकालीन मध्ययुगाला ते बहुधा मान्य नसावे! पुष्कळ ठिकाणी, विशेषतः बिकानेरला, सतीच्या तळहातांचे ठसे म्हणून दगडावर पंजे कोरलेले असतात. सती काय आणि जोहार काय, दोहोंचा जन्म मतलबी नैतिक कल्पनांनी घडवलेला आहे. पण ते एक असो.

पूर्व राजस्थानच्या उत्तर प्रदेशालगतच्या सीमेवर भरतपूर वसलेले आहे. जयपूरहून भरतपूरला जाताना राजस्थानच्या रेताड जमिनीऐवजी हिरवे पट्टे दिसतात. वृक्षही मोठे आणि डेरेदार आहेत. वाटेतल्या लहान गावांतल्या मंड्या संत्री, केळी, बोरे यांनी खच्चून भरलेल्या असतात.

भरतपूर एकेकाळी जाट राजांची राजधानी होती. आज ती पक्ष्यांची राजधानी आहे! तिथले अभयारण्य म्हणजे जगभरच्या पक्ष्यांचे जसे काही माहेरघर आहे. निदान हक्काची हवापालटाची जागा आहे. पाऊसकाळ आला की पार सैबेरियातून तऱ्हेतऱ्हेचे पक्षी भरतपूरची आभाळवाट धरतात. युरोपमधून, मध्य आशियातून, लडाखमधून, चीनमधून – कुठून कुठून येतात हे विहंगम! मुख्यतः हे पाण्यात किंवा पाणथळीत राहणारे पक्षी असतात. सलीम अली या जागतिक कीर्तीच्या पक्षिपंडिताने आपली सारी चतुराई आणि ज्ञान पणाला लावून भरतपूरच्या पाणथळीत पक्ष्यांचे अभयारण्य निर्माण केले. मुळात हा विस्तृत वनविभाग म्हणजे राजघराण्यातल्या मंडळींची मनसोक्त शिकार करण्याची जागा होती. तिथे पक्षी तसे येत होते, पण जाणीवपूर्वक त्यांच्यासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करण्याचे आणि अरण्याचे रूपांतर पक्ष्यांच्या माहेरघरात करण्याचे श्रेय सलीम अलींकडे जाते. या अभयारण्याचे नाव आहे केवलदेव राष्ट्रीय उपवन. तेथे तऱ्हेतऱ्हेचे भटके पक्षी पावसाळ्यापासून येऊ लागतात, ते घरटी करतात, दसरा-दिवाळीच्या सुमाराला त्यांची पिलावळ गजबजू लागते. काटेरी बाभळींवर घरटी लोंबू

लागतात. वाभळीच्या सावल्या पडलेल्या पाण्यावरही हजारो पक्षी निर्भयपणे नांदतात, विहार करतात. यांत मुख्यतः पाहायचे ते महाकाय करकोचे, उघड्या चोचींचे स्टॉर्क, रंगांचा शिडकावा असलेले स्टॉर्क, इग्रेट, पेलिकन, आयबीस आणि सापासारखी दीर्घ मान असलेले स्नेक-बर्ड्स. रंगीत ठिपक्यांची वदके आणि बकध्यान लावून बसलेले लंबूटांगे वगळे. आपल्या ओळखीचा निळ्याशार पंखांचा खंड्या (किंगफिशर). या पाणपक्ष्यांखेरीज इतरही पाखरे आहेत, ती हजारोंनी मोजावी लागतील. तऱ्हेतऱ्हेचे पोपट आहेत पण विशेष म्हणजे उंचावरून आपल्या तीक्ष्ण नजरेने अवघ्या क्षितिजाचा वेध घेणारे गरुड येथे झाडांच्या शेंड्यांवर राजाच्या ऐटीत बसलेले दिसतात. आता एवढे मोठे अरण्य म्हटल्यावर पक्ष्यांच्या बरोबर तऱ्हेतऱ्हेचे प्राणी राहायला येणारच. या अरण्यात अजगर आहेत, काटेरी साळू आहेत. नीलगाई आहेत, सांबर आहेत. ठिपक्यांच्या हरणांचे कळप पाणथळीवर मजेत फिरतात. तरस आणि वनवराहही दर्शन देतात.

हे सारे वनवैभव पाहायचे तर खूप थकायची तयारी हवी. एकोणतीस चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या या अभयारण्यात पायी चालायचे तर तरुणाईही कसाला लावावी लागेल. सायकलवरून फिरणारे आहेत, पण तेवढाही दम फुफ्फुसांत नसेल तर सायकलरिक्षा भरपूर भाडे घेऊन हिंडवण्यासाठी तयार असतात. एक सरकारी बस आहे पण ती सहसा कोणाच्याच उपयोगाची नसते. सर्वांत वाईट काही असेल तर अभयारण्य दाखवण्याची व्यवस्था करणारी यंत्रणा. उद्धटपणा आणि बेपर्वाई म्हणजे आपल्या जिवाचा संताप. भरतपूरच्या या अभयारण्यात भय असते ते आपले हाल होण्याचे. निवासी होटेल चांगले आहे पण शिस्त आणि चटपटीतपणा, दोहोंना फाटा दिलेला आहे. खुद्द अरण्याच्या मध्यभागी जे होटेल आहे तिथे राहण्यासाठी माणशी दर दिवशी दोन-अडीच हजार रुपये खर्च करण्याची हिंमत हवी. पक्षी पाहायला अर्थातच खूप चिकाटी हवी. तरीही आपल्या देशातील अनेक अभयवनांपेक्षा या ठिकाणचे पक्षी उदारपणे दर्शन देणारे आहेत.

राजस्थानात मोरांची प्रचंड संख्या का असावी हे एक कोडेच आहे. मुरमाडी रंगाच्या रेताडाच्या छाताडावर मोरांचे मखमली रंग

राजेशाही दिमाखात झळकत राहतात. मोरांनी भरतपूरच्या परिसरात राहायला हरकत नाही, पण ते तर जयपूरहून शेखावटीत जाताना रेतीतून प्रकटलेले दिसतात. काटेरी झुडपांशेजारी कसे तुरुतुरू चालतात. कोणी उसळी मारून वाळूच्या तात्पुरत्या तटांच्या शिखरांवर जाऊन बसतात. जेसलमेरला राजघराण्यातल्या स्मृतिशेष झालेल्या स्त्रीपुरुषांच्या छत्र्या पाहायला जावे तर तिथेही मोर गटागटाने हजेरी लावतात. शे-दोनशे मीटर लांब अंतर झेपेत ओलांडण्यासाठी कमी उंचीवरून उडणारे मोरही पाहायला मिळतात. बाकी राजस्थानी खेड्यांतली माणसे तरी काय? तीही झगमगणाऱ्या रंगांच्या कपड्यांत नसतात का? तसेच हे मोर. त्या माणसांच्या आणि मोरांच्या अभावी सारे कसे रूखेसुखे होऊन गेले असते. रंगीत वेषांतल्या स्त्रीपुरुषांनो आणि निळ्या सोनेरी राजवर्खी मोरांनो, थँक यू. थँक यू व्हेरी मच!

बहुतेक हौशी प्रवासी दिल्लीहून एक सफर जयपूरची करतात. जयपूरचा रुबाब शाही आहे आणि गुलाबी नगरी म्हणून असलेला त्याचा लौकिकही मोठा आहे. तेरा लाख लोकवस्तीचे हे शहर राजस्थानची राजधानी आहे. त्यामुळे राजस्थानातील बहुतेक सर्व ठिकाणी जाण्यासाठी ते सोयिस्कर केंद्र आहे. मात्र इतिहास पुसू म्हटले तरी पुसता येत नाही. त्यामुळे जयपूरमधील राजरस्त्यांची शान, तिथले भरगच्च बाजार, उत्तुंग प्रासाद आणि जंतरमंतर किंवा हवामहलसारख्या चित्रविचित्र वास्तू यांच्या देखाव्यांनी एकीकडे डोळे थक्क होत असताना दुसरीकडे मनाला मात्र टोचणी असते की हे सारे ऐश्वर्य जयपूरच्या राजघराण्याने मोगलांच्या चरणारविंदी मिलिंदायमान होऊन मिळविलेले आहे. हवामहल हा वस्तुतः महाल नाहीच. ती केवळ एक भिंत आहे. फार तर महालाचा मुखवटा चढवून एक शुद्ध पोकळी तिथे उभी आहे. तसे पाहिले तर सारे जयपूरच तसे वाटते. शहर चांगले आटपाट आहे, रस्ते भले प्रशस्त आहेत आणि रुबाब मोठा मिजासखोर आहे... पण सगळा पोकळ डौल!

ही भावना झटकण्यासाठी जरा दूर असलेल्या अंबर राजवाड्याकडे जावे. राजवाडा कसला, हा एक किल्लाच आहे. जयपूरच्या उभारणीपूर्वी किमान सहा शतके मीना रजपुतांची राजधानी अंबरला होती. आतला

प्रासाद सुंदर आहे, विस्तार मोठा आहे. जयमंदिर व शीशमहाल ही आकर्षणे. आणखी एक आकर्षण, गुलहौशी प्रवासी — विशेषतः जोडपी — हत्तीवरून डोंगर चढून अंबरला भेट देऊ शकतात. अमेरिकन टूरिस्टांना 'फॅन्टास्टिक' का काय तो अनुभव त्यामुळे मिळतो.


प्रासादच पाहायची हौस असेल तर तो पाहावा बिकानेरचा. वाट शेखावटीतून जाते. शेखावटीत धनिकांच्या मोठमोठ्या हवेल्या आहेत. त्यांतली भिंत न् भिंत रंगीत चित्रांनी मढवलेली असते. चित्रे मात्र रेषांच्या सौंदर्यापेक्षा रंगबाजीने नटलेली असतात. ही फॅशन पुढे अशी बळावली की सामान्य नागरिकांच्या माड्याही छोटेखानी हवेल्याच दिसू लागल्या. शेखावटीवर ओझरती नजर टाकून प्रवासी बिकानेरला आला तर तिथल्या उत्तुंग प्रासादांचे दर्शन घेताना टोपी पडायची वेळ येते. बिकानेरचा जुनागढ किल्ला अक्षरशः प्रचंड आहे. आत सदतीस प्रासाद आहेत. शेकडो वर्षे हा किल्ला बांधला जात होता. नक्षीच्या जाळ्या, कमानी, घुमट आणि मिनार एकापेक्षा एक सरस आहेत. किल्ल्यातल्या अनूप महाल, विजय महाल, करण महाल, रंगमहाल, चंद्रमहाल, फूलमहाल अशा फैनाबाज नावांच्या महालांत सुंदर चित्रकर्म आणि काचकारी आहे. मुख्य म्हणजे इथला दरबार महाल म्हणजे राजपूत वास्तुकलेला पडलेले एक भव्य स्वप्न आहे. भरपूर लांबी-रुंदी आणि उंचीही लाभलेल्या या प्रासादाच्या भिंती आणि छत कमालीच्या कुसरकामाने सजविलेले आहे. हा महाल पाहाताच वाटते, भारतीय संगीत ऐकवण्यासाठी आमच्या महानगरांतून असाच एकेक हॉल असावा. केवळ नक्ष्यांच्या बळावर प्रतिध्वनी पूर्ण जिरतील.

जोधपूर आणि जेसलमेर इथले किल्लेही प्रचंड आहेत. बिकानेर, जोधपूर, जेसलमेर या सर्व ठिकाणच्या किल्ल्यांना अजिंक्य दुर्ग म्हणून संबोधण्याची प्रथा आहे. पण लढाया टाळण्यात आणि आरामात लोळण्यात हुशार असलेल्या या राजपुतांनी त्यांचे किल्ले अनेक शतके शाबूत ठेवले असले तर त्यात नवल ते काय? त्यातही जोधपूरचा किल्ला अक्षरशः उत्तुंग आहे. म्हणजे असे की, आधी जमिनीपासून चारशे फूट उंच असलेल्या टेकडीवर चारशे फूट उंच असलेला अनेकमजली दुर्ग उभा आहे. सह्याद्रीवरचे किल्ले पाहाणाऱ्या आणि तेथील फुटक्या बुरुजांचे

ग्रं. क्र. २०३८२
शाखा



आणि खडकातल्या पाण्याच्या टाक्यांचे रूप काय ते माहीत असणाऱ्या आमच्यासारख्यांना राजस्थानात आल्यावर, किल्ले किती भव्य असू शकतात आणि प्रासाद कसे श्रीविशाल असतात ते नीट समजू लागते. खरोखर अफाट वालुकामय प्रदेश, तुरळक लोकवस्ती, सतत वाहते नसणारे रस्ते, उंटाच्या धीम्या चालीने गतागत करणारे कॅरॅव्हॅन, भव्य पण गूढ वाटणारे वाडे-राजवाडे, धनसंपत्ती जाहीर करणाऱ्या हवेल्या,



अशा वातावरणात पराक्रमाच्या धीरोदात्त कथा निर्माण होण्यापेक्षा प्रणयाच्या ललितरम्य गाथाच निर्माण होणे योग्य. आणि या प्रदेशात तसेच आहे.

जेसलमेर! थर वाळवंटाच्या सीमेलगत उभा राहिलेला पीत पाषाणांचा किल्ला...

प्रकाश धूसर असावा, आपण जेसलमेरपासून कोस-दोन कोस दूर

असावे की एका खडकाळ टेकडीवर उभा असलेला हा सोनेरी तांवूस किल्ला परीकथेतल्या अद्‌भुत रहस्यासारखा खुणावत राहतो.

जवळ गेल्यावर भारतीय समाजाला प्रिय असणाऱ्या अस्वच्छतेच्या दर्पाने पूर्वी मनाचा एकदम हिरमोड होत असे. आता मात्र ती स्थिती राहिलेली नाही. जेसलमेरच्या भोवती लोककथांचा दरवळ आहे. आपल्याच देशात वाळूचा महासागर असावा ही नवलाई देखील जेसलमेरला गेल्यावरच अनुभवाला येते.

पश्चिमेला चाळीसेक किलोमीटर गेल्यास 'सम' नावाचे गाव येते. गाव म्हणजे मुख्यतः उंटांचा अड्डा. अतिशय केविलवाण्या तोंडाचे आणि महत्तम वेढव अंगाचे हे प्राणी मुकाटपणे ओझी वाहाण्यासाठीच जन्माला आलेले आहेत. खायला काटे, श्वासातून भरभरून येणारे रेतीचे तोबरे, पाणी मिळो न मिळो, पोटातल्या पिशवीतले पाणी वाटभर पुरते – असे हे मूर्तिमंत निसर्गचमत्कार! पण त्यांचे काफिले संध्यासमयी रंगलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर शांतपणे वाळूवर पाय रोवून उभे असतात तेव्हा तो एक विरूपातल्या सुरूपतेचा साक्षात्कारच असतो...

हे राजस्थान, शतकानुशतकांची गतिशून्य संस्कृती सांभाळून ठेवणारे. हे राजस्थान, मध्ययुगीन वैभवाचे संचित निष्ठेने जपून ठेवणारे. मरुभूमीवर पाषाणांची वागशाही उभी करणारे. एखाद्या रेशमी वस्त्रावर हौसेने झगमगणारा एक जरीखणाचा तुकडा छातीवर शिवावा तसे आपल्या राष्ट्राच्या महावस्त्राची शोभा वाढवणारे.

एकाच वेळी महान नेत्रसुख आणि महान चित्तक्षोभ देणारे.

रावणहत्था नावाचे तंतुवाद्य हातात घेऊन इथले भाटचारण रामाच्या सूर्यवंशाची स्तोत्रे गातात.


जानपद नृत्यगीतांनी इथल्या मध्यरात्री रंगतात.

इथे खूप काही वांधले गेले पण उच्चनीचतेचे भेद कधीच सांधले गेले नाहीत.

इथे अजूनही मानकरी आहेत तसे मुजरेकरीही आहेत.

राजस्थानचे हे अगणित रंग पाहावे आणि थकून बिछान्यावर पडल्यावर त्याचे अंतरंगही मनश्चक्षूंनी न्याहाळावे... पुन्हा पुन्हा न्याहाळावे.

०००



५.

# नेपाळदर्शन : १

आपल्याला वाटते की नेपाळ म्हणजे एक जरासे वेगळे संस्थान, एवढेच. भारतीय उपखंडात भारत म्हणजे दादा (The Big Brother)! पाकिस्तान म्हणजे आपल्यापेक्षा थोडा लहान, पण तरीही नेहमी गुर्मीत वागणारा एक त्रासदायक भाऊ! बाकी सगळे देश म्हणजे चवली-पावली-अधेली... वास्तविक परिस्थिती अगदी वेगळी आहे. नेपाळ, भूतान, बांगला देश आणि श्रीलंका ही सगळी स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्रे आहेत आणि त्यांना त्यांची त्यांची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. साधारणपणे भारतीय माणूस या राष्ट्रांची पृथगात्मता औपचारिकपणे मान्य करीत असला तरी अनौपचारिकपणे (किंवा मनातल्या मनात) तो या छोट्या राष्ट्रांना विनाकारणच भारतवर्षाचे भाग समजत असतो. गंमत अशी की, हे सत्य या छोट्या राष्ट्रांनाही पक्के माहीत आहे आणि त्यांना भारतामधील या मानसिकतेचा फार राग येतो. काही वर्षांपूर्वी भारताने केलेल्या लष्करी कारवाईमुळे बांगला देश जन्माला आला; पण पूर्वी ज्याप्रमाणे दिग्विजय करणारे सम्राट पराभूत राजाला त्याचे राज्य उदारपणे देऊन टाकीत, तसा बांगलादेशीयांना आपण त्यांचा मुलूख परत देऊन टाकला आहे, असे भारतात अनेकांना वाटते. त्यानंतर अलीकडे, भारताने कसलीही कुरापत काढलेली नसूनही, भारत दादागिरीने वागत असल्याचा 'शक' श्रीलंकेच्या राज्यकर्त्यांना येत राहिला. अशाच शंकेचे शल्य नेपाळच्या मनातही आहेच.

नेपाळ म्हणजे भारताच्या ईशान्य खांद्यावर मजेत बसलेला एक देश, असे आपल्याला वाटते. त्यात पुन्हा बहुसंख्य भारतीयांप्रमाणे नेपाळी लोकांची निष्ठा हिंदुधर्मावर. अज्ञानाच्या आनंदात देशकालपरिस्थितीचे भान विसरून जाणाऱ्या बऱ्याच हिंदुत्वनिष्ठांना तर

नेपाळचा राजा हिंदू, निधर्मी अधिकृत [illegible]
भलताच अभिमान वाटत असतो. आता ही गोष्ट खरी [illegible] इतिहासाच्या विशिष्ट पर्वात अफगाणिस्तान उर्फ गांधारापासून [illegible] ब्रह्मदेशापर्यंत सगळा मुलूख एकसंधच वाटे ज्या त्या भागात वेगळी राज्ये असली तरी ते भाग म्हणजे भारतवर्षाचेच अवयव, असे मानण्याची प्रथा होती. पण ही गोष्ट केव्हाची? तर जेव्हा आधुनिक अर्थाने राष्ट्र ही संकल्पनाच आकाराला आलेली नव्हती, घटक राज्ये आणि त्या सर्वांचे मिळून संघराज्य या कल्पनांचा जेव्हा विकास झालेला नव्हता. तेव्हाची! परंतु इंग्रज साम्राज्यशाहीचा अवजड रूळ आपल्या नकाशावरून जेव्हा फिरला तेव्हा या उपखंडात केवळ घटक राज्ये म्हणून नव्हे, तर स्वतंत्र राष्ट्रे म्हणून पाकिस्तान, नेपाळ इत्यादी राष्ट्रे अस्तित्वात आली आणि त्यांना मान्यता देण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नाही.

नेपाळ आणि भारत यांच्यातला आणखी एक दृढ बंध म्हणजे नेपाळी लोकांची भारतीय सैन्यात होणारी भरती. भारतीय लष्करात गुरखा रेजिमेंट्स नामक कडव्या लढवय्यांची जबरदस्त शक्ती इंग्रजांच्या वेळेपासून अस्तित्वात होती; ती आजही अस्तित्वात आहे आणि पुढेही राहील. गुरखा जवानांना आपण कधीही भाडोत्री सैनिक (Mercenary) मानले नाही. इतर भारतीय जवानांप्रमाणेच त्यांच्या सेवाशर्ती आणि वेतनश्रेणी असतात, आणि त्यांनीही आजवर लढाऊपणाच्या आपल्या व्यवसायाशी शंभर टक्के इमान राखले आहे. लष्करी जीवनात भारतावरील निष्ठा लवमात्र ढळू न देण्याची काळजी गुरखा शिपायांनी घेतलेली आहे. मात्र हजारो गरीब गुरख्यांना भारतीय लष्करात सामावून घेतले जाते हा भारताचा आपल्यावर उपकार आहे, असेही नेपाळने कधी मानले नाही. उलट, आपल्या लष्कराला नेपाळकडून शिपायांचा पुरवठा होतो हा नेपाळचा आपल्यावर उपकार आहे असे भारतालाही कधी वाटलेले नाही. रोख पगार द्यावा आणि चोख चाकरी घ्यावी, यात न कोणी उपकारकर्ता न कोणी उपकृत, असा पवित्रा नेपाळने घेतला तर त्याचे त्यात काय चुकले? भारतीय मानसात मुख्य भयगंड आहे तो इस्लामी आक्रमकांनी निर्माण केलेला. त्यामुळे हिंदू नेपाळच्या हिंदू प्रजेचा

भारतीय लष्कराला मिळणारा सहभाग बहुतेकांना स्वागतार्ह वाटत असला तर त्यात नवल नाही.

आम्ही काही भटके नुकतेच नेपाळला जाऊन आलो. परंतु नेपाळकडे जाताना आपण कुठे तरी विदेशात चाललो आहोत याचे भान आम्हांला थोडे उशीराच झाले. एक तर, भारतीय नागरिकाला नेपाळ प्रवेशासाठी काही ना काही प्रमाणित ओळखपत्र वाळगावे लागत असले तरी, पासपोर्ट-व्हिसा या विदेश प्रवासाच्या अटळ कर्मकांडाची काही गरज नसते. मुंबईहून दिल्लीला रेल्वेने जायचे आणि दिल्लीहून खाटमांडूला जाण्यासाठी हवाई जहाजाची तिकिटे काढायची, हा किती साधा-सोपा मार्ग वाटतो. पण भारतीय नागरिकांनी या गोड संभ्रमात राहू नये म्हणूनच वहुधा दिल्लीच्या विमानतळावर दरडोई दीडशे रुपये, विदेशप्रवास कर म्हणून वसूल करण्यात आले, तेव्हा मनातल्या मनात जळफळत म्हटले– हा कसला विदेश प्रवास? पण पासपोर्ट आणि व्हिसा वगळला तर बाकीच्या सर्व सोपस्कारांतून जावेच लागते. आपण कोणी गुन्हेगारांची टोळी तर नसू ना, असा स्वतःलाच संशय यावा अशा तपासण्या होतात. कस्टम खात्याच्या करारी करोलपणाचा अनुभव आल्यावर त्यांना गावरान मराठीत किंवा तमीळमध्ये ‘कष्टम्’ म्हणावेसे वाटते. वास्तविक आमच्या भिडूंपैकी दोघे निरुपद्रवी निवृत्त अध्यापक, एक इंजिनिअर, एक होमिओपॅथीवाले डॉक्टर! राहता राहिल्या दोन स्त्रिया. त्या फार तर स्त्रियांच्या हक्कांसाठी पुरुषांच्या विरुद्ध (म्हणजे तूर्त आमच्याशीच) लढत राहतील एवढ्याच जहाल. पण मला भास होत होता तो असा की, आम्ही कोणालाही न कळवता आणि स्वतःलाही नकळत, गर्द-गांजाचा चोरटा व्यापार करणारे असलो पाहिजे. लवकरच कस्टमवाल्यांचा आरंभीचा रुद्रावतार अधिकाधिक मवाळ होत गेला आणि आमचे सामान तपासण्याच्या लायकीचे नाही, हे त्या मंडळींच्या ध्यानात आले. मग ‘त्यांनी आपले पाणी जोखले आहे’ यांची आम्हांलाही चमत्कारिक जाणीव झाली!

*नाही तरी आम्ही चाललो होतो एका साध्याभोळ्या हेतूने.*

*मनोव्यापाराशिवाय दुसरा व्यापार आम्हांला करायचा नव्हता आणि आमची तशी ताकदही नव्हती.*

*आम्ही चाललो होतो हिमालयाच्या ओढीने.*

*हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या दऱ्याखोऱ्यांत विश्रब्ध पहुडलेला नेपाळ आम्हांला पाहायचा होता.*

*आमच्या डोळ्यांना तहान लागली होती ती हिमांकित खोऱ्यांतून खळखळणाऱ्या अवखळ अल्लड गिरिसरितांची.*

*आम्हांला मनात साठवायची होती नेपाळची हिरवी हिरवी सृष्टी आणि अर्ध-मंगोल अर्ध-भारतीय ठेवणीचे भाबड्या नेपाळी लोकांचे चेहरेमोहरे.*

'खाटमांडू' हे राजधानीचे नावच कसे अनोख्या मुलखातले वाटते. वास्तविक ते आहे काष्ठमंडप या शब्दाचे अपभ्रष्ट रूप! नेपाळमध्ये सगळे प्रवासी धाव घेतात त्या ठिकाणाचे नाव 'पोखरा'. पुष्कर (सरोवर) या शब्दाचा. हा अपभ्रंश ग्रामनामांचे जाऊ द्या, आम्हांला आकर्षण होते ते हिमाच्छादित शिखरांचे. एक वेळ भारतीय लोक नेपाळ, भूतान, सिक्कीम, तिबेट या सर्वांवर पाणी सोडायला तयार होतील, पण उंच उंच असंख्य शिखरे असलेला यच्चयावत हिमालय फक्त आपलाच आहे यावरचा त्यांचा विश्वास कदापि ढळणार नाही. तुम्ही खुशाल एव्हरेस्टला प्रत्येक भाषेत वेगवेगळी नावे द्या, तो जगाचा स्वर्गमाथा तद्दन भारतीय आहे हे आमच्या मनावर पक्के बिंबले आहे. तो आमचा गौरीशंकरच. मग कुणी काही म्हणो. दार्जिलिंगचे एक क्षितिज आपल्या दिमाखदार अस्तित्वाने व्यापून टाकणारी कांचनगंगा, (छे हो! किंचिनजुंगा नव्हे– कांचनगंगाच!) त्याचप्रमाणे धवलगिरी, नंगा, त्रिशूल, चौमुख, अन्नपूर्णा– ही केवळ शिखरांची नावे नाहीत, ही भारतीय दैवते आहेत आणि त्या सर्वांसकट हिमालय, उत्तर सीमेवरचा पहारेकरी, उमेचा पिता नगाधिराज, यांची आणि आमची ताटातूट पृथ्वीवरच्या सर्व राजकीय शक्तीही करू शकणार नाहीत असेच आम्ही मानतो. या उठवळ आधुनिक जमान्यात या उत्तुंग शिखरांवरचा इतरांचा अधिकार आम्ही

५.

# नेपाळदर्शन : १

आपल्याला वाटते की नेपाळ म्हणजे एक जरासे वेगळे संस्थान, एवढेच. भारतीय उपखंडात भारत म्हणजे दादा (The Big Brother)! पाकिस्तान म्हणजे आपल्यापेक्षा थोडा लहान, पण तरीही नेहमी गुर्मीत वागणारा एक त्रासदायक भाऊ! बाकी सगळे देश म्हणजे चवली-पावली-अधेली... वास्तविक परिस्थिती अगदी वेगळी आहे. नेपाळ, भूतान, बांगला देश आणि श्रीलंका ही सगळी स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्रे आहेत आणि त्यांना त्यांची त्यांची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. साधारणपणे भारतीय माणूस या राष्ट्रांची पृथगात्मता औपचारिकपणे मान्य करीत असला तरी अनौपचारिकपणे (किंवा मनातल्या मनात) तो या छोट्या राष्ट्रांना विनाकारणच भारतवर्षाचे भाग समजत असतो. गंमत अशी की, हे सत्य या छोट्या राष्ट्रांनाही पक्के माहीत आहे आणि त्यांना भारतामधील या मानसिकतेचा फार राग येतो. काही वर्षांपूर्वी भारताने केलेल्या लष्करी कारवाईमुळे बांगला देश जन्माला आला; पण पूर्वी ज्याप्रमाणे दिग्विजय करणारे सम्राट पराभूत राजाला त्याचे राज्य उदारपणे देऊन टाकीत, तसा बांगलादेशीयांना आपण त्यांचा मुलूख परत देऊन टाकला आहे, असे भारतात अनेकांना वाटते. त्यानंतर अलीकडे, भारताने कसलीही कुरापत काढलेली नसूनही, भारत दादागिरीने वागत असल्याचा 'शक' श्रीलंकेच्या राज्यकर्त्यांना येत राहिला. अशाच शंकेचे शल्य नेपाळच्या मनातही आहेच.

नेपाळ म्हणजे भारताच्या ईशान्य खांद्यावर मजेत बसलेला एक देश, असे आपल्याला वाटते. त्यात पुन्हा बहुसंख्य भारतीयांप्रमाणे नेपाळी लोकांची निष्ठा हिंदुधर्मावर. अज्ञानाच्या आनंदात देशकालपरिस्थितीचे भान विसरून जाणाऱ्या बऱ्याच हिंदुत्वनिष्ठांना तर

नेपाळचा राजा हिंदू, तिथला अधिकृत राष्ट्रीय धर्म हिंदू, याचा भलताच अभिमान वाटत असतो. आता ही गोष्ट खरी की इतिहासाच्या विशिष्ट पर्वात अफगाणिस्तान ऊर्फ गांधारापासून ते ब्रह्मदेशापर्यंत सगळा मुलूख एकसंधच वाटे. ज्या त्या भागात वेगळी राज्ये असली तरी ते भाग म्हणजे भारतवर्षाचेच अवयव, असे मानण्याची प्रथा होती. पण ही गोष्ट केव्हाची? तर जेव्हा आधुनिक अर्थाने राष्ट्र ही संकल्पनाच आकाराला आलेली नव्हती, घटक राज्ये आणि त्या सर्वांचे मिळून संघराज्य या कल्पनांचा जेव्हा विकास झालेला नव्हता. तेव्हाची! परंतु इंग्रज साम्राज्यशाहीचा अवजड रूळ आपल्या नकाशावरून जेव्हा फिरला तेव्हा या उपखंडात केवळ घटक राज्ये म्हणून नव्हे, तर स्वतंत्र राष्ट्रे म्हणून पाकिस्तान, नेपाळ इत्यादी राष्ट्रे अस्तित्वात आली आणि त्यांना मान्यता देण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नाही.

नेपाळ आणि भारत यांच्यातला आणखी एक दृढ बंध म्हणजे नेपाळी लोकांची भारतीय सैन्यात होणारी भरती. भारतीय लष्करात गुरखा रेजिमेंट्स नामक कडव्या लढवय्यांची जबरदस्त शक्ती इंग्रजांच्या वेळेपासून अस्तित्वात होती; ती आजही अस्तित्वात आहे आणि पुढेही राहील. गुरखा जवानांना आपण कधीही भाडोत्री सैनिक (Mercenary) मानले नाही. इतर भारतीय जवानांप्रमाणेच त्यांच्या सेवाशर्ती आणि वेतनश्रेणी असतात, आणि त्यांनीही आजवर लढाऊपणाच्या आपल्या व्यवसायाशी शंभर टक्के इमान राखले आहे. लष्करी जीवनात भारतावरील निष्ठा लवमात्र ढळू न देण्याची काळजी गुरखा शिपायांनी घेतलेली आहे. मात्र हजारो गरीब गुरख्यांना भारतीय लष्करात सामावून घेतले जाते हा भारताचा आपल्यावर उपकार आहे, असेही नेपाळने कधी मानले नाही. उलट, आपल्या लष्कराला नेपाळकडून शिपायांचा पुरवठा होतो हा नेपाळचा आपल्यावर उपकार आहे असे भारतालाही कधी वाटलेले नाही. रोख पगार द्यावा आणि चोख चाकरी घ्यावी, यात न कोणी उपकारकर्ता न कोणी उपकृत, असा पवित्रा नेपाळने घेतला तर त्याचे त्यात काय चुकले? भारतीय मानसात मुख्य भयगंड आहे तो इस्लामी आक्रमकांनी निर्माण केलेला. त्यामुळे हिंदू नेपाळच्या हिंदू प्रजेचा

भारतीय लष्कराला मिळणारा सहभाग बहुतेकांना स्वागतार्ह वाटत असला तर त्यात नवल नाही.

आम्ही काही भटके नुकतेच नेपाळला जाऊन आलो. परंतु नेपाळकडे जाताना आपण कुठे तरी विदेशात चाललो आहोत याचे भान आम्हांला थोडे उशीराच झाले. एक तर, भारतीय नागरिकाला नेपाळ प्रवेशासाठी काही ना काही प्रमाणित ओळखपत्र वाळगावे लागत असले तरी, पासपोर्ट-व्हिसा या विदेश प्रवासाच्या अटळ कर्मकांडाची काही गरज नसते. मुंबईहून दिल्लीला रेल्वेने जायचे आणि दिल्लीहून खाटमांडूला जाण्यासाठी हवाई जहाजाची तिकिटे काढायची, हा किती साधा-सोपा मार्ग वाटतो. पण भारतीय नागरिकांनी या गोड संभ्रमात राहू नये म्हणूनच वहुधा दिल्लीच्या विमानतळावर दरडोई दीडशे रुपये, विदेशप्रवास कर म्हणून वसूल करण्यात आले, तेव्हा मनातल्या मनात जळफळत म्हटले– हा कसला विदेश प्रवास? पण पासपोर्ट आणि व्हिसा वगळला तर बाकीच्या सर्व सोपस्कारांतून जावेच लागते. आपण कोणी गुन्हेगारांची टोळी तर नसू ना, असा स्वतःलाच संशय यावा अशा तपासण्या होतात. कस्टम खात्याच्या करारी करोलपणाचा अनुभव आल्यावर त्यांना गावरान मराठीत किंवा तमीळमध्ये 'कष्टम्' म्हणावेसे वाटते. वास्तविक आमच्या भिडूंपैकी दोघे निरुपद्रवी निवृत्त अध्यापक, एक इंजिनिअर, एक होमिओपॅथीवाले डॉक्टर! राहता राहिल्या दोन स्त्रिया. त्या फार तर स्त्रियांच्या हक्कांसाठी पुरुषांच्या विरुद्ध (म्हणजे तूर्त आमच्याशीच) लढत राहतील एवढ्याच जहाल. पण मला भास होत होता तो असा की, आम्ही कोणालाही न कळवता आणि स्वतःलाही नकळत, गर्द-गांजाचा चोरटा व्यापार करणारे असलो पाहिजे. लवकरच कस्टमवाल्यांचा आरंभीचा रुद्रावतार अधिकाधिक मवाळ होत गेला आणि आमचे सामान तपासण्याच्या लायकीचे नाही, हे त्या मंडळींच्या ध्यानात आले. मग 'त्यांनी आपले पाणी जोखले आहे' यांची आम्हांलाही चमत्कारिक जाणीव झाली!

*नाही तरी आम्ही चाललो होतो एका साध्याभोळ्या हेतूने.*

*मनोव्यापाराशिवाय दुसरा व्यापार आम्हांला करायचा नव्हता आणि आमची तशी ताकदही नव्हती.*

*आम्ही चाललो होतो हिमालयाच्या ओढीने.*

*हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या दऱ्याखोऱ्यांत विश्रब्ध पहुडलेला नेपाळ आम्हांला पाहायचा होता.*

*आमच्या डोळ्यांना तहान लागली होती ती हिमांकित खोऱ्यांतून खळखळणाऱ्या अवखळ अल्लड गिरिसरितांची.*

*आम्हांला मनात साठवायची होती नेपाळची हिरवी हिरवी सृष्टी आणि अर्ध-मंगोल अर्ध-भारतीय ठेवणीचे भाबड्या नेपाळी लोकांचे चेहरेमोहरे.*

'खाटमांडू' हे राजधानीचे नावच कसे अनोख्या मुलखातले वाटते. वास्तविक ते आहे काष्ठमंडप या शब्दाचे अपभ्रष्ट रूप! नेपाळमध्ये सगळे प्रवासी धाव घेतात त्या ठिकाणाचे नाव 'पोखरा'. पुष्कर (सरोवर) या शब्दाचा. हा अपभ्रंश ग्रामनामांचे जाऊ द्या, आम्हांला आकर्षण होते ते हिमाच्छादित शिखरांचे. एक वेळ भारतीय लोक नेपाळ, भूतान, सिक्कीम, तिबेट या सर्वांवर पाणी सोडायला तयार होतील, पण उंच उंच असंख्य शिखरे असलेला यच्चयावत हिमालय फक्त आपलाच आहे यावरचा त्यांचा विश्वास कदापि ढळणार नाही. तुम्ही खुशाल एव्हरेस्टला प्रत्येक भाषेत वेगवेगळी नावे द्या, तो जगाचा स्वर्गमाथा तद्दन भारतीय आहे हे आमच्या मनावर पक्के बिंबले आहे. तो आमचा गौरीशंकरच. मग कुणी काही म्हणो. दार्जिलिंगचे एक क्षितिज आपल्या दिमाखदार अस्तित्वाने व्यापून टाकणारी कांचनगंगा, (छे हो! किंचिनजुंगा नव्हे– कांचनगंगाच!) त्याचप्रमाणे धवलगिरी, नंगा, त्रिशूल, चौमुख, अन्नपूर्णा– ही केवळ शिखरांची नावे नाहीत, ही भारतीय दैवते आहेत आणि त्या सर्वांसकट हिमालय, उत्तर सीमेवरचा पहारेकरी, उमेचा पिता नगाधिराज, यांची आणि आमची ताटातूट पृथ्वीवरच्या सर्व राजकीय शक्तीही करू शकणार नाहीत असेच आम्ही मानतो. या उठवळ आधुनिक जमान्यात या उत्तुंग शिखरांवरचा इतरांचा अधिकार आम्ही

अधूनमधून नाइलाजाने मान्य करतो. पण प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर आमचा हिमालय आमचा आहे आणि तुमचा असला तरी तोही आमचा आहे! एका जर्मन गिर्यारोहकाने खवचटपणाने लिहून ठेवले आहे, 'या भारतीय बेट्यांना वाटते, की हिमालयाला फक्त दक्षिण बाजूच काय ती आहे आणि ती निर्विवादपणे आपली आहे. पण हिमालयापलीकडील लोकांना हिमालयाबद्दल काही भावना असतील असे त्यांच्या मनातही येत नाही.' असू दे असू दे बेट्या! तू तरी हिमालयाच्या अंतरंगात शिरलास ते गंगा-यमुनांचे उगम पाहातच ना? तू थोडाच पामीरच्या बर्फाळ पठारावरून हिमालयाच्या अंतर्भागात आलास? हजारो वर्षांचा आमचा वहिवाटीचा हक्क आम्ही सुखासुखी गमावणार नाही. संपूर्ण हिमालय आमचा आहे याचे कारण एकच, तो आमचा आहेच मुळी!

*कुठून कुठून कुठून माणसं हिमालयाची ओढ लागून त्याच्याकडे खेचली जातात.*

*महाभारतातलं स्वर्गारोहण पर्वच पाहा. शेवटी गेले का पांडव हिमालयाशिवाय आणखी कुठे?*

*अगदी प्राचीन काळापासून प्रपंचाला विटलेली माणसे जीवनाच्या उत्तरायणासाठी हिमालयाकडे जायला निघतात.*

*असेल ती कंथा-कंबळ घेऊन उत्तरेकडे मोहरा वळवावा आणि चालत राहावे. पडेल तेथे देह पडू द्यावा. जगला– वाचलात तर घ्या निवारा हिमालयाच्या ओसरीवर.*

*तिथे पोचेपर्यंत उन्हाने तापलेले, पावसाने भिजलेले आणि थंडीने फुटलेले शरीर भले काटक होईल.*

*मग लक्षात ठेवा, न भुकेची आच लागेल, न थंडीने थरकाप उडेल.*

*काळी कांबळी घेऊन चालत रहा. 'कं-बलवन्तं न बाधते शीतम्.'*

*आणि लागलीच काही गरज तर शोधा खडकामधले शिलाजित, किंवा घ्या कुणा ज्येष्ठ साधूकडून तिथल्या एखाद्या द्रोणागिरीवरची जडीबुट्टी!*

ही परंपरा कित्येक शतकांची. ती मोडू म्हणता मोडणार नाही, तोडू म्हणता तुटणार नाही. भले तुम्ही विसाव्या नाही तर एकविसाच्या शतकातले सश्रद्ध अथवा अश्रद्ध भारतीय असा. मध्यरात्रीच्या नीरव आकाशातून हिमालय तुम्हांला हाक घालील, जी फक्त तुम्हांलाच ऐकू येईल.

असले योग आयुष्यात केव्हा येतील ते सांगता येत नाही. तसा क्षण आला की पडशी खांद्यावर टाकून उत्तरेकडे तोंड करून मजल दरमजल करीत हिमालयाच्या सान्निध्याचे स्वर्गसुख घेण्यासाठी निमूटपणे चालू लागा. तेवढेच कोणाच्याही झाले तरी हाती उरते.

आमची ओढ मात्र या जातीची नव्हती.

आम्हांला हवे होते केवळ सौंदर्य, केवळ आनंद!

*रांगेमागे रांग अशी खडी ताजीम देणाऱ्या पर्वतांच्या श्रेणी आणि त्यांच्या मागे उभे असलेले रजतमुकुटधारी बलदंड सेनानायक.*

*आम्हांला न्याहाळायचे होते उंच उंच वृक्ष–भूर्जपत्रे फडकवणारे किंवा देवदारूंप्रमाणे आभाळाला लुचणारे.*

*नितळ नितळ निवळशंख नद्या आणि निर्झरिणी.*

*धुळीचा हबका न खाणारं वायुमंडळ आणि अधूनमधून आमच्या भेटीला येणाऱ्या सदाशीतळ झुळका.*

आपण का निघालो आहोत याची चर्चा अर्थातच कुणी केली नाही आणि ती करणं अगदीच विशोभित दिसलं असतं. तथाकथित धर्मस्थळांना आणि तीर्थस्थळांना भेट द्यायची कल्पना कोणाच्याच मनात नव्हती. आमचे मंदिरच वेगळे. ज्या मंदिराला आकाशाचा विशाल चांदवा आहे, ज्याचे प्राकार म्हणून हिमालयाचे कडेच उभे आहेत, ज्याचे आधारस्तंभ आणि ध्वजस्तंभ म्हणून गगनगामी हिमशिखरेच पाय रोवून ठाम उभी आहेत– अशा महान मंदिरात जावे, तिथल्या अद्‌भुत सौंदर्याने स्तिमित व्हावे आणि काही अनाम अलौकिक भावनांचा कल्लोळ अनुभवावा.. हीच आमची सर्वांची माफक इच्छा होती. पिढ्यान्‌पिढ्या

रक्तातच रुजलेली ओढ केवळ या एका इच्छेपोटी आम्हाला नेपाळकडे खेचून नेत होती.

विमानाच्या खिडकीपाशी बसूनही काळ्यामिट्ट अंधाराशिवाय बाहेर काहीही दिसणार नव्हते. पण अशा घटकेलाच मिटल्या डोळ्यांना पुढल्या सुखाचे स्वप्न दिसत असते. तासाभरात विमान खाटमांडूच्या तळावर उतरले. आम्हांला सर्वतोपरी मदत करण्यासाठी आलेले स्थानिक हितकर्ते उबदार निवाऱ्याच्या हॉटेलमध्ये घेऊन गेले, आणि दुसऱ्या दिवशी सकाळपासून घडणार असणाऱ्या नेपाळदर्शनाची काल्पनिक चित्रे डोळ्यांपुढे खेळवत खेळवत आम्ही निद्राधीन झालो.

अशा प्रसंगी रात्र संपून दिवस केव्हा एकदा उगवतो असे वाटत राहते. पण ते चारदोन क्षणच. विमानाने झाले तरी हजार कोस उल्लंघून आल्यावर जादुगार झोपेची बोटे आपले डोळे अलगद मिटवून टाकणारच.

०००

६.

# नेपाळदर्शन : २

नेपाळ म्हणजे खाटमांडू आणि खाटमांडू म्हणजे पशुपतिनाथ— असे समस्त यात्राकंपन्यांचे समीकरण असते. साहजिकच आमच्यासारख्या धर्म 'भीरू' प्रवाशांनाही मार्गदर्शक प्रथम घेऊन जातो तो पशुपतिनाथाच्या दर्शनाला.

सगळ्या भारतीय उपखंडातून ज्या देवाच्या दर्शनाला लक्षावधी भाविक जातात त्या भगवान पशुपतिनाथाची वसती अतोनात गलिच्छ आहे. त्या क्षणी, नेपाळ हे हिंदू राष्ट्र आहे हे पक्के ध्यानात येते.

हिंदू मंदिरांचे हेच तर वैशिष्ट्य. या वैशिष्ट्याचा अनुभव काशीविश्वेश्वराच्या मंदिरात पूर्वी घेतला होता. अन् तेव्हा 'पुन्हा महान तीर्थक्षेत्री आपण जायचे नाही', असा निश्चय केला होता. पण माणसाचे मन किती कोडगे ऊर्फ क्षमाशील असते! काशीच्या विश्वनाथाने शिकवलेला धडा आपण दिवसमास जातात तसा विसरून जातो आणि विष्णुगया, उज्जैनीचे महाकालाचे मंदिर, आसाममधील कामाख्या अशा सर्व प्रसिद्ध ठिकाणी नाक मुठीत धरून घाणीचे दर्शन घेऊन येतो. पशुपतिनाथ असला म्हणून काय झाले? देव हिंदूंचा, मंदिर हिंदूंचे, राज्य हिंदूंचे! तेव्हा देवाधिदेव महादेव स्वच्छ, शांत, सुंदर, प्रसन्न वातावरणात राहीलच कसा?

मोठ्या रस्त्यावरून जाणारी देवळाची वाटच मुळी भक्ताची कसोटी पाहणारी असते! शुचिर्भूत होत्साते मंदिरात जाण्यासाठी बऱ्याच लहानथोर भक्तांना मार्गावरच दुतर्फा विधी उरकणे भाग पडत असावे. वाटभर धूळच धूळ. अपवाद मधेच आडव्या गेलेल्या गटाराचा. मग मंदिराच्या प्रांगणात फरसबंदी वाटा. त्यांच्यावर पसरलेला केरकचरा शिवरात्रीला तरी झाडतात की नाही कोण जाणे! डाव्या बाजूला

बाघमती नदी नावाचा गलिच्छ पाण्याचा ओहोळ, साधारण २५/३० फूट रुंदीचा. पल्याडचा घाट मढेघाट! देवळात जाताना चितेवर जळणाऱ्या प्रेताचे दर्शन आधी घडते. भोलानाथ स्मशानात नसले तर स्मशान भोलानाथाजवळ जाते असे दिसते! आमच्या नजरेसमोरच एका बालकाचे मांजरपाटात गुंडाळलेले कलेवर त्याच्या आप्तांनी घाटाच्या शेवटच्या पायरीवर नेले, बाळाची पावले वाघमतीच्या पाण्याला लावली, कोणा साधूचा (!) आशीर्वाद घेतला आणि मग ते कलेवर पुढील संस्कारासाठी (!) घेऊन गेले. नवजात कृष्णाच्या पावलांच्या स्पर्शासरशी यमुना दुभंगली आणि वसुदेवाला तिने वाट करून दिली, त्याप्रमाणे अशा बालकांची पावले लागताच बाघमती दुभंगून कैलासाचा मार्ग सोपा करत असली तर नवल नाही!

साक्षात् मंदिरात फुले, माळा, नारळ, प्रसाद विकणाऱ्या आणि विकत घेणाऱ्या स्त्री-पुरुषांची अर्थातच झिम्मड उडाली होती. प्रदक्षिणेच्या वाटेवर आणि मुख्य प्रवेशद्वारापाशी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. या रांगेत दोनतीन सरदारजी उभे असलेले पाहून फार गंमत वाटली. पूर्वी अशी गंमत वाटली नसती. हिंदू-शिखांचे नाते तेव्हा अभेदाचे होते. 'सच्चिदानंद' म्हटले काय आणि 'सत् श्री अकाल' म्हटले काय, दोन्ही एकच असत. या शिखांना त्यांच्या अतिरेकी बांधवांनी पाहिले तर यांच्यासमोर प्राणभय उभे राहील अशी कल्पना मनाला स्पर्शून गेली. बाकी कुठल्याच मंदिरात पाऊल ठेवायला उत्सुक नसलेल्या माझ्यासारख्या माणसाला करायच्या आहेत काय या उठाठेवी! तर ते एक असो.

इथे कचऱ्याचा ढीग, तिथे कुजलेले निर्माल्य, पवित्र मंदिरात जाताना अनवाणी पावलांनी जावे लागत असल्यामुळे तळव्यांना सतत जाणवणारी धूळ आणि आपल्या हक्काच्या मंदिरात बेवारशी गाईगुरांनी टाकलेले पवित्र गोमयपुंज... यांतून कसावसा मार्ग काढत मी मंदिराच्या प्राकाराबाहेर माया बाजारात आले.

येथे काय किंवा नेपाळमध्ये कोणत्याही देवळाबाहेर काय, बाजाराचे रूप एकच असते. खऱ्या-खोट्या रुद्राक्षांच्या माळा, जपानी-चिनी-कोरियन-तैवानी मण्यांचे किंवा लटक्या मोत्यांचे सर; नक्षी

केलेल्या लाकडाच्या छोट्या-मोठ्या पेट्या; प्राचीन वाटणाऱ्या पण गेल्या वर्षसहा महिन्यांतच घडवलेल्या मूर्ती आणि 'शालभंजिका' ऊर्फ बाहुल्या; म्यानासकट कुकऱ्या; 'ओम् मणिपद्मने' म्हणत हातात फिरवण्यासाठी बौद्ध भिक्खू वापरतात तशी चक्रे; तांब्याच्या, काश्याच्या, रुप्यासारख्या भासणाऱ्या जस्ताच्या, वर मणी जडवलेल्या, नानाकार नक्षीदार वस्तू; आदिम जनजातीतल्या स्त्रिया घालतात तसे रंगीत बैलमण्यांचे गळेसर; (दिल्ली-मुंबईच्या फॅशनेबल बाया असले गळेसर हौसेने घालतात आणि त्याला 'एथ्निक' म्हणतात!) असेच आणखी खूपखूप! पाचशे रुपये किंमत सांगितलेली चीज धीरत्व धरून पन्नासाला मागावी, मग साठपर्यंत मिळते. आपण भाव कसा कमी करायला लावला असे समाधान गिऱ्हाइकिणीला लाभावे तर तिच्या गळ्यात दीड दमडीची माळ भल्या किंमतीला कशी बांधली, हा इशारा विक्रेत्याने आपल्या सोबत्याला करावा.

सारांश, उभयपक्षी सुख होते!

स्थितप्रज्ञ पशुपतिनाथाला वाघमतीच्या तीरावर करू दे तपश्चर्या. अमंगलाकडून मंगलाकडे नेवो बिचारा कधी तरी त्याच्या भक्तमंडळींना. चमत्कारिक उदास भावनेने पशुपतिनाथाकडे पाठ फिरवल्यावर मनात एक विचार चमकून गेला...

*अयोध्येत रामाचे देऊळ उभारण्यासाठी करसेवा ऊर्फ कारसेवा करायला हजारो स्त्री-पुरुषांना उद्युक्त करणाऱ्या लालकृष्णांसारख्या अतिरथींनी देश-विदेशातील यच्चयावत हिंदू मंदिरे झडझडून स्वच्छ करण्यासाठी आपल्या अनुयायांना प्रेरणा दिली, तर केवळ अयोध्येला नव्हे पण जागोजागी रामाची मंदिरे उभी केल्याचे श्रेय त्यांना मिळेल! मंदिरे, मशिदी, गुरुद्वारे आणि एकूणच सर्व प्रार्थनास्थळे यांच्या स्वच्छतेचा आणि सुंदरतेचा तौलनिक अभ्यास करण्याची बुद्धी हिंदू भाविकांना झाली तर त्यांचे डोळे उघडतील अशी मला आशा वाटते.*

मुलांनी परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहावी याची दिशा दाखवण्यासाठी जशी आदर्श उत्तरपत्रिका सिद्ध करून दाखवतात तसे

समस्त भक्तजनांना दिल्लीचे बहाई प्रार्थनामंदिर दाखवावे. या वहाई मंदिराचा परिसर विशाल आणि कमालीचा साफ ठेवलेला आहे. गडवड, गोंधळ, बेशिस्तपणा, वेताल वर्तणूक येथे होऊच शकत नाही. प्रार्थनामंदिर एका महाप्रमाण कमलकळ्यासारखे आहे. निळ्या निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर ते फार खुलून दिसते. उगवत्या आणि मावळत्या ज्योतिर्गोलांचा मंद प्रकाश कमलकळ्याच्या सौंदर्यात तांवुसपणाची खुलावट आणतो. मध्यान्हीच्या प्रखर उन्हात असो की रात्रीच्या चांदण्यात असो, या कमलाकार मंदिराची शोभा उणावत नाही, दुणावते. बाहेरच्या प्रवेशद्वारापासून प्रार्थनामंदिराच्या अंतर्भागापर्यंत अवर्णनीय निर्मळपणा आहे. प्रत्यक्ष प्रार्थनामंदिरात न कसली मूर्ती, न उपासनेचे कर्मकांड. पुजारी नाहीत, पुरोहित नाहीत. भटा-पंड्या-बडव्यांचे पाय इथे फिरकूच शकत नाहीत. इथे आहे विशालता. अगाध शांतता. कोणी कोणत्याही धर्माचा असो, पंथाचा असो, त्याला मज्जाव नाही; उलट त्याचे स्वागतच आहे. शांतपणे कोणीही जावे, शांतपणे बसावे, शांतपणे मनातल्या मनात चिंतन करावे, त्या विशाल घुमटाखाली आणि उत्तुंग स्तंभांच्या साक्षीने मन निववावे, सर्व आंतरिक कोलाहल विसरण्याचा प्रयत्न करावा, याहून वेगळी अपेक्षाच तेथे नाही. 'आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका। पितृभूः पुण्यभूश्चैव' असे आपण हिंदू आहोत, याचा ज्यांना गर्व आहे, ते जर पशुपतिनाथ आणि बहाई मंदिर यांचे पाठोपाठ दर्शन घेतील तर त्यांना काही वेगळा साक्षात्कार होईल अशी आशा करावी का?

कदाचित असेही असेल की,

*मध्यरात्रिं नभघुमटाखाली*
*शांति-शिरीं तम चवऱ्या ढाळी*
*त्यक्त बहिष्कृत मी ज्या काळी...*
*एकान्तीं डोळे भरती...*

अशी अवस्था ज्यांना रुचत नाही त्यांनाच हिंदू म्हणत असावे.

पशुपतिनाथाचा निरोप घेतला. तेथून भक्तपूरपर्यंत हेच

विचारचक्र मनात भिरभिरत असूनही कोडगेपणाने भक्तपूरच्या देवीच्या देवळात अस्मादिक गेलेच! या बाजूला पुन्हापुन्हा कोण येणार, एवढा एकच आधार या कोडगेपणाला पुरतो. मात्र भक्तपूरच्या मंदिरसंकुलात पशुपतिनाथापेक्षा वातावरण तुलनेने चांगले होते. मंदिराच्या आवारात नेपाळी कलांचे दर्शन घडवणारे एक कलासंग्रहालय होते. येथे एक जुना राजवाडा असल्यामुळे लाकडावरील नक्षीकामाचे लक्षणीय नमुने मुबलक आहेत. आवारातच दुकाने असली तरी बाजारूपणा कसलाही नाही. स्थापत्यही अगदी वेगळ्या ढंगाचे आणि म्हणून चित्ताकर्षक आहे. एकंदरच पशुपतिनाथापेक्षा चंडिकाबाईजवळ नीटनेटकेपणा आणि साजसौंदर्य अधिक आहे. बाकी यात नवल नाही. हे गुण बाईमाणसाजवळ असणारच. नाही का!

एक सकाळ देवदर्शनासाठी खर्च झाल्यावर ते प्रकरण समाप्त झाले. आपला बहुमोल वेळ हिमशिखरांच्या दर्शनाअभावी आपण वाया घालवला, ही चुटपूट मनाला लागलेली असतानाच क्षुधाशांती आणि वामकुक्षी ही दोन श्रेष्ठ कर्तव्ये पार पाडली आणि अस्तंगत होणारा सूर्य पाहण्यासाठी स्वाऱ्या नागरकोटच्या पहाडांकडे उत्सुक मनाने रवाना झाल्या.

खाटमांडूपासून नागरकोटचा रस्ता, पावसाळ्यात मुंबईचे रस्ते असतात तसा होता. भरीला हा रस्ता एकेरी वाहतुकीला जेमतेम पुरेल एवढाच रुंद. त्यामुळे गाडी नागरकोटला पोचेपर्यंत भगवान सहस्ररश्मी चांगलेच कलंडले होते. या बेट्या सूर्यचंद्रांची मिजास भलतीच असते. यांच्या आगमनाचे स्वागत करायला आणि निर्गमनप्रसंगी निरोप द्यायला आपण मुद्दाम जावे, की हे महाशय लहरीपणाने ढगाआड गेलेच म्हणून समजा! मग तो कन्याकुमारीला तीन समुद्रांच्या संगमावरचा, चंद्रसूर्याच्या एकसमयावच्छेदेकरून होणाऱ्या उदयास्तांचा खेळ असो थरच्या वाळवंटात क्षितिजापर्यंत पसरलेल्या अफाट सपाटीवरचा तेजोगोलांच्या उदयास्ताचा लपंडाव असो की नेपाळातली धूलिखेल, नागरकोट, पोखरा अशी रविशशिमंडलांच्या उदयास्तासाठी खास नावाजलेली स्थळे असोत! नागरकोटला काय दिसेल? 'सूर्य अस्तगिरिवरती' दोनचार क्षण का

होईना मुखडा दाखवून गेला! मी स्वतःशीच गुणगुणलो, 'क्षितिजावरल्या हिरण्यकेशी, गडे जरा कर वर मुखडा' बहुधा माझे गाणे ऐकूनच दर्शन दिले–न–दिलेसे करून सूर्यनारायण अपरदिशेच्या स्वाधीन झाले. मात्र एका सुंदर अनुभवाची देणगी जाता जाता त्यांनी आम्हांला दिली. पश्चिमेचा रंगदार प्रकाश झेलत पूर्वेला आपल्या शुभ्र ऐश्वर्याने उठून दिसणारे हिमगिरी आम्ही नागरकोटहून पाहू शकलो. ही रांग कोणती, त्या शिखराचे नाव काय, असले प्रश्नही आपण अशा वेळी अकारण विचारत असतो. त्या क्षणी ते असतात नामातीत. केवल-रूप, अनिर्वचनीय.

*ते असतात महाकाय देवतात्मे.*
*पायांतळीच्या क्षुद्र दुनियेला नाकारून*
*आपल्याच ध्यानात गढलेले शुभ्रकेश महर्षी.*
*तरीही लोभावून येतात देवांगना,*
*आपला साजशृंगार त्यांच्या ऐन्यात न्याहाळण्यासाठी.*
*हे एकेक अचेतन भासणारे शुद्ध चैतन्य,*
*माणसांच्या विकारांनी कधीही न कोमेजणारे.*
*हे करतात मावळत्या सूर्याची तीन आचमने*
*आणि उगवत्या चंद्राच्या अंधुक प्रकाशात*
*भासतात उत्तुंग वल्मीकांसारखे.*
*पण जेव्हा कोसळतो आकाशमध्यावरून*
*प्रकाशाचा प्रचंड प्रपात,*
*तेव्हा यांच्या अंगावर खेळतात*
*अजस्र सर्पांच्या टाकून दिलेल्या रुपेरी काती.*
*हेच पेरतात अश्रद्धांच्या मनांत*
*अनाकलनीय प्रार्थनाबीजे.*
*हे शांत, निःशब्द, निवान्त.*
*आणि तरीही उभी करतात आमच्या मनांत*
*अनामिक वादळे यक्षप्रश्नांची.*
*यांचे पूर्ण प्रकट दर्शन स्तिमित करणारे,*
*अन् अधुरे दर्शन अकारण व्याकुळ करणारे.*

नागरकोटची अर्धघटका मी आठवतो, आता, शांतपणे.

मनात निर्माण झालेल्या चक्रावर्ताचा कसाबसा का होईना, आलेख काढतो. पण अमोरसमोर हा अनुभव घेत असताना मात्र मी निरर्थक बडबड करू शकतो! चावट चकाट्या पिटतो किंवा या महापुरुषांना उद्देशून '-बसलेत अच्चे आपल्याच रुबाबात' असे फाजील सलगीचे उद्गारही काढू शकतो.

खरंच. एका कुडीत आपण एक असतो की अनेक?

०००



७.

# नेपाळदर्शन : ३

पर्यटकांसाठी खास आकर्षण म्हणून ज्या स्थानाचा प्रथम उल्लेख होतो ते सहसा पर्यटकांनी टाळावे असे स्थान असते, आणि खरी 'मजा' तिथे नव्हे तर त्याच्या जवळ दुसऱ्याच एखाद्या ठिकाणी लुटायची असते.



काश्मीरमध्ये सगळे श्रीनगरला जातात आणि परत आपल्या मुलखात आल्यावर श्रीनगरपेक्षा पहलगाम किंवा गुलमर्गच कसे सुंदर आहे याचे रसभरित वर्णन करतात.

'कुलू'ला जायचे आणि सर्वाधिक आनंद घ्यायचा तो 'मनाली'ला.!

नेपाळदेखील याला अपवाद नाही. 'खाटमांडूला फुकट वेळ घालवू नका. भेट देण्यालायक जागा म्हणजे पोखरा.' ही माहिती आधी

ऐकलेली होतीच. पण प्रत्यक्ष पडताळा घेतला नाही तोपर्यंत शंभर टक्के विश्वास कसा ठेवणार!

आता खाटमांडूहून पोखऱ्याला जायचे तर भुर्रदिशी विमानातून जाता येते, विमानातून परतता येते. पण नेपाळचे अंतरंग विमानातून कसे दिसणार? एक वेळ विमान, एक वेळ मोटर... असा सुवर्णमध्य सुचायला फारशी बुद्धिमत्ता लागत नाही; पण तो सुवर्णमध्य जमविणे दुर्घट असते. नाही तरी मला नेहमीच दुसऱ्या कुठल्याही वाहनापेक्षा मोटरने प्रवास करणे आवडते. त्यात पुन्हा आम्हां सर्वांसाठी खास व्हॅन मिळाली. तेव्हा प्रथम तरी या खुष्कीच्या प्रवासाला खुशीने निघालो.

पहिले पाचपंचवीस मैल मजेत प्रवास झाला. हवेत सुखकर गारवा होता, धुक्याची बुंथी दिशांच्या मुखमंडलावरून दूर झालेली नव्हती, आणि भल्या सकाळचा ताजा ताजा उत्साह अंगी होता. एकूण अंतर दोनशे किलोमीटर्सचे होते, म्हणजे पाच तासांत काटावे एवढेच होते.

कसचे काय नि कसचे काय! शंभर एक किलोमीटर्सचा रस्ता इतका खाचखळग्यांचा होता, की चंद्रावरून पृथ्वीकडे पाहणाऱ्या चंद्रयात्रींना इथली कृष्णविवरे चंद्रयात्रींना दिसत असणार! साहजिकच समस्त 'चिमणराव श्टेट गेष्टांचा' प्रवास खळग्याखळग्यांतून धक्के-गचके खात खात झाला असला तर नवल नाही. उन्हाळ्याच्या मोसमात कोकणसेवक बोटीने किनाऱ्यापासून दूर नांगर टाकावा आणि मग डकाव डकाव डुचमळणाऱ्या होडग्यातून घोवासकट निघालेल्या गोमूने कसेबसे जमिनीवर पाय ठेवावे– थेट अशीच तऱ्हा झाली. वाहनाचे नाव मोटर पण चाल पडावाची, यालाच म्हणतात 'टू इन वन!' अशा वेळी प्रवासाला 'सफर' म्हणतात ते इंग्रजी अर्थाने हे कळते! मग प्रवासाचे अंतर, असते त्यापेक्षा जास्तच वाटू लागते.

दीर्घ अंतर काटून पोखऱ्याच्या पंचक्रोशीत आलो मात्र, दृष्टी निववणारे हिमाच्छादित पर्वत क्षितिरेषेला चमत्कृतिपूर्ण आकार देऊ लागले. तीन शिरे असलेली, अस्ताव्यस्त पहुडलेली अन्नपूर्णा आणि तिच्या लगतच प्रचंड देवमाशाचे शेपूट पाण्यातून वर यावे तसे मत्स्यपुच्छ शिखर ही या रजतसृष्टीतली मुख्य पात्रे. दूर क्षितिजावर आपल्या ऐश्वर्याचा दिमाख दाखवत एकाकी उभा असलेला धवलगिरी दिसतो, पण

त्याचे दर्शन असे वाटेल तेव्हा घडत नाही. प्रातःकाळी शुचिर्भूत होऊन आपण दर्शनाला गेलो तरच हे धौलागिरी महाराज दर्शन देतात. पोखऱ्याला पोचलो तेव्हा दिवसाचा अंतिम प्रहर सुरू होता. त्यामुळे शहराच्या आसमंतातल्याच स्थळांना भेट देणे शक्य होते. पोखरा म्हणजे पुष्कर नावाला शोभेल असे सरोवर हे पोखऱ्याचे वैभव. त्याच्याखेरीज पोखऱ्याला, प्रेक्षणीय प्रेक्षणीय म्हणतात तशी स्थळे सपाटीवर फारशी नाहीत. आवर्जून दाखवले जाते असे एक ठिकाण म्हणजे पोखऱ्याचा धवधबा. तो पाहण्यासाठी तिकीट काढावे लागते. तिकीट काढून आत गेल्यावर प्रथमदर्शनी पदरात पडते ती निराशा. पण धीर धरून पुढे गेल्यास तुम्हांला एक मुलखावेगळा धबधबा दिसू शकतो. सहसा धबधबा म्हटला की, तो कड्यावरून उड्या घेणारा असतो. पण इथे धबधवा आहे तो भूमीच्या पोटात. खोल खोल तळ असलेल्या अंधाऱ्या विहिरीत डोकावल्यावर जशी डोळ्यांना आणि मनाला भोवळ येते तशीच अवस्था या धवधब्याच्या दर्शनाने होते. पाणी भूपृष्ठावरून वाहत वाहत येते आणि जमिनीत खोल झिरपते; त्यामुळे येथे नाना आकारांची विवरे खोदली गेली आहेत. चाळीस-पन्नास फूट खोल असलेल्या एका विवराच्या तोंडामधून जलप्रपात कोसळतो पण पुन्हा एका खडकावर आपटून तो त्याच्याही पेक्षा खोल असलेल्या दुसऱ्या विवरात जाऊन आदळतो. आणि मग पुढे? पुढे काय ते माहीत नाही! धबाबा आदळल्यानंतर सहसा पाण्याने निमूटपणे दरीची वाट धरायची असते आणि नदी-निर्झरणीच्या रूपाने वाहत राहायचे असते. आपल्या परिचयाचे गिरसप्पा, गोकाक, दूधसागर प्रभृती 'जंटलमन' धवधवे अशाच ठरलेल्या मार्गाने, शहाणपणाने आपली वाटचाल करतात. पण एका विवरातून दुसऱ्या आणि तिथून तिसऱ्या, हा म्हणजे अगदीच अगोचरपणा झाला!

ही शोभा तशी 'भीषण' सुंदर आहे. पण ती पाहायला तिकीट काढायला लागणे हा शुद्ध अन्याय झाला! मुशाफिरांकडून प्रवेश शुल्क वसूल केल्यावर जमा केलेल्या पैशांतून त्या जागेची निगराणी अधिक कसोशीने तरी करायला हवी होती. पण इथे धबधब्याभोवती पाहावे तर उखीरविखीर जागा, कसेबसे तग धरून, मात्र सर्व बाजूंना पसरलेले

तण, अगदी जुजबी कठडे. बाकी सगळा भरिभार ईश्वरावर, अशी व्यवस्था म्हणजे अवस्था आहे.

प्रवासात पाहण्यासारखे काही नसले की बाजार सुचतो. मित्रमंडळींनी सुचवलेल्या किंवा त्यांना हव्या असलेल्या जिनसा फारशा खरेदी न करता आपण उगीचच एक चक्कर मारायची, इतकेच. आधीच दिवस लहान. एकाएकी काळोख घेरायला लागतो. चक्क साडेपाच वाजता चहूदिशांनी काळोख दाटत जातो. आपण आपली भ्रमंती थांबवून हॉटेलच्या उबदार आश्रयाला जावे हेच बरे असते. निदान पोखऱ्याला!

नागरकोटला सूर्यास्त पाहिला होता, पोखऱ्याला सूर्योदय पाहायचा होता. ज्यांच्या पायांत बळ असते आणि अंगात उदंड तकवा असतो त्यांनी भल्या पहाटे गिर्यारोहण करून एखाद्या उत्तुंग शिखरावरून उगवत्या सूर्याला वंदन अवश्य करावे आणि रुपेरी डोंगरावर सोन्याचा बेमालूम मुलामा कसा चढतो ते पाहावे. आमच्या प्रवासी मित्रसंघात प्रवेश करण्यासाठी वयाची किमान मर्यादा साठ वर्षे असल्यामुळे असला काही विक्रम करणे सर्वांनाच अशक्य होते. स्थानिक मार्गदर्शकाचे म्हणणे असे की आम्ही प्रत्येकी दीड हजाराप्रमाणे तीन टॅक्शा केल्या तर दहाएक किलोमीटर अंतर काटून सुंदर सूर्योदय पाहता येईल. आम्ही हा प्रेमळ आग्रह ताबडतोब मोडून काढला आणि त्याऐवजी होडीतून भल्या पहाटे सरोवराचा फेरफटका करणेच श्रेयस्कर, असा पर्याय पसंत केला. कधी कधी आपण चुकून किती बरोबर निर्णय करतो याचा लगोलग प्रत्यय आला.

*पाणी संथ होते, नितळ होते.*
*होडीशी लाडीगोडी करणाऱ्या लाटांच्या चुंबनाचा चुबुक चुबुक आवाज सोडला*
*तर सारे कसे शांत शांत होते.*

*वल्ही मारणारी तरणी पोरे–*
*त्यांच्या हालचाली सहजपणाने होत होत्या.*

*त्यांच्या मुखी गाणी नव्हती.*
*पण अचकट विचकट भाषाही नव्हती.*

*खूप विशाल, पण रुंदीपेक्षा लांबीच मोठी*
*अशा सरोवराला गर्द हिरव्या झाडांची झालर लावलेली होती.*
*नावा हाकारल्या तेव्हा*
*मनात न सूर्योदय दिसण्याची आशा*
*न हिमशिखरांचे दर्शन घडेल असा विश्वास!*
*अवचितच त्या सोनसकाळी*
*भाग्य सोनपावलांनी चालत आले.*
*सरोवराच्या पूर्व सीमान्तावरून मेघांचा केशरगुलाल उधळत*
*सूर्य उदयाला आला.*
*उगवतीपासून आमच्या होडीपर्यंत*
*त्याच्या प्रकाशझोताचा सोनसळी शेला*
*झगमगत राहिला.*

*उत्तरेच्या क्षितिजावर*
*पहाटे पहाटेच दिसू लागलेल्या हिमशिखरांवर*
*कोवळ्या किरणांचा गुलजार हात फिरला.*
*मत्स्यपुच्छाची रुपेरी दौलत लखलखली.*

*अन्नपूर्णेच्या मुखाचा गौरवर्ण माफक माफक तांबूस झाला.*
*वायव्य कोपऱ्यात, जवळ जवळ पश्चिमेलाच म्हणा ना*
*धुक्याची धाबळी खांद्यावरून घसरलेली आहे असा धवलगिरी*
*सर्वांगी लावलेल्या विभूतीमुळे*
*शोभायमान दिसू लागला...*
*महाप्रभावशाली महापुरुषच जसा!*

स्तिमित झालेले असूनदेखील सारे मुखरही झाले होते. सर्वांनाच माहीत झालेली शिखरे पुन्हा पुन्हा एकमेकांना दाखवण्यात एक वेगळी

धन्यता वाटत होती. श्वापदांचा मुक्त संचार असलेल्या रानात सराईतपणे वावरणारे शिकारी जसे एकमेकांना, तो पहा हत्तीचा कळप. अरे, तो रानगवा पाहिलास का? ते पहा तिकडून सांवर जातंय, अशी ओळखीच्या प्राण्यांचीच पुन्हा ओळख करून देतात, तसेच आमचे चालले होते... 'अन्नपूर्णेची झोप चाळवली का?', 'तिने कूस बदलल्यासारखी दिसते, नाही?', 'मत्स्यपुच्छाचा आकार आता अधिकच रेखीव दिसतो आहे', 'धवलगिरी पुन्हा पुन्हा दिसणार नाही, दिसतोय तोवर पाहून घ्या.' अशी सारखी टकळी सुरू होती.

उन्हाची झळाळी वाढू लागली. पाण्याने एकटक आकाशातली प्रतिबिंबे झेलून हृदयाशी धरलेली दिसली. पाणी शांत आणि स्थिर असले तर हिमगौरीचा मुखडा आरशात हुबेहूब दिसावा तसा आभास! पाणी जरा झिळमिळले की, क्षितिजावर स्थिर असलेल्या हिमरेखेच्या कमानदार रेषा, पाताळाकडे जाणाऱ्या नागकन्यांच्या नागमोडी वाटांसारख्या झुलताना दिसतात. सूर्योदयाने केलेली किमया पाहण्यासाठी डोंगरमाथ्यावर गरुडझेप घेता आली नाही, म्हणून काय झाले? या पाणभुईवरून देखील तीच किमया नवे नवे अनुभव देण्यात जराही कसूर करत नव्हती.

*'अशी पाहू, तशी पाहू, कशी कशी पाहू तुला*
*या रुपेरी मासोळीची, छबी तरी घेऊ कशी?'*

अशी मनाची अवस्था होऊन देखील कॅमेऱ्यांचे मोहरे कधी उंच शिखरांकडे तर कधी खोल पाण्याकडे आपोआप वळत होते. लहानग्याच्या गालाचे अधाशीपणाने पापे घ्यावे तसे उगवतीवरचे बिंब या कॅमेऱ्यांनी पुन्हा पुन्हा टिपले. ध्यानस्थ शिखरांचे चित्रण करण्यासाठी आणि मऊसूत होऊन पाण्यावर लोळणाऱ्या त्यांच्या प्रतिबिंबांना पकडण्यासाठी बारंवार कॅमेऱ्यांचे क्लिक् क्लॅक् क्लिक् क्लॅक् सुरू होते. नेपाळात आल्याचे सार्थक या सुनहरी घटकेने झालेले आहे, अशी मनोमन खात्री झाल्यावरच आमच्या अधाशीपणाला जरा उतार पडला. तोवर आम्ही सरोवराच्या मध्यभागी असलेल्या एका मंदिरापाशी आलो.

त्या लहानग्या बेटावर, आकाशावर मजेदार आकृती रेखणाऱ्या झाडांच्या फांद्या होत्या आणि त्यांच्या झरोक्यांतून दिसणारी शिखरे पुन्हा पुन्हा डोळे खेचून घेत होती. मंदिर शाक्तपंथी असावे. कबुतरे किंवा

कावळे मारून त्यांना झाडांवर उलटे टांगून ठेवण्याचा विधी आजमितीसही करणारे भक्त तेथे नित्य येऊन जात असावेत!

धवलगिरी अंतर्धान पावला होता. लगतचे आकाश मात्र निरभ्र असल्यामुळे बाकीची पर्वतराजी लखलखीत प्रकाशाने रूखीसुखी वाटू लागली होती. ऊन प्रखर होण्यापूर्वी परतावे हे बरे. हे मनात येण्याच्या क्षणीच पोटाचे, आणि पोटापेक्षाही जिभेचे, चोचले सुचू लागतात. निसर्गसौंदर्याचे कौतुक करणारांच्या मुखी 'अहा'च्या ऐवजी 'चहा' असा उद्‌गार निघू लागतो. चहा प्रेमिकांचा हा उद्‌गार काढतात इतका उत्तेजक असतो की अपेक्षेची तरतरी त्यांच्या मुद्रेवर चक्क दिसू लागते. आणि इथे तर काय! पैलतीरावर चक्क एक चहाभांडार! 'साहजिकच मन पाखरू पाखरू' एका क्षणात टिपण साधून आभाळातून भुईवर उतरले!

सरोवराच्या पैलथडीवर आणि उपाहारगृहाच्या मागील बाजूस डोंगराची चढण आहे. झाडीमध्ये छोट्या निवासस्थानांचे ठिपके दिसत होते, पण वस्तीकरांचे चलनवलन अजून सुरू झालेले नसावे. एक जर्मन तरुण शेजारच्या टेबलावर येऊन बसला. त्याचा सहा आठवड्यांचा मुक्काम संपलेला होता. पण त्याचे पोखऱ्यावर प्रेम जडलेले होते, म्हणून मुक्काम हलायला अजून वेळ होता. राजकारण, अर्थशास्त्र असल्या विषयांत त्याला रस होता. अनोळखी मुलखात मनमुक्त संचार करण्याएवढा तो साहसी होता. पण त्याच्या प्रवासाचा हेतू मात्र वेगळाच होता आणि तो त्याने अगदी थोडक्यात सांगितला– पैसे कमावणे! प्रवास करून पैसे कसे कमावता येतात? या प्रश्नाचे त्याचे उत्तरही तसे गूढ नव्हते. इकडे न मिळणाऱ्या वस्तू तिकडून आणायच्या आणि भरमसाट भावाने विकायच्या. मग परत जाताना इकडच्या दहा-वीस अफलातून चिजा घेऊन जायचे आणि तिकडे गिऱ्हाइके गटवायची. अशा दुहेरी किफायतशीर मार्गाने तो विद्यार्जनाबरोबर अर्थार्जनही भरपूर करत होता. त्याच्या रूपाने आजच्या भौतिकवादी, निःसंकोच, अर्थाश्रयी संस्कृतीचा एक प्रातिनिधिक नमुनाच आमच्या जवळ बसला होता. 'जर्मनीचे एकीकरण झाले या घटनेमुळे जगात अनेकांना जर्मन लष्करशाहीच्या पुनरुत्थानाचे भय वाटते आहे,' हे आम्ही त्याच्या निदर्शनाला

आणल्यावर तो म्हणाला, 'आजच्या जगात लष्करी सामर्थ्याला काही अर्थ नाही. अर्थ आहे फक्त आर्थिक सामर्थ्याला– 'Money power is the only power today!'

होड्या परत ऐलथडीकडे वळल्या. या जर्मन तरुणासारखे आपल्या देशातले तरुण अनोळखी मुलखात जाऊन अनोखी साहसे करण्याइतके धिटावतील का? अशी ताकद येण्यासाठी आपल्या तरुणांना अजून किती वर्षे लागतील? असे आपणच आपल्याला प्रश्न विचारावे आणि आपणच निरुत्तर व्हावे, असा चाळा मनात बराच वेळ चालू शकतो.

परतीची वाट नेहमीच कंटाळवाणी असते. 'गवसलेले श्रेय हरपले' असे तर आपल्याला होत नसेल ना! का नव्या नवलाची अपूर्वाई संपलेली असते? गंमत अशी की खाटमांडूकडे परत जाताना मात्र नित्याप्रमाणे असे कंटाळवाणेपण आले नाही. त्याच नद्या आणि तेच डोंगरकडे, पण पाहण्याचा कोन बदलल्यामुळे सारे वेगळे दिसू लागले होते. आणखी एक चमत्कार घडला होता. खड्ड्याखळग्यांच्या रस्त्याचा दिवस-दीड दिवसातच जवळजवळ कायाकल्प झाला होता! डांबरवजा कसले तरी द्रावण मिसळलेली खडी अवजड यंत्राच्या साहाय्याने रस्त्यावर पसरून टाकायची आणि झपाट्याने रूळ फिरवून रस्त्याचा पृष्ठभाग साफ सुरळीत करायचा, ही प्रक्रिया जबरदस्त वेगाने सुरू होती. २४ तासांत झालेली सुधारणा थक्क करणारीच होती. संपूर्ण रस्ता मऊसूत होण्याएवढा चमत्कार घडला नसला, तरी डागडुजी फार मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहे हे नजरेला आणि शरीरालाही जाणवत होते. मात्र या रस्त्यावर आम्हांला अस्वस्थ करणारे एक दर्शन होते चिनी इंजिनिअरांचे. प्रत्येक किलोमीटरवर विशिष्ट प्रकारची हॅट घातलेला एक एक चिनी इंजिनिअर दिसत होता.

अकस्मात आठवले, गेली कित्येक वर्षे नेपाळ सरकार भारतावर एक चमत्कारिक दबाव आणत असते. 'अमूक मार्ग बांधायचा आहे, तमूक धरण पुरे करून तेथे विद्युज्जनित्रांची यंत्रणा बसवायची आहे, यासाठी भारताने मोठ्या प्रमाणात आर्थिक साहाय्य दिले गेले पाहिजे. भारत देणार नसल्यास चीन ते द्यायला तयार आहे,' अशा गर्भित धमकीचे पिस्तुल आपल्या छातीवर रोखून धरण्याचा नेपाळचा परिपाठ

आहे. याच पद्धतीने तर चिन्यांना हा रस्ता करायचे काम दिले नसेल ना? खाटमांडूला एका नेपाळी तरुणाने सांगितले की, या रस्त्याच्या कामासाठी सगळ्या जगातून टेंडर्स मागविली होती. त्यांतून चिनी इंजिनिअरांच्या एका संघटनेचे टेंडर स्वीकारण्यात आले आहे, एवढेच. तुम्हांला रस्त्यात चिनी इंजिनिअर दिसतात त्यामागचे रहस्य इतकेच आहे. काय असेल ते असो, माझा त्यावर अजूनही विश्वास बसत नाही. हे चिनी फार हिकमती आणि कपटी वाटतात. साम्यवादी चीनमध्ये इंजिनिअरांची खाजगी कंपनी थोडीच असेल? म्हणजे कंपनी असली तर ती सरकारीच असली पाहिजे. दुनियेतल्या इतर कंत्राटदारांपेक्षा कमी दराने कंत्राट घेणे हे चिनी सरकारला सहज शक्य आहे. सस्त्या दरात रस्त्याचे काम मिळविणे, एवढीच व्यापारी दृष्टी चिनी सरकारची असू शकेल काय? नफ्यातोट्याचा विचार न करता, आणि मुख्यतः भारताला शह देण्यासाठी रस्त्यांची कंत्राटे घेणे, त्या मिषाने आपले इंजिनिअर्स आणि टेहळे नेपाळमध्ये पाठवणे, सर्व मार्गांची, पुलांची दरोबस्त माहिती मिळवणे हे उद्देश अंतःस्थपणे समोर ठेवून चीन आपली माणसे नेपाळमध्ये पेरीत नसेल कशावरून? पण यात नेपाळचाही घात नाही का? भारताला खिजवण्यासाठी, चूड दाखवून चिनी वाघ घरात घेणे– यातला धोका नेपाळला समजत नसेल का? तिबेट चीनने गिळंकृत केल्यानंतर खंपा आणि मोंपा जनजातींचे निर्वासित हजारोंच्या संख्येने लदाखमध्ये आले. त्यांना आपल्या सरकारने अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या सुविधा विनामूल्य दिल्या, तेव्हाही शंकेची पाल मनात चुकचुकत होतीच– यांतले खरे खंपा–मोंपा कोण आणि चिन्यांचे हेर कोण? या मोंगोलियन ठेवणीच्या चेहऱ्यांकडे पाहून त्यांच्यातले प्रांतभेद, प्रदेशभेद ओळखण्याची क्षमता आपल्यात आहे काय? आपले हेर पाठवायचे आणि त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय भारतावर सोपवायची, असा तर चीनचा डाव नाही ना? 'मन शंकी ते वैरी न शंकी' असे म्हणून या शंकांचा निचरा होणार नाही. चिनी धूर्त आहेत, कावेबाज आहेत, क्रूर आहेत. प्राणांवर उदार होण्याइतके स्वदेशभक्त आहेत, हे आपल्याला कुणी नव्याने सांगण्याची गरज नाही. बेटे आहेत मात्र हुन्नरी, चलाख. कामात तरबेज, काम करवून घेण्यात करोल आणि कर्तबगार. रस्ते तयार करायचे काम ते

फटाफट करतील, पूर्ण चपळाईने संपवतील, यात शंका नाही. पण परत जाताना केवळ द्रव्यहरण करून जाणार नाहीत. नेपाळचे सत्त्वहरण आणि भारताचे वस्त्रहरण करून जातील हे खास!

खाटमांडूला परतल्यावर समजले की आमच्या दृष्टीने नेपाळयात्रेचा जो सर्वांत महत्त्वाचा भाग आहे त्याला आम्ही मुकणार आहोत– एव्हरेस्टसकट अनेक हिमशिखरांचे दर्शन घडवणारी एक तासाभराची हवाई फेरी, रॉयल नेपाळ एअरलाइन्समार्फत करता येते. वास्तविक आमचे आगाऊ आरक्षण– आणि तेही पक्के– झालेले होते. पण ऐन वेळी अमेरिकन पर्यटकांची एक झुंड आली आणि नेपाळी हवाई कंपनीने त्यांची सोय करण्यासाठी आमचे विमान उड्डाण रद्द केले. खैर, आम्ही दुसऱ्या दिवशी गेलो असतो. पण त्याचीही पक्की ग्वाही द्यायला कोणी तयार नव्हते. भारतीय रुपयाचे नेपाळमध्ये तसे अवमूल्यन झालेले नाही. पण म्हणून काय झाले? रुपयांपेक्षा डॉलर्स मिळवणे केव्हाही अधिक महत्त्वाचे! डॉलर्सच्या लोभाने म्हणा की गौरवर्णीयांना झुकते माप देण्याच्या पराभूत परिपाठाला अनुसरून म्हणा, गोऱ्या मुशाफिरांना भारतीय मुशाफिरांपेक्षा नेहमीच अधिक अगत्याने वागवण्यात येते ही गोष्ट खरीच.

हे दुःख एवढ्यावरच संपत नाही. नेपाळी लोक आजकाल भारतीयांशी फार दुःस्वासाने वागतात, अशीच तेथे आपली भावना होते. रस्त्यावरती भंगार कलावस्तू विकणारे असोत, मोठमोठी दुकाने किंवा उपाहारगृहे असोत, टॅक्सीवाले असोत, विमानतळावरचे वा कस्टममधले अधिकारी असोत, भारतीयांविषयी नेपाळ्यांना फारसे प्रेम नाही, फारसा आदर नाही. उलट नुकत्याच भारताने केलेल्या आर्थिक नाकेबंदीमुळे भारताबद्दल आकसच आहे असे वाटते.

ही स्थिती चिरकाल राहील असे नाही. नेपाळमध्ये फटफटले आहे. लोकशाहीचा सूर्य नुकता नुकता उगवला आहे. अनिर्बंध राजेशाहीच्या विरोधात सामान्य जनता उभी राहिलेली आहे. लवकरच लोकशाहीच्या प्रसादचिन्हांना भरपूर फळे प्राप्त होतीलही. भारताच्या दोन्ही बगलांना लष्करशाही किंवा बेबंदशाही यांचे राहू केतू ठाण मांडून आहेत. अशा

परिस्थितीत लोकशाहीच्या आधारे निर्भर वाटचाल करू पाहणारा बहादूर गुरख्यांचा देश आपल्या उत्तर सीमेवर असेल तर ते आपल्याला श्रेयस्कर आहे. उत्तरेला भारत आणि चीन यांच्या सीमांच्या मध्ये नेपाळची पाचर असणे आवश्यक आहे आणि ही पाचर थंड, निर्जीव लाकडाची असण्यापेक्षा जित्या रक्ताच्या तरुणांनी प्रतिष्ठापिलेल्या लोकशाही नेपाळची असणे हेच भारताच्या हिताचे आहे. सामर्थ्य आहे पण मुजोरी नाही, मैत्रीचा हात पुढे केलेला आहे पण पडखाऊपणा नाही, दोन देशांत लहानमोठेपणा भेद आहे पण उच्चनीच भाव नाही... असे राजकीय नाते भारत आणि नेपाळ यांच्यात प्रस्थापित झाले तर नेपाळची यात्रा करण्यातले आपले सुख शतगुणित होईल.

दिल्लीला परतताना विमानात मजेत पेंगता पेंगता अशा उज्ज्वल भविष्याचे स्वप्न मिटल्या डोळ्यांपुढे तरळावे यात आश्चर्य ते कसले?

०००



८.

# लामांचा वाडा चिरेबंदी

माणूस लष्करात नसला तर लदाखला जाईल कशाला! नाही म्हटले तरी भारतीय माणूस प्रवास पुष्कळ करतो– यात्रेला जातो, लग्नामुंजीला जातो, कधी नोकरी शोधायला, कधी ती टाळायला जातो. माणसाची बदली होते, त्याला फिरतीवर जावे लागते. कधीकधी तो चक्क सुट्टी घेतो आणि प्रवासाला निघतो. निसर्गरम्य म्हणून नावाजलेल्या ठिकाणी गर्दी करतो. कधी तर सूक्ष्म अवलोकन का काय, तेही करू पाहतो. अंगात जास्त रग असली तर हिमालयीन पहाडांवर चढतो. बद्रीकेदार आणि अमरनाथच काय, पण मानस आणि कैलासही जवळ करतो. काही चक्रम माणसे तर संस्कृती-विंस्कृती पाहायला मणिपूरला गेल्याचीही नोंद आहे. पण लदाख? लदाखला कोण जाणार! तिथे ना मंदिर ना घाट. ना मशीद ना कबर. बागबगीचे, कारंजी असला मोगली थाट नाही. भग्न तटबुरुजांमध्ये चिणलेला इतिहास नाही. न चेरी-सफरचंदे, न जांभळे-करवंदे. गुलाब आणि कमळे तर सोडाच, पण घाणेरी-कण्हेरीही नाहीत. लाल माती, हिरवी राने, आडवाटा हेही नाही आणि हॉटेले, कॉफीगृहे, क्रीडामंदिरे पण नाहीत. तंबूतलादेखील सिनेमा नाही. सबकुछ खल्लास! अति दूर उत्तरेला, ईशान्य काश्मिरात, सात पहाडांपलीकडे सात पहाडांअलीकडे पसरला आहे लदाख. रूक्षरूक्ष, रौद्र, भव्य, भयाण निर्जन पण अगदी मुलखावेगळा लामांचा वाडा–लदाख.

लदाख हा लहरी निसर्गाचा एक चमत्कार आहे. हिमालयाच्या अगदी कुशीत एक प्रचंड वाळवंट असावे, हा चमत्कारच नव्हे तर काय? आणि वाळवंटही कुठे? तर प्रत्यक्ष सिंधू नदीच्या दोन्ही तीरांवर. तरीच वाळवंटात बालपण घालवलेली सिंधू थरपार्करच्या वाळवंटातच विसावली! तिची सगळी धाव आहे वाळूपासून वाळूकडे. श्रीनगरहून सोनमर्गला

जाऊन पुढे पावणेदोनशे मैल मोटरचे चाक पिरगळत पिरगळत झोजिलासारख्या प्रचंड खिंडीतून घरंगळत घरंगळत 'लेह'ला यावे. साडेअकरा हजार फुटांवर वसलेल्या या लदाखी राजधानीला एका रेताड मैदानाने वेढा घातलेला दिसेल. पाच हजार फुटांपेक्षा जरा कमीच उंचीच्या डोंगरावर जिवाचे महाबळेश्वर करणाऱ्या आणि तिथे लोकरी कपडे घालून कुडकुडणाऱ्या मराठमोळ्या माणसाला साडेअकरा हजार फूट उंची पुष्कळ झाली की! म्हणजे या एवढ्या उंचीवर दातखीळ बसायला हरकत नसावी! पण कसले काय नि कसले काय! दिवस उन्हाळी असले तर लेहला अंगात कपडा ठेववणार नाही. घाम नाही यायचा, नुसती तलखी. शुद्ध काहिली. श्वास कोंडल्यासारखे वाटेल. विरळ झालेल्या वातावरणातून सूर्यकिरण सरळ 'लेह'ला झोंबतात, म्हणून ही दमछाक. श्रीनगरहून विमानाने 'लेह'ला यायचे, म्हणजे थ्री सिस्टर्ससारख्या त्रिशूळी शिखरांना चुकवले पाहिजे. खूप उंचावरून येणाऱ्या विमानातून प्राणवायूची नळी गुडगुडीदाखल घेऊन, लेहच्या अस्मानात येताना एका चिंचोळ्या पहाडी खिंडीतून, जीव मुठीत धरून कसेबसे लेहच्या विमानतळावर उतरायचे. उतरल्यावर प्रवासी चालू लागला की आपण इतके थकलो कसे याचे आश्चर्य त्याला वाटू लागते. ते असते लदाखचे आव्हान. भल्याभल्यांची सत्त्वपरीक्षा घेणारे. न थकता लदाखमध्ये प्रवास करायचा तर निदान महिनाभर लदाखी हवेचा सराव करायला हवा.

लदाखी हवेचा सराव? म्हणजे कमी प्राणवायूवर जगण्याचा सराव. ही हवा कसली? उन्हात कासावीस करणारी आणि थंडीत चराचर गोठवून, थिजवून पाषाणप्राय करणारी हवा. या हवेला निराळे विशेषनामच हवे. 'लदाखी' म्हणावे हवे तर. लदाखीचा तडाखा कळायला प्रत्यक्ष प्रमाणच पाहिजे. तिथे भूगोलाबिगोलाचे काम नाही. मी-मी म्हणणाऱ्यांना येथे धाप लागून भुईसपाट व्हावे लागते. 'लेह'च्या परिसरात साधारणतः पुण्याच्या चतुरशिंगीइतपत उंच एक टेकडुली आहे. तिच्यावर भिक्षू कुशक बकुल (काश्मीर सरकारमधील एक भूतपूर्व मंत्री) यांचा मठ आहे. किल्ले रायगड, सिंहगड आणि पुरंदर चढून गेल्यावर कृतकृत्य वाटणारा आपल्या मुलुखातला माणूस एवढीशी टेकडी चढून या मठात पोचला की 'मठाचिये द्वारी, निजे तासभरी' अशी त्याची स्थिती

होते. दम्याची शेवटची अवस्था क्रम चुकवून प्रथमच आल्यासारखे वाटते! प्राणवायूची महागाई, दुसरे काय! चालवत नाही, चढवत नाही, ओझे उचलवत नाही, श्रमाचे काम करवत नाही! आधीच दुबळा असलेला देह कसा निकामी-निकामी वाटू लागतो. रात्रीच्या वेळी गाढ झोप लागावी तो अचानक डोक्यात सणक उठते. डोकेदुखी असह्य होते. मग ध्यानात येते, कंदील मालवला पाहिजे, गॅसबत्ती विझवली पाहिजे. ही मंडळीच प्राणवायू बकावका खातात ना? मग का नाही आपले डोके दुखणार?

तस्मात् सराव हवा, मग सगळे साधते! लदाखी माणसे– म्हणजे बापे नव्हेत केवळ, मुलेमाणसेदेखील– मैलोन्मैल रस्ते तुडवतातच की. डोंगरपहाड चढतात, उतरतात; पुन्हा चढतात, ओझी नेतात. इतके कशाला, आपले फौजी जवान डोक्यावर बोजा घेऊन खांद्यावर तुळवटे वाहात तासाभरात हजार-बाराशे फुटांचा पहाड अगदी सहज पालथा घालतात! वीस मिनिटांच्या आत आसपासच्या सर्व भुयारी ठाण्यांवर (बंकर्सवर) शिदोरी पोचवून तळावर परत येतात. मोठमोठ्या सेनाधिकाऱ्यांनासुद्धा पर्वतांची माथी धुंडाळण्याचा उपक्रम करावाच लागतो. लदाखमधील चुमातांग ठाण्याच्या आसपास सोळा ते एकोणीस हजार फुटी पर्वत आहेत. काही पर्वतांच्या माथ्यावर ऐसपैस सपाट जागा आहेत. त्यांत काहींवर हिरवी चराईची राने आहेत आणि काहींवर सरोवरे.

त्यांची माहिती सांगणाऱ्या एका शीख ब्रिगेडिअरला जेव्हा 'तुम्ही तिकडे गेला आहात का?' असे मी विचारले तेव्हा आपल्या गुबऱ्या श्मश्रुल गालांत हसत तो म्हणाला, 'अनेक वेळा. तो माझा धंदाच आहे. त्याबद्दल तर मला तनखा मिळतो!'

इतक्या उंचीवर सरोवरे! त्यांतही काही खाऱ्या पाण्याची आहेत. हिमालय हा केवलपर्वत आहे ना? आताशी कुठे समुद्रातून उगवला आहे! आणि ती कुरणे कुठून आली तिथे? सगळाच चमत्कार! एरवी लदाखी भूमी म्हणजे वैराण. विराट् विराट वैराण. कोरडे ठणठणीत. वाळू, मुरमाड, भुसभुस कोसळणारी माती, प्रचंड ओकेबाके डोंगर, रसवर्ज्य रस्ते. नदीच्या काठावरही काही उगवत नाही. नदीचे पाखे आणि रस्त्याचे पाखे-दोन्ही सारखेच. कुठेही हिरवा ठसा नाही, झाडाचा ठिपका

नाही. हिमालयाच्या हृदयामध्ये ही अशी कोरडी करुणा! आणि एकोणीस हजार फुटांवर हिरवळीचे पठार!

देवाला काहीही वाहा, पण भक्तीने वाहा, 'पत्रं पुष्पं फलं तोयम्' काहीही चालेल असे सांगणाऱ्या कृष्णाने (की व्यासाने?) लदाखचे दर्शन नक्कीच घेतलेले नसेल. पत्र, पुष्प आणि फल तर सोडाच पण गवताची एक काडीदेखील मुष्किलीने मिळेल इथे. हिमालयाची मुलगी 'अपर्णा' ती हीच! पाचपंचवीस कोस रस्ता तुडवावा तेव्हा क्वचित कुठे झाड दिसले तर दिसेल. लेहजवळ थोडासा झाडोरा आहे. सरकारी प्रयत्नांमुळे थोडी शेती आणि झाडी सौभाग्यालंकारासारखी जपलेली आहे. लेहपासून वीसपंचवीस मैलांवर सिंधू ओलांडल्यास हिमिस मठाभोवती थोडी हिरवी सोयरी आहेत. किंवा लष्कराच्या 'बीकन' विभागाने केलेल्या रस्त्यावरून सरळ साठएक मैल पूर्वेला गेल्यावर जो 'पहिला पूल' लागतो त्याच्या अलीकडच्या वाकणावर दहावीस उंच झाडे आहेत. एरवी झाड नाही, झुडूप नाही, लव्हाळे आणि गवतरान नाही, काऽऽही नाही.

असल्या वांझोट्या भूमीला सौंदर्य ते कुठून प्राप्त होणार, असे मात्र म्हणू नये. लदाखची सृष्टी हिरवी नसूनही रंगदार आहे. हा एक अनवट राग आहे. इतका की इथे षड्ज वर्ज्य आहे! वृक्षांशिवाय सृष्टिसौंदर्य म्हणजे षड्जाशिवाय स्वरमाला, नाही तर काय! पण कबूल केले पाहिजे की हा निसर्ग वक्र आहे, वाम आहे, वेडापिसा आहे, विराट आहे, पण अचाट सुंदर आहे. प्रचंड डोंगर, प्रचंड चढणी, चढणीवरून धरणीपावेतो लोळत आलेले रेतीचे, मुरमाचे पट्टे-भगवे, पिवळे, उदी, तांबूस, जांभळे, करडे, राजवर्खी. कधी बर्फाइतकेच जडशीळ. असल्या रेताडातून वाहणारी सिंधू. अंगी न भरलेली, बागडायलाही न शिकलेली. एक चिंचोळ्या अंगाची सामान्य वाटणारी नदी. हिमिस मठाकडे जाताना सिंधू ओलांडण्यासाठी पूल कसा असावा? चक्क कळकाचा छोटासा साकव आहे तिथे. कोकणातली नदी याहून मोठी असते खास! लांबी मात्र पुसू नका. गोबीचे वाळवंट डावीकडे टाकून, लदाखला आडवा छेद देऊन, उत्तर काश्मिरातून पंजावमधून सिंधकडे जाणारी ही उपखंडातली दीर्घतमा. हिच्या काठाकाठाने आता 'बीकन'ने रस्ता केला आहे. शाबास आहे 'बीकन'ची!

कधी सुरुंग लावावा तर पर्वताचे भुसकट उडते आणि केला रस्ता झाकून टाकते. कधी कितीही दारू ठासा, कडा जाम फुटत नाही! असल्या भूमीवर उन्हा-थंडीत रावून, अन्नपाण्याचे हाल सोसून जवानांनी रस्ता तयार केला. लष्कराच्या जीपगाड्या आणि तीन टनी 'शक्तिमान' ट्रक्स जाण्याजोगा भक्कम आहे हा रस्ता. कारगिल-लेह आणि लेह-चुशूल जोडणारा. वळणावाकणांनीच त्याचा एकसुरीपणा कमी केला आहे म्हणून बरे, नाही तर उजाडउजाड वैराणातून, ओसाडओसाड क्षितिज दाखवणारा हा रस्ता जीवघेणा वाटला असता.

अर्थात हा रस्ता केवळ उन्हाळी. थंडी पडली की सर्वांत सुंदर रस्ता म्हणजे सिंधू नदी! बर्फाची लांब-अरुंद लादीच जशी. खुशाल वाटेल तेवढा अवजड ट्रक न्या, माणसे न्या, लादीला ढिमदेखील व्हायचे नाही! एक मात्र भानगड आहे. जिथे जिथे गरम पाण्याचे झरे असतील तिथेतिथे सिंधूपासून सावधान! गरम पाण्याचे झरे म्हणजे आणखी एक चमत्कारच. वज्रेश्वरीचे गरम झरे मुंबईकरांच्या परिचयाचे असतात, पण तिथे तो एक किरकोळ चमत्कार वाटतो. कांग्रा खोऱ्यात, कुलू खोऱ्यात गरम पाण्याचे झरे आहेत तेही एकवेळ समजण्यासारखे आहे. पण जिथे नदीच्या नदी गोठून जाते तिथे तिला पोटाखालून पोखरणारे गरम झरे म्हणजे भलतेच अनाठायी वाटतात. अशा ठिकाणी बर्फाची लादी फार धोकेबाज– गपकन् गिळणाऱ्या राक्षसीसारखी!

लदाखची थंडी कल्पनातीत क्रूर असते. त्यातल्या त्यात लेह गरम ना? तिथे पारा शून्याखाली पंचविसावर जातो. मध्य लदाखमध्ये म्हणजे चुमातांगजवळ शून्याखाली चाळिसावर स्थिरावतो तर पूर्व सरहद्दीजवळ म्हणजे दौलतबेग-ओल्दीपासून चुशूल- डेमचौकपर्यंत शून्याखाली साठापर्यंत जातो, असे म्हणतात! यात चूकभूल असेलही, पण थंडी मोजायची इतर मापने आहेतच की. या मापनांप्रमाणे सांगायचे म्हणजे, डिझेलसारखे जळणही थिजते! ट्रकचे इंजिन एकवार सुरू केले की तीनतीन दिवस चालूच ठेवावे लागते. बंबाप्रमाणे गोलाकार असलेल्या तुर्की शेगडीभोवती शेक घेत जवान बसतात तेव्हा शरीराची एक बाजू शेकताशेकता दुसरी बाजू गोठून बधिर होऊन जाते. संत्री, मोसंबी, लिंबे उकडून

खाण्यालायक करावी लागतात. तव्यावर टाकण्यापूर्वी अंडेदेखील गरम पाण्यात टाकायचे असते!

लदाखमध्ये राजकीय व्यासपीठ नाही हेच बरे आहे; नाही तर वक्त्यांचे मुडदे पडले असते. कारण टोमॅटोचे लाललाल दगड होतात निव्वळ! बर्फ फोडून, वितळवून, पाणी तयार करावे लागते. थंडीबद्दल ताणता येईल तेवढी कल्पना ताणली तरी त्याच्या पलीकडची थंडी असते लदाखमध्ये आणि अशा थंडीत शाश्वत हिमरेषा (परपेच्युअल स्नोलाईन) सांभाळीत भारताचे शूर जवान पाय रोवून उभे आहेत. इंचइंच भूमी लढवण्याची गाणी रचणे आणि ती म्हणणे तसे सोपे आहे; पण तृणशून्य भूमीमधल्या त्या महाभयंकर हिवाळ्याच्या कैदेत राहून मातृभूमीचे रक्षण करणे ही महाकठीण कामगिरी आहे. महार रेजिमेंटमधल्या एका वीरचक्रधराने मला सांगितले की 'मुतलो तर धार जिमनीजवळ जाईस्तो गोठती!' मला त्याच्या विधानात अश्लील, बीभत्स तर काही वाटले नाहीच, उलट थंडीचे प्रत्ययकारी चित्र त्याने काढल्यासारखे वाटले. डोंगरकपारीतल्या भुयारात तुम्ही कसे काय रे राहता हिवाळ्यात, असा प्रश्न विचारल्यावर आणखी एक शिपाईगडी म्हणाला, 'तिघेजण एकाच कांभरुणात घुसतो. काय म्हना साहेब, मानसाची ऊब ती खरी ऊब!' हो, तेही खरेच म्हणा!

एवढ्या थंडीत गरम झरे तेवढे तसेच उसळतात. कोमटदेखील होत नाहीत! स्नान करायला जागा अशी तेवढीच. आपल्या शिपाईगड्यांना आंघोळीशिवाय करमत नाही. मला आठवते, गंगटोकच्या मार्गावर एक धबधबा होता. हवा सर्दच होती. दोघे जवान लंगोट लावून पाणधारेत उभे होते. दोघे उघडेवाघडे बाजूला बसले होते. मी अंदाजाने विचारले, 'काय, सातारा जिल्हा का?'

आंघोळ करणारे हसले. 'व्हय जी' म्हणून पुढे आहे. गरम झऱ्याजवळ तात्पुरती स्नानगृहे केली आहेत अशाच जवानांसाठी. खुद्द लदाखी माणसे तिकडे फिरकतही नाहीत. आणि कशाला फिरकतील! 'लदाखींची आंघोळ आयुष्यात तीनदा. एकदा जन्मल्यावर, एकदा लग्नात (हेही भाग्यच!) आणि एकदा मेल्यावर!' नाही तरी लदाखमध्ये घाम येत नाहीच, मग कोण करतो उगीच भुडुश्शो!

हजार चौरस मैलांच्या या विराट वैराणात अठ्ठ्याऐंशी हजार लोकवस्ती आहे. म्हणजे एका चौरस मैलाला अठ्ठ्याऐंशी हे प्रमाण पडले! (केरळ, बंगाल, उत्तर प्रदेश इथे दाटीवाटीने राहणाऱ्या माझ्या बांधवांनो, तुम्ही वाईच इकडे का बरे सरकत नाही?) या अठ्ठ्याऐंशी हजारांत हजारभर किरिस्तांव, सातएक हजार मुसलमान आणि उरलेले सर्व बौद्ध आहेत. 'ॐ मणिपद्मने' हा जप करीत हे बौद्ध चारआठ जणांचे टोळके करून हिंडतात. 'भरपूर कपडे' हा त्यांचा षौक आहे. कपड्यांची कळा आणि काळा रंग पाहिल्यावर एकदा अंगावर चढलेले कपडे फाटून जाईस्तोवर न उतरवण्याचे यांचे व्रत सहजच लक्षात येते. मणिपद्म बुद्धाच्या नावे लहानमोठे दगड जवळ वाळगण्याची आणि पवित्र स्थळी या दगडांचा तट बांधण्याची लदाखींना फार हौस आहे. बहुधा या दगडांवर काही कलाकुसरही केलेली असते आणि मंत्रही कोरलेला असतो.

याक हे जनावर म्हणजे साक्षात् कुरूपतेचा आणि घाणीचा गड्डा. पण याक म्हणजे जणू नारळाचे झाडच. मांस खायचे याकचे, दूध प्यायचे याकचे, कातडे पांघरायचे याकचे, ओझे वाहणार याक आणि माणसाला पाठीवरून नेणाराही याकच. याक एके याक! वाशाळ्या लोण्यामध्ये दमट कुबट पीठ कालवल्यासारखा आपल्याला जो वास येतो तो याकचा की त्याच्या धन्याचा कोण जाणे! दुसरे जनावर आयवेक्स. हे अर्थात् डोंगरपठारावर क्वचितच आढळणारे, पण खायला फर्मास– म्हणतात! हे जंगली बोकड म्हणजे लदाखींची मेजवानी. एरवी ते काय खातात भगवान् गौतम जाणे! लदाखींच्या मेळाव्यात मध्येच एखादा गोरापान पुरुष आणि त्यातल्या त्यात सरळ नाकाची मीनाक्षी दिसली तर ओळखावे– हे लदाखी श्रीमंत, जवळजवळ राजवंशी आहेत. त्यांना नक्षीची टोपी, कुसरदार जाकीट असा पेहेराव आणि क्वचित बसण्यासाठी तिबेटी घोडेही असते. चुशूलच्या रस्त्यावर मध्ये निओमा, मूद, डुंगटी वगैरे ठाणी आहेत. त्यांच्या आसमंतात एक लांबचलांब हिरवळ आहे. तिथे रानटी तिबेटी घोडे आणि सुंदरसुंदर पक्षी दिसतात म्हणे– पण ते भाग्यवानाला!

बहुपतिकत्व ही लदाखींची एक खास रीत आहे. साधारणपणे चार भावांत एक बायको असते. ('पांडव' पदवी थोडक्यात चुकली!) पाचवा भाऊ असेल तर त्याला मात्र घरजावई (मॅग् पा) व्हावे लागते किंवा

मठात जोगवा घ्यावा लागतो. काही लदाखिणीही भिक्षुणी होतात. 'स्टाक्से 'सारखे जुने, जवळजवळ परित्यक्त मठ असोत की 'हिमिस 'सारखे गजबजलेले... होतकरू लामा नि लामणी तेथे घोंघावतात. लदाखच्या रेती-मुरुमाच्या भूपृष्ठावर त्यांचे लाल पेहेराव नि पिवळ्या-तांबड्या पताका उठून दिसतात. त्यांच्या हातात धर्मचक्रे आणि मुखी (बहुधा) धर्मवचने असतात. पण त्यांना हवे असते ते निर्वाण नव्हे. त्यांना हवे असते अन्न. उष्टेमाष्टे, कसलेही. त्यांना हवी असते दारू. 'चांग' नावाची स्थानिक भट्टीची. भाताची दारू नव्हे, तर लष्करी अधिकाऱ्यांनी टाकून दिलेल्या बाटल्यांतली रम, व्हिस्की, बीअर. त्यांना हवी असतात चिरूट-सिगरेटींची थोटके. दारिद्याने लाचार झालेले लदाखी कधी पत्रावळीवर तुटून पडणाऱ्या कुत्र्यांप्रमाणे या वस्तुजातावर तुटून पडतात तेव्हा आपल्याच पोटात खड्डा पडतो. हेही भारतीयच. माझ्यासारखे. माझेच. कुशक बकुल यांच्या मठात तर बुद्धमूर्तीशेजारी महात्मा गांधींचा एक फोटो होता. त्याच्यापुढेही श्रद्धेने धूपदीप होत होते. हा वेडेपणा असेल, पण एकंदर भारतीय वेडेपणात हा चपखल शोभणारा आहे. हे लदाखी. चौदाचौकड्यांच्या भारताचे हेदेखील रहिवासी! खरे की काय?


काय संबंध आहे यांचा आणि आपला? आहे का काही संबंध? तिब्बतमधून पळून आलेल्या खंपा-मोंपांसारखे हे दिसतात. यांचा धर्म वेगळा, आचारविचार वेगळे. शिवाजीमहाराज आणि टिळक हे राष्ट्रपुरुष होते हे यांना मी कसे सांगू? यांना चंदीगड कधी दिसेल का? श्रीनगर दिसेल का? मग पुणे-मुंबई कुठून दिसणार? हे कधी कन्याकुमारीला जातील का? यांना भाषावार प्रांत मंजूर आहेत की नाही हा प्रश्न विचारणे म्हणजे केवढा गाढवपणा होईल! ब्रिटिश गेले हे यांना माहीत असेल का? की ते आले होते हेच माहीत नसेल! यांचा आणि इतर भारतीयांचा रोटीबेटी व्यवहार व्हायला किती शतके जावी लागतील? आपले जवान तिथे प्राणपणाने (वगैरे) लढताहेत, पण लदाखींच्या लेखी ते कोण आहेत?

आणि आमच्या लेखी लदाखी कोण आहेत? त्यांना लुटायलासुद्धा कोणी भारतीय तिकडे जात नाहीत! लेहला विमानतळ बांधायचा होता.

पण एक हरीचा लाल कंत्राट घेईल तर शपथ! लढवय्ये जवान विमान तळावर सिमेंटची घमेली वाहताहेत. रस्ते करण्यासाठी खडी फोडताहेत. का? कोणीही मजूर आणि मजूर-पुरवठा करणारा कंत्राटदार तिथे जाऊ इच्छित नाही म्हणून. राजस्थान-गुजरात-तमीळनाडू – कुठलाही भांडवलदार तिकडे दुकान घालीत नाही की कारखाना चालवीत नाही. चारसहा चाकरमाने असतात पण तेही नाखुषीने – दिल्लीतल्या सग्या-सोयऱ्यांना आपली बदली करवून घेण्याविषयी सतत ते अजीजीने पत्रे लिहितात– आमच्या बदलीसाठी पाहा ना मिळते का कोणाची चिठ्ठी?

एकदा नेहरू म्हणाले होते– 'नॉट अ ब्लेड ऑफ ग्रास ग्रोज देअर.' तेव्हा आम्हांला कोण संताप आला! पण मुख्य अडचण ब्लेड ऑफ ग्रास नसण्याची नाही, तर इथे आपण कोणी नसण्याची आहे! आपण आहोत ते केवळ लष्करी गरजेपुरते. १९६२ च्या पराभवानंतर आपले लष्कर तिथे चांगलेच रुजले, पसरले आहे. शत्रू पुन्हा हल्ला करील तर त्याला याद राहील असा मार देण्यासाठी लष्कर उत्सुक आहे. प्रत्येक डोंगर, प्रत्येक खिंड आज सज्ज आहे. भयाण थंड एकांतात, एकाकी ठाण्यावर वेड लागण्याची शक्यता निर्माण होण्याइतके एकलकोंडेपण असताना, लदाखी पर्वतशिखरांवरचे भारतीय जवान पूर्वेकडे डोळे आणि बागनेट रोखून उभे आहेत. आज लदाखमध्ये त्यालाच– फक्त त्यालाच जागा आहे. पण जेव्हा हा ताण कमी होईल, वारे मोकळेपणाने वाहतील, दिशा स्वच्छ होतील, ॐ मणिपद्मनेचा जप मोकळा होईल, हिमिसचा हरवलेला लामा तिब्वतमधून परत येईल तेव्हा तरी आपण जाऊ का तिकडे? म्हणतात की ख्रिस्त आठ वर्षे लदाखच्या हिमिस मठात येऊन राहिला होता. पण आपण जाऊ का तिकडे? अतिदूर उत्तरेला, सात पहाडांपलीकडे आणि सात पहाडांअलीकडे असलेल्या लामांच्या चिरेबंदी वाड्यात?

ooo





१.

# भव्य दिव्य भुलभुलैया

हिमालय नावाचा पर्वत खरोखरीच अस्तित्वात आहे का? मी तर म्हणतो की हिमालय ही केवळ एक कल्पना आहे, वस्तू नाही. वस्तूला निश्चित आकार असतो, प्रमाण असते, रंगरूप असते. पण या स्वारीचा अजबच प्रकार! आजचे स्वरूप उद्या राहीलच असा भरंवसा नाही. क्षणापूर्वीचा रंग वेगळा, आताचा वेगळा. कातळाच्या काळ्या छाताडावर खुलणारी जुनाट वर्फाची चंदनउटी हा पाहता पाहता पुसून टाकतो. काळ्या-पांढऱ्या विचित्र सावल्यांनी जुळवलेले गंगाजमनी चित्र डोळाभर पाहात राहावे तेवढ्यात त्याच्यावर करड्या आभाळाचा हात फिरतो आणि चित्र पार गगनसपाट होते. डोळे ठरत नाहीत असा बर्फ तळपत असतो, तोच त्याच्यावर काजळी धरू लागते. कधीकधी क्षितिजावर आकाशगंगा लोळावी तसा प्रकाशाचा सफेत पट्टा मात्र दिसत असतो तोच त्याच्यापासून कासराभर अंतरावर दुधाने न्हालेली मस्तके उगवतात. त्यांच्या दर्शनाने आपली तंद्री लागते. भानावर येऊन पाहावे तो ही भुताटकी मावळलेली असते. कधी धारदार गिरिशिखरे नुसतीच उखिरविखिर पडलेली असतात. कधी एखाद्या अजस्र मादीच्या अगणित पिलांसारखी झुंडीने आभाळाला लुचत असतात. भस्म फासून आपले वैराग्य जाहीर करणाऱ्या काही शिखरांवर अप्सरा चुळा टाकतात; लगोलग स्वाऱ्या रंगात येतात! कधी द्राक्षांच्या पानासारख्या कातरलेल्या कड्यांवर संध्याकाळचे रंग भुरभुरत राहतात. कधी सर्वांगावर काळा बुरखा घालून फक्त कपाळी अंगारासारखा जळणारा तिसरा डोळा धारण करणारे एक शिखर दिसत राहते. कधी निळ्याजांभळ्या राजवेषावर खुलून दिसणाऱ्या तलवारीच्या नागव्या पात्याप्रमाणे बर्फाची एकच चिंचोळी जडधार लखलखत राहते. मुख्य म्हणजे क्षितिजावर आज

भासमान होणारे अतिभव्य राजवैभव उद्या दिसेलच असे नाही; उद्या त्याच्यावर निळ्याभोर आभाळाचा झुळझुळीत पडदा पडलेला असेल.

असली कसली ही वस्तू! शून्यातल्या परार्धाएवढी! चिरंतन क्षणिकत्वाची साक्ष! क्षणोक्षणी उपजणाऱ्या नवतेमुळे होत्याचे नव्हते करून टाकणारा नगाधिराज! भुताटकीने झपाटलेला देवतात्मा! पूर्व-पश्चिम समुद्र जोडून घेणारा अथांग गूढ उत्तर समुद्र! ह्या समुद्राच्या लाटा कधी कधी पर्वतप्राय होतात, त्यांनाच आपण पर्वत म्हणतो झाले!! त्यांनाच नावे देतो. त्या मोजतो. ही रांग आणि ती रांग असली सापेक्ष गणिते मांडतो. मी हिमालय पाहिला असले अज्ञानमूलक विधान करतो. म्हणजे हिमालय दिसत नाही असे नाही; पण तो फक्त दिव्यचक्षू असले तरच दिसतो. चर्मचक्षूंना चमत्कार दाखवून अंतर्धान पावतो. दिव्यचक्षू असले तर मात्र हिमालय एक सम्राट असल्याचे जाणवते. त्याच्या अंगाखांद्यावर झुलणाऱ्या स्वर्गंगा दिसतात. त्यांच्या तीरांवर हंसयुगुले कलरव करतात. त्याच्या प्रचंड स्फटिकप्रासादाच्या वळचणीला पारंब्यांसारखा आसरा शोधणारी किन्नरांची जोडपी आपल्याला दिसतात. अप्सरांचा प्रचंड आरसा असलेला कैलास एका दालनात चकाकतो. दुसरीकडे पाताळाएवढ्या दरीत घुमणाऱ्या सहस्र वंशध्वनींनी एक सप्त स्वरांचे इंद्रधनुष्य उभवलेले असते. दिव्य दृष्टी असली तरच दिव्य वनस्पती दिसतात. दिव्यशक्ती असली तरच गंधमादन वनांतल्या नीलकमलांचा सुगंध भारून टाकतो, महाश्वेतेचे गायन ऐकू येते. अच्छोद सरोवरातील पाण्याने तृषा भागते. एरवी हिमालय दिसतो आणि दिसत नाही. त्याची नागमोड क्षणार्धात सपाट होते. त्याचा पाषाणदेह पाहता पाहता एका विराट मेघात विरघळून जातो.

अशा वेळी वाटते, हिमालय हा वास्तविक एक प्रचंड चकवा आहे. त्याचा वेध लागला की गिरगिर भोवंड सुरू. माणूस त्याच्या मागे मागे, पुढे पुढे पळतच असतो. उत्तरोत्तर दिसतो की अंतर्धान पावतो. त्याच्यावर जेवढी अधिक श्रद्धा असेल तेवढा तो अधिकच भुलवतो. लांब पळतो आणि वेध लावतो, वेड लावतो. जवळ जाताच आपल्या गिरमिटी शिडीवर माणसाला चकरा मारायला लावून त्याचा दम छाटतो. अशी किती माणसे

त्याच्या दरीगृहांत गेली आणि त्यांच्या शिळा झाल्या. किती एक त्याने पोटी रिचवली. वर धुक्याची धावळी पांघरून वोके संन्यासी ध्यानस्थ वसलेच आहेत. तसूतसू पुढे सरणाऱ्या हिमनद्यांच्या नाड्या थडथड करतात म्हणून कळते की स्वारी जिवंत आहे.

मी मनाचा निर्धार केला होता की याला चर्मचक्षूंनी पाहीनच; दिव्यचक्षूंनी पूर्वीच पाहिले होते. कुमारसंभवाच्या जुन्या पोथीत स्वारी लपून वसली होती. पण मी वस्ताद. मी त्याला तेथे पाहिलेच. मेघदूताच्या सुगंधी श्लोकांचा गजरा घालून मिरवणाऱ्या एका मंदाक्रांतेने मला त्याचे दर्शन घडवले होते. माझ्या मनातील शिवाचे विजेसारखे लख्ख हास्य साठत जाऊन त्यातून निर्माण झालेला कैलास गदगदा हलवण्याचा प्रयत्न वास्तवाच्या दशमुखी रावणाने कितीदा तरी केला होता. पण मी त्याला माझ्या मनाने दडपून टाकले होते. सिद्धगंधर्व, यक्षकिन्नर, सप्तर्षी, शापित युधिष्ठिर.... सर्वांची भेट मी पूर्वीच घेतली होती. आता मला तसले काही नको होते. मला त्याचा वेगळा अवतार पाहायचा होता. जो कालिदासाने पाहिला असेल की नाही, [illegible] कधी [illegible] असेल की नाही अशा शंका मला आजही येतात, तो हिमालय मला पाहायचा होता चर्मचक्षू! हिमालयाचा चर्मदेह त्यांना कधी दिसेल असे मला झाले होते. मग मी निघालो.

झळझळीत निळे विराट आकाश. नितळ निर्मळ सूर्यप्रकाश. भालाईत हिरवे वृक्ष. या वृक्षांहून उंच, भोवतालच्या सर्व जडाहून उंच असा माझा माळा. इथे उभे राहून मी एखाद्या होकायंत्राच्या अग्रासारखा उत्तराभिमुख होतो.... समोर निळ्या अगाधाला खेटून उभा असलेला एक प्रचंड गिरिराज. कल्माषपाद. पाय लोहाचे. छाती ब्रॉंझची. माथे मात्र धगधगीत रुप्याचे. या अतिशुभ्र शुभ्रतेवर नभाची निळाई प्रतिबिंबित झालेली. गूढतेची जांभुळकी छापा याच्या हृदयावर. असा हिमालय मला पाहावासा वाटला म्हणून मी निघालो त्याच्या शोधासाठी उत्तर खंड पालथे घातले. पण हाय! चकव्याने चकवलेच!

चलो वेटा! म्हणून मी माझ्या पंचकल्याणी मनाला टाच दिली तो थेट काश्मिरात पोचलो. हा डाव्या कुशीकडे वळवलेला मोर्चा. पठाणकोठहून

जम्मू, जम्मूहून उधमपूर, उधमपूरहून कूद. कूदच्या उंच पहाडावर मला प्रथम हिमालयाचा वास आला. गेल्या जन्मीच्या परिचयामुळे मी त्याला लगेच ओळखले. थंडथंड शिरशिरी आणणारी हिमालयाची माया. गारठवणारी त्याची ऊब! पाईन आणि देवदारांचे रोमांच उभे करणारा त्याचा हा स्पर्श. अवसेची रात्र होती. तरी मला त्याचा मुकुट दिसला. दिसला का? छे, पुन्हा हा केवळ दिव्यचक्षूंचाच पराक्रम... मग लागली बनिहालची खिंड. स्पंजाच्या तुकड्यांसारखा पंजाभर बर्फ कटिखांद्यावर घेऊन एक डोंगर आजोबा मजेत बसले होते. मी दुर्लक्षच केले. खिंड ओलांडली मात्र– माझ्या स्वप्नात वारंवार भेटणारा तो सम्राट, दूरवर का होईना, दिसला असा भास झाला. शतयोजने बाहू पसरून, सुवर्णभूषणांची तीक्ष्ण अग्रे आभाळाला घाशीत एक नगाधिराज नागासारखे क्षितिजावर पहुडले होते. मनात म्हटले, 'ठीक आहे बच्चमजी पाहून घेईन.' पाहून घेईन म्हणताक्षणी स्वारी गुडूप झाली की!

स्थळ खिलनमर्ग. उंची साडेदहा हजार फूट! अवतीभवती बर्फच बर्फ. मधे मधे हिरवळ. त्यावर तांबूस तट्टे. जवळ तंबू. चहाची वाफ आणि माणसांची धाप यांनी धुरकट झालेली हवा. बर्फाचे लाडू वळा. चेंडू खेळा. फळीचा गाडा. तो घेऊन जे खाली घसरायचे ते हिरवळीवर लोळण घडेपर्यंत. हाच हिमालय का? छट्. मागे वळ. पहा आता क्षितिजावर. ते शिखर आहे ना, ते हरमुख; तो नंगा पर्वत, पहा वूलरच्या तळ्यात त्यांची राजस प्रतिबिंबे. खिलनमर्गहून नजर खाली ढकलायची, झाडांच्या शेंड्यांवरून गुलमर्गच्या गोल्फ ग्राऊंडवर ती उडी घेते की हिरवळीवरून घसरत घसरत वूलरमध्ये बुडी घेते. परावर्तित शिखरांना शिवून वर उसळते. आता चढण सुरू. मग चढण आणि चढण. शिखरावर पोचेपर्यंत पायांखालची फळी काढून घेतली जाते. आता फक्त आकाश दिसते. थोड्या वेळापूर्वी दिसली ती खरीच हिमशिखरे होती का? का केवळ आभास? का गंधर्वांचे उडते राजवाडे? का निव्वळ अभ्रलेखा? का आता दिसते ते आभाळ खोटे? आभाळ हाच आभास? का आपण आहोत, पाहतो... हेच खोटे? काही असो. चकव्याने डाव साधला!

मी आता मोहिमेचा नकाशाच बदलतो. या धूर्तावर वरून झडप घातली पाहिजे. श्रीनगरला मी विमानात बसतो. एक गगन, दोन गगने करीत... सातव्या गगनात पोचतो आणि 'लेह'चा रस्ता धरतो. तो उत्तुंग गिरिराज जटेत पकडील म्हणून विमान सावधपणे चालते. मी जिवाचा धडा करून खाली पाहतो. ओकेबोके काळेकभिन्न फत्तर करवतीसारखे दात विचकतात. 'थ्री सिस्टर्स!' हे काय शिखर म्हणायचे? या तर तीन डाकिनी, थेट मॅकवेथ नाटकातून चालत आलेल्या पांढऱ्याफटक देहाच्या जखिणी. मग खुज्या खुज्या रांगा. यांहून वारुळेदेखील उंच दिसतात. हा कसला गिरिराज! पण आपलेच चुकले! दृष्टिकोनच चुकला! ज्याच्याकडे मुंगीच्या भूमिकेतून पाहायला हवे, त्याच्याकडे गरुडाच्या डोळ्यांनी पाहतो आहोत आपण...

तेवढ्यात कोणी तरी म्हणते, सावध. आता अधिक उंच रांगा लागतील. ती पाहा सिंधु नदी एखाद्या एकसरासारखी कृश दिसते आहे. कवऱ्या कवऱ्या ओरबाडलेल्या मुखड्यावर एखाद्या रेशमी रिबनसारखी नदी मी पाहतो. आता सोनमर्ग मागे पडले. झोजिला खिंडीवरून आपण जात आहो. पण हिमालय कुठे आहे? मेरू कुठे आहे? आपल्या डोळ्यांत न मावू शकणारा तो तुंगभद्र कुठे आहे? शंका घेतो न घेतो तोच कुठून कोणास ठाऊक, कापरासारखे ढग येतात, फेर धरतात, बघता बघता त्यांचा दाट गालिचा होतो आणि त्या अंतरपाटामागे गुप्त होतो देवतात्मा!

लदाख! हिमालयाच्या गाभ्यातच आलो आपण. आता जातो कुठे? एकोणीस हजार, वीस हजार फूट उंचीची माथी आता तो कोठे लपवील? सिंधु नदीचा पदर धरून, तोंडात अचंब्याचे बोट घालून, एखाद्या पोरासारखी वणवण सुरू झाली. लष्करच्या छावण्या, लामांचे मठ, विलोवृक्षांचे ओॲसिस, सिंधूवरचे साकव, गरम पाण्याचे झरे, भुयारी मोर्चे, माती-धोंडे, दगड! सगळे पाहत असूनही मी काही पाहत नव्हतो. मला पाहायचा होता हिमालय! नगाधिराज! पण त्यानेसुद्धा जे दर्शन दिले त्याचे रूपही माती धोंडे आणि दगड! मधे मधे मधाचे बोट लावण्यापुरते शुभ्र शिखर तो दाखवी. जरा तिकडे वळावे तो माती धोंडे दगड! खूप माती. मैल मैल उंचीचे ढिगारे होतील एवढी. खूप दगडधोंडे, हिमालयाची

तुळा होईल एवढ्या वजनाचे. पण दस्तुर खुद्द शहेनशाह वरफवादशहांचा मुखडा दिसेल तर शपथ. म्हणजे मुंगीची भूमिकाही चालत नाही म्हणायची. जास्त जवळ जाऊन वर पहिले, तर टोपी पडायची वेळ येते. आणि दर्शन म्हणाल तर मात्र इल्ले!

मग मी म्हटले, आता जरा गनिमी कावाच करावा. जरा वेळ दुर्लक्षच करावे. मग डोळे मिटूनच हा पल्ला सोडला. डलहौसीला हिरव्यागार देवदार अरण्यांच्या मागे स्वारी हसतच उभी होती. पण मी नजरेला नजरच दिली नाही. मसुरीच्या गोल जिन्यावर घिरट्या घेत घेत मी मसुरीचे शीशफूल झालो. त्या वेळी दूर आभाळाच्या किनाऱ्याजवळ शुभ्र शिडांचे नौकादल हलल्याचा भास झाला. पण त्यांच्यावरोवर मीही अंधारगुडूप झालो. हरद्वारला मी घाटावर उभा. भोवती भक्तांची गजवज. स्नानाची धांदल. मी सहज मोहरा फिरवला तर वायव्येच्या कोपऱ्यातून हिमालयाने मला 'कूऽऽकूक्' केले. घूम जाव करून मास्टरजी वापिस! अशा बऱ्याच हुलकावण्या झाल्यावर सिमल्याला आमची एक ऐसी आमनेसामने झडली! माझा जरा बेसावधपणाच झाला. मी गेलो होतो जाकू डोंगरावर समर्थ रामदासांनी बांधलेले हनुमान मंदिर पाहायला. हनुमानाने जाम दमवले. धापा टाकीत– एका झाडाखाली बसलो मात्र– दगा! भयंकर विश्वासघात, क्षितिजावर पांढऱ्या पताकांची दळे, पांढरे घोडे जोडलेले रुप्याचे रथ. धूत वस्त्रे धारण करणारे गोरेपान योद्धे! चौफेर घेरणारा हिमालयाचा हल्ला. गिरिशिखरांनी मला वेढा घातला. शुभ्र पिसांचे त्यांचे बाण मला वर्मी लागले. पुन्हा तेच वेड. मला माहीत होते– हे मला घेरतील, धरतील, आणि जीव मात्र घेणार नाहीत. वेड लावून परत जातील. त्यांनी तेच केले. मोहिनी अस्त्राने माझे डोळे जडावले तेव्हा अंतर्धान शत्रूंचे अवतार एकजात–

पुन्हा टाळाटाळ. कुफ्रीला, नालडेऱ्याला, चिनी बंगल्यात.... कुठे म्हणून मी आमनेसामने लढाई होऊ दिली नाही. कुलू खोऱ्यातून रोहटांगची खिंड गाठली. पलीकडे हिमालयाची मोठी ढोली असावी तशी खोरी. लाहोल आणि स्पिती. पण मी त्या चक्रव्यूहात शिरलो नाही. आसाम तर बोलून चालून कामरूप! तिथली शेते, मळे, नद्या, आभाळ



सगळे कामरूप. मग हिमालयच अपवाद कसा ठरेल? *तिथल्या सेला* खिंडीत मला एकदा शत्रू दिसला, पण मी शिस्तीत माघार घेतली. काझीरंगा अभयवनाकडे जाताना दूरावर पांढऱ्या टोप्या *दिसल्या. मी* म्हटले मला खुशाल न्याहाळा, मी तुम्हांला टेहेळीन. पण असे किती दिवस चालणार? सोक्षमोक्ष कधी लागेल की नाही? हुलकावण्या किती आणि किती दिवस!

माझे दोन्ही डोळे फडफडले. खास शुभशकुन! कुठे तरी माझे ईप्सित, माझा मनोरथ माझ्या आगमनाची वाट पाहात आहे.

सिलिगुडीहून मी दार्जिलिंगकडे निघालो, त्या दिवशी, दिशा प्रसन्न होत्या. वारे अनुकूल होते. काय बरे भाग्यात आहे माझ्या? या घनदाट जंगलातल्या सर्पाकृती वाटेवर कोणते प्रेय भेटणार आहे? अथवा शंका कशाला– ते पहा. पहा समोर— जर्द निळे आकाश, त्याला खेटून उभी असलेली ती कोण राजेशाही मूर्ती?

रुप्याचा मुकुट, पंचरसी धातूचे चिलखत घालून तिथे उभा आहे ना? तोच त्या नगाधिराज हिमालयाचा पूर्णावतार. कांचनगंगा? छट् किंचित् जुंगा! तो किंचिनजुंगा! पहा त्याची झळाळी. केवढा दरारा. वा रे वा! लढावे तर अशा पुरुषोत्तमाशी. मरावे तर याच्याशी झुंज घेताना. हा मूर्तिमंत मेरू. स्वर्ग याला प्रदक्षिणा घालतो. सूर्यचंद्र याचे भाट. तारका याच्या दरबारच्या नृत्यांगना. हा साऱ्या महत्तेचे महाप्रमाण. इतके दिवस ज्याच्यासाठी चर्मचक्षू आसुसलेले होते तोच हा. पण याला पाहूनही असोशी मिटत का नाही? तृष्णेला अधिकच तृष्णा का लागते? समजलो. ही हाक आहे. हे आव्हान आहे!

हे आव्हान मी स्वीकारले. दार्जिलिंगच्या सोळा बुरुजांवरून याच्या पंधरा कळा मी न्याहाळल्या. गंगटोकच्या माचीवरून याला पाठमोरा पाहिला. मग कालिम्पाँगच्या तटावरून याच्या मारगिरीचा अंदाज घेतला. आता महायात्रेपूर्वी याला पुन्हा एकदा पाहून घ्यावे... अरे, थांब थांब... असा वंचित करू नकोस. पण तो कसला! निळ्या अनंतात त्याने बुडी घेतलीच. मग मेघावळींच्या रासात तो हरवून गेला. अरे वंचका! तुला तसा सोडणार नाही.

आता मात्र निर्वाणीचा प्रयत्न. आता सरळ आघाडीवरच मोर्चा लावायचा. मग मी नैनीतालच्या चीना शिखरावरून त्याचा सर्व लवाजमा पाहिला. भवान् भीष्मश्च कर्णश्च करीत सारी सेना पाहिली. रथमस्तके पाहून ठेवली. हा चोखंबा, तो त्रिशूल, तो नीलकंठ, नंदादेवी, नंदाकोट... ठीक आहे. आता जाता कोठे? मजल दरमजल करीत अल्मोडा जिंकला, मग रानीखेत सर केले आणि कौसानीचा किल्ला गाठला. तिथल्या बालेकिल्ल्यातून समोर पाहिले मात्र, खलास! अर्जुनाचे गांडीव गळून पडले, थरथर सुटली, अंग घामेजले! समोर अकरा अक्षौहिणी उभ्या. क्षितिजभर सेना. कुणाची सेना? मित्रांची की शत्रूंची? हे माझे आप्त की दावेदार? अर्धवर्तुळाकार व्यूहात पवित्रा घेऊन उभे असलेल्या महारथींनो, गिरिराजांनो, मी पार्थ तुमच्या पायांना स्पर्श करण्यासाठी येऊ काय?

हे शब्द आभाळाच्या घुमटात घुमले मात्र. त्यांचा तुमुल पडसाद त्या सम्राटाच्या कानांवर पडला. लाखो भरजरी झेंडे एकवार नाचले. आपल्या हिमांकित शरीराएवढे अट्टहास्य करून गिरिराज पुन्हा आपले अंतर्धान!

काय हा चकवा! केवढी ही मोहनवेल! असहाय जिवाला ओढ लावून उंच उंच कड्यापर्यंत न्यायचे आणि न संपणाऱ्या पाताळदरीत त्याला लोटायचे, कायम तरंगत ठेवायचे हे याला शोभते काय?

आणि हा म्हणे देवतात्मा!

०००

REFBK-0029382

REFBK-0029382